नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१४ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. १५ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# मध्यरात्री 'वर्षा'वर खलबतं!

## जयंत पाटील, सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल मुख्यमंत्री फडणवीसांच्या भेटीला

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्राच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गटांच्या ज्येष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मध्यरात्री 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार नेमकी कोणती नवी खेळी खेळणार, याबाबत आता तर्क-वितर्कांना वेग आला असून, सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूंनी आगामी राजकीय भविष्याबाबत चाचपणी सुरू झाल्याचे चित्र आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, तर दुसरीकडे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी काल रात्री अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या तिन्ही बड्या नेत्यांच्या एकत्रित उपस्थितीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची नांदी तर नाही ना? अशी चर्चा रंगू लागली आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जयंत पाटील, सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत 'वर्षा' बंगल्यावर जवळपास सव्वा तास खलबतं झाली.



विशेष म्हणजे, मुख्यमंत्र्यांच्या भेटीपूर्वी या तिन्ही नेत्यांमध्ये एक स्वतंत्र बैठक झाल्याचीही माहिती समोर येत आहे. सुरुवातीला अजित पवार गटाचे तटकरे आणि पटेल वर्षावर दाखल झाले, आणि त्यांच्या पाठोपाठ जयंत पाटीलही तिथे पोहोचल्याने या बैठकीबाबत गूढ वाढले आहे. या मध्यरात्रीच्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडताच जयंत पाटील यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी तटकरे आणि पटेल यांच्यासोबत कोणत्याही प्रकारची राजकीय बैठक झाली नसल्याचा दावा केला.

वृत्तानुसार, या भेटीपूर्वी एक मोठी घडामोड घडली होती. जयंत पाटील यांनी सर्वप्रथम दक्षिण मुंबईतील 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन शरद पवार यांची भेट घेतली होती. शरद पवारांसोबत चर्चा केल्यानंतर जयंत पाटील थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी रवाना झाले. या गुप्त बैठकीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली, याबाबत मुख्यमंत्री कार्यालय किंवा दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, पक्षातील इतर प्रमुख नेत्यांनाही या बैठकीच्या अजेंड्यापासून दूर ठेवण्यात आल्याचे समजते. जुलै २०२३ मध्ये अजित पवारांनी बंड केल्यानंतर शरद पवार यांच्या पक्षासमोर निर्माण झालेले हे सर्वात मोठे धोरणात्मक संकट मानले जात आहे. सूत्रांच्या दाव्यानुसार, शरद पवार यांच्या पक्षातील १० पैकी किमान ५ आमदार भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती किंवा एनडीए मध्ये सामील होण्यास उत्सुक आहेत. विरोधकांमध्ये राहिल्यामुळे मतदारसंघात विकासकामांसाठी निधी मिळवणे आणि प्रशासकीय मंजुरी मिळवणे कठीण जात असल्याचा सूर या आमदारांचा आहे. जयंत पाटील यांनी नुकतीच आमदारांची ही भावना शरद पवारांसोबत मांडली होती. पक्षातील एक मोठा गट भाजपसोबत जाण्यास अनुकूल असल्याचे त्यांनी संकेत दिले होते. मात्र, या संपूर्ण घडामोडींवर शरद पवार यांनी अजूनही मौन बाळगले आहे.

> "माझा आणि प्रफुल पटेल किंवा सुनील तटकरे यांच्या भेटीचा काहीही संबंध नाही. इस्लामपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षांना अपात्र ठरवल्याप्रकरणी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी रात्री साडेदहा वाजता 'वर्षा'वर गेलो होतो. मुख्यमंत्र्यांशी केवळ ५ मिनिटे चर्चा करून मी बाहेर पडलो. तिथे तटकरे आणि पटेल उपस्थित आहेत, याची मला कोणतीही कल्पना नव्हती."
>
> **– जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्ष)**



## सांगली : तरुणाचा धारदार शस्त्राने वार करुन खून

सांगली : (स. गांवकरी)

शहरातील स्वामी समर्थ घाट परिसरात मंगळवारी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास चैतन्य तोरणे (वय २०) या तरुणाची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी हल्लेखोरांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली आहेत. प्राथमिक माहितीनुसार, स्वामी समर्थ घाट परिसरात चैतन्य तोरणे याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या चैतन्यचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अरुण सुगावकर तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक संजीव झाडे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी परिसराची नाकाबंदी करून पंचनामा सुरू केला.

या हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य किंवा अन्य कोणत्या कारणातून हा प्रकार घडला का, याचा तपास पोलीस करत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे हल्लेखोरांचा शोध सुरू असून त्यांना अटक करण्यासाठी विशेष पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. या घटनेमुळे सांगली शहरात एकच खळबळ उडाली असून पुढील तपास शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाकडून सुरू आहे.

## थोडक्यात...

### तिकीट आरक्षणात आता बदल होणार

पुणे (स. गांवकरी) : रेल्वेच्या तिकिटाचे आरक्षण करताना अनावश्यक पॉपअप्स, कॅप्चा आणि लांबणाऱ्या प्रक्रियेमुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. आा मात्र हा त्रास कमी करण्यासाठी रेल्वेकडून आयआरटीसीच्या तिकिट बुकिंग सुविधेत महत्त्वाचे बदल करण्यात येणार आहेत. तिकीट बुकिंग अधिक सोपे आणि सुरक्षित व्हावे म्हणून आयआरटीसीच्या संकेतस्थळाचे सुधारित बीटा व्हर्जन तयार करण्यात आले आहे. हे नवे संकेतस्थळ लवकरच प्रवाशांसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. नुकतीच जयपूर येथील मालविय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थ्यांनी आयआरटीच्या संकेतस्थाळावरील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यानंतर रेल्वेकडून संकेतस्थळ सुधारासाठी पाऊले उचलण्यात आली. रेल्वेने १५ जुलैपर्यंत आयआरटीसीचे संकेतस्थळ सुधारण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी जयपूर येथे आयआरटीसी आणि रेल्वे सूचना प्रणाली केंद्राच्या (सीआयआरएस) अधिकाऱ्यांनी मालविय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसमोर आयआरटीसीच्या संकेतस्थळाचे नवीन बीटा आवृत्ती सादर करून त्यांचा अभिप्राय मागवला.

### गांभीर्य घालवल्याचा ठाकरेंचा आरोप

मुंबई (स. गांवकरी) : "सोनम वांगचुक यांना माझा पाठिंबा आहे पण, अभिजीत दिपकेंना माझा पाठिंबा नाही", असे मत मनसे नेते अमित ठाकरेंनी नीट पेपरफुटीविरोधात दिल्लीत जंतर मंतरवर सुरु असणाऱ्या आंदोलनाबाबत मांडले. एक माणूस म्हणून माझे मत मांडत असून, पक्ष म्हणून राज ठाकरे भूमिका मांडतील, असेही अमित यांनी स्पष्ट केले. आंदोलनाचे गांभीर्य घालवल्याचा आरोप यावेळी अमित ठाकरेंनी मुंबईत माध्यमांशी बोलताना केला. "सोनम वांगचुक उपोषण करत आहेत आणि ज्या पद्धतीने त्यांच्यासमोर नृत्य केले जात आहे, नाटकं केली जात आहेत हे योग्य नाही. सुरुवातीला आंदोलन सुरु केल्यानंतर मला ते खूप आवडलं होतं, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा व्हायलाच हवा. पण, ज्या पद्धतीने या आंदोलनाचे गांभीर्य घालवले ते मला पटलं नाही", असे मत अमित ठाकरेंनी मांडले. "सोनम वांगचुक आज १७ दिवस उपोषण करत आहेत. सोनम यांना माझा पाठिंबा आहे पण सीजेपीला माझा पाठिंबा नाही", असे अमित ठाकरे माध्यमांशी बोलताना म्हणाले. "२१ मिलियनचे (फॉलोअर्स) प्रेशर आलंय का?", असा प्रश्न देखील अमित यांनी दिपकेंना यावेळी विचारला.

### पर्यटनस्थळांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

नाशिक (स. गांवकरी) : मागील आठवड्यात इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यात दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळला होता. ढगफुटीसदृश पावसाच्या अंदाजामुळे त्यावेळी पर्यटनस्थळे बंद करण्यात आली होती. त्यानंतर शनिवार व रविवारी परिसरातील धबधबे, गड-किल्ले आणि धरणांवर पर्यटकांचा अक्षरशः पूर आला होता. याच काळात भावली धरण व धबधबा परिसरात वादातून पर्यटकांवरील हल्ल्यामुळे पावसाळी पर्यटनस्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांतील इगतपुरी हा धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील या तालुक्यातून, विशेषतः कसारा घाटातून, पावसाळ्यात प्रवास करताना ढग जमिनीवर उतरल्याची अनुभूती मिळते. भावली धरण व धबधबा, वैतरणा, मुकणे अशी अनेक धरणे, घाटणदेवी तसेच डोंगर-दऱ्यांमधून खळाळत वाहणाऱ्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी उसळते.

## दापचरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारला जाणार

मुंबई : (स. गांवकरी)

पालघर जिल्ह्यातील मौजे दापचरी (ता. डहाणू) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारला जाणार आहे. दापचरी दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जागेवर शेतीमालाच्या साठवणूक, प्रतवारी, निर्यातीसाठीच्या सर्व अत्याधुनिक पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. हा बाजार सागरी, हवाई आणि रस्ते वाहतुकीने जोडला जाईल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी दिली. या प्रकल्पाला जमीन देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. वाढवण बंदरापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. देशांतर्गत



तसेच निर्यात बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करणारे जागतिक दर्जाचे कृषी व्यापार केंद्र म्हणून त्याची उभारणी केली जाणार आहे. राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन आहे. त्यातून कृषी मालाच्या मूल्यसाखळीला बळकटी मिळणार आहे. निर्यात बाजार सुविधांचे एकत्रीकरण, काढणीनंतरचे मूल्यवर्धन, संगणकीकृत व पारदर्शक व्यवहार आणि आधुनिक बाजार पायाभूत सुविधांवर विशेष भर दिला जाणार आहे.

## मालमत्ता, पाणी, घनकचऱ्याचेही खासगीकरण; पालिकांना निधी उभारण्याची मुभा

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना, घनकचरा, मालमत्तांचे खाजगीकरण करुन निधी उभारण्यास परवानगी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यामुळे पालिकांना आरक्षित भूखंडाची विल्हेवाट लावण्यास मोकळे रान मिळणार आहे.



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या संस्थांच्या मालमत्तांच्या मुद्रीकरणाच्या धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या २९ महानगरपालिका, १५ "अ" वर्ग नगरपरिषदा, ७८ "ब" वर्ग नगरपरिषदा, १४६ "क" वर्ग नगरपरिषदा आणि ७४३ नगरपंचायती आहेत. या सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या धोरणाचा लाभ होणार असून, त्यांच्या आर्थिक क्षमतेत वाढ होऊन नागरी विकासाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. हे धोरण ३१ जुलै २०३१ पर्यंत किंवा नवीन धोरण येईपर्यंत लागू राहील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागा, इमारती, व्यावसायिक संकुले, बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा, मनोरंजनाच्या जागा, रस्ते, पूल, पाणी पुरवठा व्यवस्था, बगिचे, आरक्षित भूखंड तसेच इतर स्थावर मालमत्तांचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने विकास करून त्यातून उत्पन्न वाढविणे, हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचे शाश्वत आर्थिक स्रोत उपलब्ध होतील. त्यामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उभारणे शक्य होणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानावरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक संस्थांची आर्थिक स्वायत्तता अधिक बळकट होईल.

मालमत्तांच्या विकासासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तसेच अन्य योग्य विकास मॉडेलचा अवलंब करता येणार असून, सर्व प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक आणि नागरिकहिताला प्राधान्य देणाऱ्या पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या धोरणानुसार सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर शहरातील पाणी वितरण व्यवस्था, स्मार्ट युटिलिटीज, एकात्मिक घनकचरा प्रकल्पाची उभारणी आणि संचालन, नाट्यगृह नुतनीकरण, पे अँन्ड पार्क, विद्युत वाहन चार्जिंग केंद्राची उभारणी असे प्रकल्प राबवून त्यातून निधी उभारण्यास महापालिकांना परवानगी देण्यात आली आहे. महापालिकांच्या मालमत्तांच्या मुद्रीकरणाचा आरखडा तरण्यासाठी महापालिका आयुक्त, मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यासही या धोरणाच्या माध्यमातून परवानगी देण्यात आली आहे. मात्र मुद्रीकरणाच्या प्रत्येक निर्णयास नगरविकास मंत्र्यांची मान्यता लागणार आहे.

## श्रीरामपूर शहरात सलग तिसऱ्या दिवशी कडकडीत बंद

### उद्या मोर्चा, सोनू बेगच्या सदनिकेतून रिव्हॉल्व्हर व दोन काडतुसे जप्त

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वाढत्या गुन्हेगारीविरुद्ध तसेच हॉटेल व्यवसायिकाच्या हत्येच्या निषेधार्थ श्रीरामपूर शहरात सलग तिसऱ्या दिवशी आज, मंगळवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. उद्या, बुधवारी पोलीस ठाण्यावर मोर्चा नेला जाणार आहे. दरम्यान नागरिकांच्या या दबावानंतर पोलीस सक्रिय झाले असून पोलिसांच्या पथकाने संघटित गुन्हेगारी चालवणाऱ्या सोनू बेग याच्या सदनिकेवर छापा टाकून एक रिव्हॉल्व्हर, २ काडतुसे, कागदपत्रे, कोरे धनादेश, एटीएम कार्ड जप्त केले.

श्रीरामपूरच्या नागरिकांनी उत्स्फूर्तपणे तिसऱ्या दिवशी बंद पाळला. त्यातून श्रीरामपूरकरांच्या मनात गुन्हेगारीविरोधात असणारा तीव्र संताप व्यक्त होत आहे. सर्व व्यापारी संघटना या बंदमध्ये सहभागी झाल्या होत्या. दरम्यान उद्या खून प्रकरणातील आरोपींना विरुद्ध 'मकोका' अंतर्गत कारवाईच्या मागणीसाठी पोलीस ठाण्यावर मोर्चा नेण्यात येणार आहे. मारहाण प्रकरणात अटकेत असलेला सोनू बेग संघटित गुन्हेगारी चालवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सोनू बेगच्या सरस्वती वसाहतीमधील सदनिकेवर काल, सोमवारी रात्री छापा टाकला. या छाप्यात एक रिव्हॉल्व्हर, दोन काडतुसे, एका महिलेची स्त्री रोग तज्ज्ञाकडील फाईल, यासह कोरे धनादेश, एटीएम कार्ड असे साहित्य आढळल्याची माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी दिली. काही जणांनी अवैध अग्नीशास्त्राचा वापर करून दोन मुलींना डांबल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. सदनिकेच्या तपासणीमध्ये वरील साहित्य आढळून आले. सोनू बेग हा संघटित गुन्हेगारी चालवत असून या टोळीच्या माध्यमातून बेकायदेशीर धंदे करून त्यामधून अवैध आर्थिक लाभ मिळवत असल्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक वाकचौरे यांनी सांगितले. यासंदर्भात पोलिस अंमलदार छांचा गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सोनू बेग याच्यासह एक महिला व त्याचा नातलग अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रिव्हॉल्व्हर कोणाकडून विकत घेतले, ते कोणाला विकले जाणार होते, कोणत्या उद्देशाने आणले, याचा तपास केला जात असल्याचे वाकचौरे यांनी सांगितले. दरम्यान हॉटेल व्यवसायिक अशोक दुबय्या हत्याप्रकरणी आरोपींना शासन करावे, बेलापूर गावची शांतता कायम राहावी, यासाठी ग्रामस्थांनी पुकारलेल्या बेलापूर बंदला आज उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यवसायिकांनी उस्फूर्तपणे आपले व्यवसाय बंद ठेवले होते.




### पोलीस कर्मचारी शंकर चौधरी निलंबित

श्रीरामपूरातील सराईत गुन्हेगाराशी संबंध असल्याचा आरोप असलेला पोलीस अंमलदार शंकर चौधरी याला जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी निलंबित केले आहे. या कारवाईने जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली आहे. शंकर चौधरी हा सध्या पोलीस मुख्यालयात कार्यरत होता. यापूर्वी त्याची नेमणूक श्रीरामपूर येथील अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालयात होती. मात्र, त्याच्याविरुद्ध गुटखा तस्करीशी संबंधित कथित आरोपांनंतर तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी त्याची बदली पोलीस मुख्यालयात केली होती.

## जिल्ह्यातील ८४३ ग्रामपंचायतींच्या मतदार यादीची गावपुढाऱ्यांना प्रतीक्षा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका रखडलेल्या असतानाच जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक म्हणजे ८४३ ग्रामपंचायतींचे प्रभाग आरक्षण अंतिम होऊनही या निवडणुका लांबणीवरच पडलेल्या आहेत. या ग्रामपंचायतींच्या मतदार यादीच्या कार्यक्रमाकडे आता गाव पुढाऱ्यांचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान ३३ ग्रामपंचायतींमधील आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक झाल्याने तेथे फेरआरक्षण काढण्यात आले आहे. संगमनेरमधील ९४, पारनेर ८८, पाथर्डी ७९, श्रीगोंदे ६२, अहिल्यानगर ६०, नेवासे ५९, कर्जत ५५, अकोले ५२, जामखेड ४९, शेवगाव ४८, राहुरी ४४, कोपरगाव २९, श्रीरामपूर २७ व राहता २५ अशा एकूण ८४३ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी मतदार यादी कार्यक्रमाकडे लक्ष लागलेले आहे. सध्या या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त आहेत. प्रशासकांच्या आर्थिक अधिकारावरही न्यायालयीन आदेशाने मर्यादा आणल्या गेल्या आहेत. जिल्हा प्रशासनातील सूत्रानुसार येत्या महिनाअखेरीपर्यंत मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे असली तरी सध्या मतदार यादीची विशेष पुनरिक्षण मोहीम (एसआय आर) सुरू असल्याने त्याबद्दलही गाव पुढाऱ्यांमध्ये संदीग्धता आहे. जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२६ या सुमारे तीन वर्षांच्या कालावधीत विविध टप्प्यांवर मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या अशा एकूण ८४३ ग्रामपंचायतींची प्रभाग आरक्षण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जाहीर केलेल्या आरक्षणावरील हरकतींचा निपटारा करून १० जुलैला जिल्हाधिकाऱ्यांनी आरक्षण अंतिम केले. आता संबंधित ग्रामपंचायतींच्या मतदार यादी कार्यक्रमाची प्रतिक्षा आहे. असे असले तरी या ग्रामपंचायतीच्या निवडणुका दिवाळीनंतरच होण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गेल्या आठवड्यात आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पाडली. यावर एकूण १५७ हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकतींवर उपविभागीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन त्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला.

# थोडक्यात पण महत्वाचे




## दरोड्याच्या तयारीत असलेली आंतरराज्यीय टोळी जेरबंद

- सहा आरोपी अटकेत, १४.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे (स. गांवकरी) : पुणे ग्रामीण पोलिसांनी ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई करत दरोड्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्यीय दरोडेखोरांच्या टोळीतील सहा जणांना अटक केली आहे. आरोपींकडून गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे, धारदार शस्त्रे तसेच चोरीची बोलेरो जीपसह एकूण १४ लाख ८७ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून महाराष्ट्र व तेलंगणातील २० गंभीर गुन्ह्यांची उकल झाली आहे. सोनूकसिंग कपूरसिंग टाक (30, हडपसर, पुणे), पिलूकसिंग शेरसिंग दुधानी (40, खोपोली, रायगड), करणसिंग गगनसिंग टाक (27, परभणी), पंकजसिंग काळूसिंग शिकलगार उर्फ दुधानी (40, अंबरनाथ), पापीसिंग उर्फ कृष्णसिंग साहेबसिंग टाक (18, परभणी) आणि मंगलसिंग मायासिंग दुधानी (58, परभणी) या सहाही आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्याकडून चौकशीदरम्यान दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी आणि वाहनचोरीचे एकूण २० गुन्हे उघडकीस आले आहेत. यामध्ये दोन दरोडे, एक दरोड्याचा प्रयत्न, दोन जबरी चोरी, १३ घरफोडी आणि दोन वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. तसेच या आरोपींवर यापूर्वी महाराष्ट्र, तेलंगणा व इतर राज्यांत ५० हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्र आणि तेलंगणात सक्रिय असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा मोठा पर्दाफाश झाला असून पुढील तपासातून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, ओतूर पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिसरातील ग्रामस्थांच्या मोलाच्या सहकार्याने करण्यात आली आहे.



## जेष्ठ नागरिक बाबुराव मामडे यांचे दुःखद निधन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : सिडको परिसरातील ज्येष्ठ नागरिक बाबुराव श्रीराम मामडे यांचे अल्पशा आजाराने निधन 13 जुलै रोजी दुःखद निधन झाले असून निधन समयी त्यांचे वय 76 वर्ष वर्ष होते,त्यांचा पश्चात पत्नी ,मुलगा आणि चार मुली, सुन जावई आणि नातवंड असा परिवार आहे, त्यांच्या पार्थिवावर देहावर सिडको येथील स्मशान भूमीत दिनांक 13 जुलै सोमवार रोजी दुपारी 4 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.दिपक मामडे यांच्ये ते वडील होत.



## गावातील शेतकऱ्यांची फसवणूक प्रकरणी राजकीय पक्ष एकवटले

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा येथील बेतवडे गावातील भूमिपुत्र शेतकरी आता आक्रमक झाले असून गेली ३/४ दिवसापासून हे आंदोलन सुरु असून बाधित शेतकऱ्यांनी 'मॅरेथॉन' कंपनीचे बिल्डर मयूर रमणीकलाल शाह, सागर गाला आणि त्यांच्या भागीदारांविरुद्ध बेमुदत धरणे आंदोलन सुरू ठेवले आहे. गेल्या १० वर्षांपासून बिल्डरने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप असून दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार १० वर्षांपूर्वी बेतवडे गावातील शेतकऱ्यांनी त्यांची जमीन विकासासाठी मॅरेथॉन कंपनीला दिली होती. कराराप्रमाणे शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला आणि हक्काच्या सदनिका मिळणे आवश्यक होते मात्र इतकी वर्षे उलटूनही प्रकल्प रखडला असून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली आहे. सदर आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सामाजिक संघटनांसह सर्व राजकीय पक्ष एकवटले आहे. शिवसेनेचे आमदार राजेश मोरे, मनसेचे माजी आमदार राजू पाटील तसेच दिवा भाजपनेही सदर आपला पाठिंबा दर्शवत आंदोलनाला परिसरातील अनेक राजकीय मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली आहे. शेतकऱ्यांशी केलेल्या कराराचे पालन करून त्यांना देय असलेला मोबदला आणि नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी. देय असलेले बांधकाम त्वरित पूर्ण करण्यात यावे. शेतकऱ्यांच्या जमिनीवर बांधलेल्या इमारतींमधील सदनिका विक्री करण्याचे काम त्वरित थांबवावे असे स्थानिक रहिवाशांनी आरोप केला आहे.

## लेखापाल पद अद्याप रिक्त; कामकाजावर परिणाम, नागरिकांमध्ये नाराजी

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नगरपरिषदेत लेखापाल तथा लेखापरीक्षक (श्रेणी–क) या महत्त्वाच्या पदावर शासनाकडून नियुक्ती आदेश जारी करण्यात आले असतानाही संबंधित अधिकारी अद्याप रुजू न झाल्याने नगरपरिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत असल्याचे चित्र समोर आले आहे. या पदाच्या अनुपस्थितीमुळे विविध विभागांतील अनेक कामे रखडली असून नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी संबंधित अधिकाऱ्याची जुन्नर नगरपरिषदेत १ जुलै २०२६ रोजी रुजू होण्याचे आदेश दिले होते. मात्र आदेशानंतर पंधरा दिवस उलटूनही संबंधित अधिकारी अद्याप पदावर रुजू झाले नसल्याचे सांगितले जात आहे. सध्या मतदार यादी पुनरीक्षणाचे काम सुरू असल्यामुळे नगरपरिषदेतील बहुतांश अधिकारी आणि कर्मचारी या कामात व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत लेखापाल तथा लेखापरीक्षक या महत्त्वाच्या पदाचा कार्यभार रिक्त राहिल्याने आर्थिक मंजुरी, देयके, लेखापरीक्षणाशी संबंधित कामे तसेच विविध प्रशासकीय प्रस्तावांची प्रक्रिया मंदावली आहे. परिणामी नगरपरिषदेच्या विविध विभागांतील अनेक कामांवर परिणाम झाला असून नागरिकांच्या दैनंदिन कामांनाही विलंब होत आहे. लेखापाल पद रिक्त असल्याने विकासकामांशी संबंधित आर्थिक व्यवहार, निधी वितरण, देयकांची पूर्तता आणि इतर वित्तीय प्रक्रिया वेळेत पूर्ण होत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. संबंधित अधिकारी अद्याप रुजू का झाले नाहीत, याबाबत नागरिकांमध्ये विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. तसेच, जर नियुक्त अधिकारी रुजू होणार नसतील, तर प्रशासनाने तातडीने अन्य पात्र अधिकाऱ्याची नियुक्ती करून नगरपरिषदेचे कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नये

## एमपीएससी परीक्षा ऑफलाइनच घ्यावी – गोपाळदादा तिवारी

- ऑफलाइन परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या मागणीला काँग्रेसचा पाठिंबा
- आंदोलनापूर्वीच विद्यार्थ्यांची बदनामी व खच्चीकरण करण्याचा सरकारवर आरोप



पुणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा घेतलेला निर्णय तातडीने मागे घेऊन पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घ्यावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या निर्णयामुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून त्यांच्या रास्त मागणीला काँग्रेस पक्ष संपूर्ण पाठिंबा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना गोपाळदादा तिवारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत आपली स्वायत्तता जपावी, अन्यथा काँग्रेसच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही दिला.

ते म्हणाले की, महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न पाहून अनेक वर्षे कठोर परिश्रम घेतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्चही करावा लागतो. अशा परिस्थितीत परीक्षा पद्धतीत अचानक बदल करून ऑनलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय घेणे हा विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे. आयोगाने कोणतीही पूर्वतयारी न करता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास न घेता हा निर्णय घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गोपाळदादा तिवारी यांनी ऑनलाईन परीक्षेनंतर वापरण्यात येणाऱ्या नॉर्मलायझेशन पद्धतीवरही गंभीर आक्षेप घेतला. अनेक शिफ्टमध्ये परीक्षा घेतल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला समान दर्जाचा प्रश्नसंच मिळेलच, याची खात्री नसते. त्यामुळे गुणांचे नॉर्मलायझेशन करताना अनेक विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. एमपीएससीने इतर राज्यांमध्येही ऑनलाईन परीक्षा घेतल्या जात असल्याचा दावा केला असला, तरी तो वस्तुस्थितीला धरून नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तिवारी म्हणाले की, ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे स्वतःची पुरेशी पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेसाठी खाजगी कंत्राटदार संस्थांवर अवलंबून राहावे लागते. यापूर्वी देशातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटी, तांत्रिक बिघाड आणि गैरव्यवहाराच्या घटना समोर आल्या आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षा खाजगी यंत्रणांच्या माध्यमातून घेणे अत्यंत धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले. परीक्षा ऑफलाइन घेण्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दबाव आणला जात असल्याचा आरोपही काँग्रेसने केला. आंदोलना पूर्वीच सरकार आणि पोलिसांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असून त्यांच्या संविधानिक अधिकारांवर गदा आणली जात असल्याचे गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचे खच्चीकरण आणि बदनामी करण्याचे प्रयत्न तातडीने थांबवावेत, अशी मागणी त्यांनी केली. राष्ट्रीय विद्यार्थी संघटनेचे (एनएसयूआय) सरचिटणीस साहेबराव क्षीरसागर यांनी सांगितले की, महाराष्ट्रात दीड लाखांहून अधिक विद्यार्थी एमपीएससी परीक्षा देणार आहेत. ऑनलाईन पद्धतीत अनेक शिफ्टमध्ये परीक्षा घेतल्या जाणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना वारंवार परीक्षा शुल्क भरावे लागू शकते. यामुळे आर्थिक भार वाढण्याबरोबरच मानसिक तणावही वाढणार आहे. त्यामुळे आयोगाने विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय कायम ठेवावा, अशी त्यांनी मागणी केली.

### ग्रामीण विद्यार्थ्यांचे होणार मोठे नुकसान

एमपीएससीचे विद्यार्थी प्रतिनिधी सचिन गायकवाड यांनी सांगितले की, परीक्षा पद्धतीत इतका मोठा बदल करताना किमान सहा महिन्यांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते. मात्र आयोगाने अवघ्या एका महिन्याची सूचना देऊन निर्णय जाहीर केला आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांकडे संगणक, लॅपटॉप किंवा स्थिर इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना मोठा फटका बसणार आहे. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा हा...

## प्रकाश मुथा यांचा मुलगा अविनाश मुथा याला अटक

कल्याण : (स. गांवकरी)

कल्याणातील प्रसिद्ध ज्वेलर्स, बिल्डर आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व प्रकाश मुथा यांचा मुलगा अविनाश मुथा याला एका भीषण अपघातप्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी अटक केली आहे. अपघातात वापरण्यात आलेली MH 05 EJ 4041 क्रमांकाची कारही पोलिसांनी जप्त केली आहे.

ही घटना सोमवार, 13 जुलै 2026 रोजी दुपारी सुमारे 3 वाजण्याच्या सुमारास बिर्ला गेट येथील कमल लॉजसमोर घडली. म्हारळ गावातील रहिवासी देवेंद्रसिंह राजपूत (वय 51) हे आपल्या मुलगा संजय राजपूत यांच्या MH 05 DL 6085 क्रमांकाच्या स्कूटरवरून म्हारळहून शहाडकडे जात होते. त्यावेळी अविनाश मुथा यांच्या कारने त्यांच्या स्कूटरला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत देवेंद्रसिंह राजपूत गंभीर जखमी झाले. त्यांना



तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत उल्हासनगर पोलिसांनी अविनाश मुथा याला अटक केली असून अपघातग्रस्त कार जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## पंचवटी एक्सप्रेस' आम्हाला परत द्या

### खासदार राजाभाऊ वाजेंचे केंद्रीय मंत्र्यांना साकडे

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक-मुंबई दरम्यान दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांच्या गैरसोयीचा प्रश्न ऐरणीवर आणत खासदार राजाभाऊ वाजे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर पत्र पाठवून पंचवटी एक्स्प्रेस (गाडी क्र १२१०९/१२११०) साठी पूर्वीप्रमाणे स्वतंत्र रेक उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच सध्या सुरू असलेली हिंगोली जनशताब्दी एक्स्प्रेससोबतची रेक शेअरिंग व्यवस्था तातडीने बंद करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक( GM ) तसेच विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ (DRM) यांनाही पत्र पाठविण्यात आले असून या विषयावर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. खासदार राजाभाऊ वाजे यांनी पत्रात नमूद केले आहे की, पंचवटी एक्स्प्रेस ही नाशिककरांची सर्वाधिक विश्वासार्ह आणि पसंतीची रेल्वे सेवा असून दररोज हजारो नोकरदार, विद्यार्थी, व्यावसायिक, उद्योगपती, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि विविध कामांसाठी मुंबईला जाणारे प्रवासी या गाडीवर अवलंबून असतात. त्यामुळे या गाडीची वेळेवर धावणे ही प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. मात्र, सध्या पंचवटी एक्स्प्रेस आणि हिंगोली जनशताब्दी एक्स्प्रेस यांच्यातील रेक शेअरिंग व्यवस्थेमुळे एका गाडीला झालेला विलंब थेट दुसऱ्या गाडीच्या वेळापत्रकावर परिणाम करत आहे. विशेषतः मुसळधारy पाऊस, तांत्रिक बिघाड किंवा रेल्वे वाहतुकीतील इतर अडथळ्यांच्या काळात या व्यवस्थेचे गंभीर दुष्परिणाम समोर येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. अलीकडील पावसाळ्यात रेल्वे सेवांमध्ये झालेल्या विलंबामुळे हजारो प्रवाशांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. अनेकांचे कार्यालयीन कामकाज बिघडले, महत्त्वाच्या बैठका आणि वैद्यकीय नियुक्त्या चुकल्या, तर विद्यार्थ्यांनाही मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर पंचवटी एक्स्प्रेसला स्वतंत्र रेक उपलब्ध करून दिल्यास गाडीचे वेळापत्रक अधिक नियमित राहील आणि प्रवाशांचा रेल्वे प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. रेल्वेमंत्र्यांना चार महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये पंचवटी एक्स्प्रेससाठी पूर्वीप्रमाणे स्वतंत्र रेक उपलब्ध करून देणे, हिंगोली जनशताब्दीसोबतची रेक शेअरिंग व्यवस्था बंद करणे, गाडीची वक्तशीरता व कार्यक्षमतेत सुधारणा करणे आणि संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना या विषयाचा प्राधान्याने आढावा घेऊन तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश देणे यांचा समावेश दिलेल्या पत्रात केला आहे.

> पंचवटी एक्स्प्रेस ही नाशिककरांची जीवनवाहिनी आहे. दररोज हजारो नोकरदार, विद्यार्थी, व्यावसायिक आणि ज्येष्ठ नागरिक या गाडीवर अवलंबून आहेत. सध्याच्या रेक शेअरिंग व्यवस्थेमुळे गाडीच्या वक्तशीरतेवर गंभीर परिणाम होत असून प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे पंचवटी एक्स्प्रेससाठी पूर्वीप्रमाणे स्वतंत्र रेक उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. रेल्वे मंत्रालयाने लाखो प्रवाशांच्या हिताचा विचार करून या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.
>
> **- राजाभाऊ वाजे, खासदार, नाशिक**

## अतिवृष्टीमुळे किल्ले शिवनेरीवरील संरक्षक भिंतींचे मोठे नुकसान

### संवर्धनासाठी तातडीच्या उपाययोजनांची गरज



शिवनेरी : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक किल्ले शिवनेरी परिसरात १ ते ५ जुलैदरम्यान झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे गडावरील संरक्षक भिंती, कडेलोट परिसर आणि विविध संरक्षणात्मक बांधकामांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या नुकसानीमुळे गडाच्या सुरक्षेबरोबरच ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र शासनाने गड परिसरात अतिक्रमण रोखण्यासाठी तसेच ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेल्या संरक्षक भिंतींचे अनेक भाग अतिवृष्टीमुळे कोसळले आहेत. अनेक ठिकाणी दगड, बांधकाम साहित्य आणि इतर संरक्षक घटक पावसाच्या पाण्याबरोबर वाहून गेल्याचे दिसून आले आहे.

विशेषतः कडेलोट परिसर, पूर्वेकडील बारव भाग तसेच गडाच्या इतर बाजूंवरील संरक्षण भिंतींना मोठा तडा गेला असून अनेक ठिकाणी भिंती कोसळल्या आहेत. काही ठिकाणी काँक्रीटचे बांधकाम पूर्णपणे वाहून गेले असून संरक्षण व्यवस्थेची मोठी हानी झाली आहे. त्यामुळे भविष्यात आणखी भूस्खलन किंवा पडझड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवनेरी हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नसून लाखो शिवभक्तांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. दरवर्षी हजारो पर्यटक आणि इतिहासप्रेमी येथे भेट देत असल्याने गडावरील संरक्षक भिंतींची दुरुस्ती आणि सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. सध्याच्या नुकसानीमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिक, शिवप्रेमी आणि इतिहास अभ्यासकांनी शासनाने तातडीने संयुक्त पाहणी करून नुकसानग्रस्त भागाचे सर्वेक्षण करावे, संवर्धन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली दुरुस्तीचे काम हाती घ्यावे आणि भविष्यात अशा प्रकारचे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे.

### शिवनेरीच्या संवर्धनाकडे सर्वांचे लक्ष

अतिवृष्टीमुळे किल्ले शिवनेरीवरील संरक्षक भिंती आणि कडेलोट परिसराचे झालेले नुकसान लक्षात घेता महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, वन विभाग आणि पुरातत्त्व विभाग या ऐतिहासिक वारशाच्या संरक्षणासाठी कोणती ठोस भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राज्यातील नागरिक, इतिहासप्रेमी आणि शिवभक्तांचे लक्ष लागले आहे. तातडीने निधी उपलब्ध करून वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन व दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे.

## ५५ दिवसांच्या ICU लढाईनंतर तरुणीची यशस्वी मात

पुणे : (स. गांवकरी)

वैद्यकीय तज्ज्ञता आणि वेळेवर करण्यात आलेल्या उपचारांचे उत्तम उदाहरण ठरलेल्या एका प्रकरणात, २१ वर्षीय विद्यार्थिनी अनिता सुर्वे (नाव बदललेले) हिने दुर्मिळ आणि गंभीर न्यूरोलॉजिकल आजार ‘अँटी-एनएमडीए रिसेप्टर एन्सेफलायटिस’वर यशस्वी मात केली. सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, हडपसर, मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्क हॉस्पिटलमध्ये तब्बल ५५ दिवस चाललेल्या अतिदक्षता उपचारांनंतर ती पूर्णपणे बरी झाली. पूर्वी कोणताही गंभीर वैद्यकीय इतिहास नसलेल्या अनिताला २८ जानेवारी रोजी गोंधळलेली मानसिक अवस्था, स्मरणशक्ती कमी होणे, वर्तनातील बदल आणि संज्ञानात्मक कार्यात बिघाड अशी तीव्र न्यूरोलॉजिकल लक्षणे दिसू लागल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती झपाट्याने खालावत गेली आणि सतत एन्सेफालोपॅथी तसेच जनरलाइज्ड टॉनिक-क्लॉनिक आणि फोकल फिट्ससारखे वारंवार झटके येऊ लागले. त्यामुळे तिला



तातडीने ICU मध्ये दाखल करून सतत न्यूरोमॉनिटरिंग करण्यात आले. सुरुवातीला कुटुंबीयांना तिच्या वर्तनातील बदल ही केवळ मानसिक किंवा वागणुकीशी संबंधित समस्या वाटत होती. ती गोंधळलेली राहणे, गोष्टी विसरणे आणि दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहणे अशा समस्या अनुभवत होती. उपचारास थोडा वेळ लागला असला तरी त्याचा तिच्या आयुष्यावर मोठा सकारात्मक परिणाम झाला. उपचारांनंतर तिची स्मरणशक्ती परत आली आणि ती पुन्हा सामान्य आयुष्याकडे परतली.

# ओतूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्यीय दरोडेखोरांच्या टोळीतील सहा आरोपींना पुणे ग्रामीण पोलिसांनी धाडसी कारवाईत अटक केली. आरोपींकडून एक गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे, धारदार हत्यारे आणि चोरीची बोलेरो जीप असा १४ लाख ८७ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांतील दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी व वाहन चोरीचे एकूण २० गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.



दि. १२ जुलै रोजी सकाळी कोळवाडी (ता. जुन्नर) येथे लोणी प्रवरा (जि. अहिल्यानगर) येथून चोरीस गेलेली बोलेरो (एमएच-१७- एजे-३०७५) संशयास्पदरीत्या आढळून आली. वाहनाचा शोध घेत असलेले मालकाचे नातेवाईक विघ्नेश सुभाष घोलप यांनी वाहनातील संशयितांना विचारणा केली असता त्यांच्यात वाद झाला. यावेळी त्यांनी "चोर- चोर" असा आरडाओरडा करताच ग्रामस्थ घटनास्थळी धावले. ग्रामस्थांनी दोन आरोपींना पकडले, तर इतर चार आरोपी डोंगराच्या दिशेने पसार झाले. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिस, स्थानिक गुन्हे शाखा आणि जुन्नर उपविभागातील पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. दोन स्वतंत्र पथके तयार करून आलमे, बल्लाळवाडी, कोळवाडी व डिंगोरे परिसरातील डोंगर-दऱ्यांमध्ये सुमारे सहा तास शोध घेण्यात आला. स्थानिक नागरिक आणि पोलिस पाटील यांच्या मोलाच्या सहकार्याने पळून गेलेल्या चारही आरोपींना अखेर ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणी ओतूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ३१० (४), ३१० (५), आर्म्स ॲक्ट तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये सोनूसिंग कापूरसिंग टाक (हडपसर, पुणे), जिलूसिंग शेरसिंग दुधानी (खोपोली, रायगड), करणसिंग गगनसिंग टाक (परभणी), पंकजसिंग काळुसिंग शिकलगार उर्फ दुधानी (अंबरनाथ), पापीसिंग उर्फ कृष्णसिंग साहेबसिंग टाक (परभणी) आणि मंगलसिंग मायासिंग दुधानी (परभणी) यांचा समावेश आहे. २० गंभीर गुन्ह्यांची उकल आरोपींकडे केलेल्या सखोल चौकशीत महाराष्ट्र व तेलंगणा राज्यांतील २ दरोडे, १ दरोड्याचा प्रयत्न, २ जबरी चोरी, १३ घरफोड्या आणि २ वाहन चोरी असे एकूण २० गंभीर गुन्हे उघडकीस आले. तसेच या आरोपींवर यापूर्वी महाराष्ट्र, तेलंगणा आणि इतर राज्यांमध्ये ५० हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करून पोलिस कोठडीची मागणी करण्यात येणार असून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि ओतूर पोलिस ठाणे करीत आहेत. पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभमकुमार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडाकेबाज कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, जुन्नर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय गुंड, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव शेलार, ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलिस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्यासह पोलिस अंमलदार आनंदा भवारी, बाळशिराम भवारी, धनंजय पालवे, सुरेश गेंगजे, दिनेश साबळे, नामदेव कांबळे, नरेंद्र गोराने, देविदास खेडकर, दीपक साबळे, राजू मोमीन, संदीप वारे, अक्षय नवले, महिला पोलीस हवालदार संगीता मधे, रेश्मा फापाळे, पोलीस शिपाई मनोज राठोड, रोहित बोंबले, ज्योतीराम पवार, सुभाष केदारी, विशाल गोडसे, योगेश उकिडे, महिला पोलिस शिपाई काळे तसेच जुन्नर आरसीपी पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. दरम्यान, आरोपींचा शोध घेण्यासाठी आलमे गावच्या डोंगर परिसरात राबविण्यात आलेल्या शोधमोहीमेत बल्लाळवाडी, आलमे, कोळवाडी व डिंगोरे येथील नागरिक तसेच पोलीस पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. या गुन्ह्याचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व ओतूर पोलिस ठाणे करीत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ठाण्यातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स हटवून मोठ्या होर्डिंग्जचे ऑडिट निर्देश

■ ठाण्यातील होर्डिंग दुर्घटनेची उपमुख्यमंत्र्याकडून दखल

ठाणे (स. गांवकरी) : ठाण्यात काल घडलेल्या दुर्दैवी होर्डिंग दुर्घटनेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी तात्काळ ठाणे महानगरपालिका आयुक्तांना फोन करून शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स तातडीने निष्कासित करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच पावसाळ्यात वाऱ्या-पावासामुळे पुन्हा अशी कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी शहरातील सर्व मोठ्या होर्डिंग्सचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट (Structural Audit) करण्याचे कडक निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. धोकादायक ठरणाऱ्या होर्डिंग्सवर आणि बेकायदेशीर फलक लावणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर पालिका प्रशासन अॅक्शन मोडमध्ये आले असून काल रात्रीपासूनच शहरात कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे.



### चेकेवाडी येथे दिंडीतील वारकऱ्यांना चहा पाण्याची सोय

पाथर्डी (स. गांवकरी) : आषाढीवारी निमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान झालेल्या दिंडीतील वारकऱ्यांना चेकेवाडी येथील आदेश ग्रुपच्या वतीने चहा पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखीचे भक्तीमय स्वागत करत वारकऱ्यांना चहापाणी, शाल, दिंडी पताका देत पुष्पवृष्टी करत "ज्ञानोबा तुकाराम"च्या जयघोषात पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत होते. चेकेवाडी हा दिंडी मार्ग असल्याने शेकडो दिंड्या येथून जातात. बाल गोपाळांच्या आदेश ग्रुपचे हे दुसरे वर्ष आहे. आदेश ग्रुपचे सदस्य महेश वाघ, शुभम वाघ, हनुमान जिवडे, दत्ता शेळके, दीपक चेके, संदीप चेके, तुकाराम जीवडे, गणेश जिवडे, वैभव कोलते, बाबासाहेब कोलते, प्रतिक कोलते यांनी अथक परिश्रम केले. या सदस्यांना मऊ चेके, शुभम जिवडे, ऋषी जीवडे, आर्यन जीवडे, योगेश वाघ, अनिकेत औटी, बबलू चेके यांनी मोलाची साथ दिली.

### दूध डेरी चौरस्ता ते वाजेगाव पुलाच्या कामाची चौकशी करावी

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नांदेड लातूर महामार्गा क्रमांक ३६१ वरील दूध डेअरी चौरस्ता ते वाजेगाव लातूर फाटा चौरस्ता पुलाला तडे जाऊन भेगा पडल्या आहेत अर्थात या पुलाच्या दर्जाहीन कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित गुत्तेदार यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा पुलाचे काम रोखण्यात येईल असा इशारा माजी जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिला आहे. नांदेड लगत असलेला दूध डेअरी चौरस्ता ते वाजेगाव लातूर फाटा चौक या ठिकाणी महामार्ग उडाणपुलाचे काम पूर्ण होऊन या पुलावरून रहदारी अधाप चालू झाली नाही तरीही पुलांच्या भिंतीला मोठे तडे पडले आहेत. या कामासाठी वापरल्या जाणारे सिमेंटचा विटा परिपक्व झाल्या नसल्यामुळे ते दर्जेदार नसून ते कच्चा मातीचे आहेत ,त्यासाठी सदरील गुत्तेदार यांनी जनतेच्या जीविताचा विचार विचार न करता स्वतःच्या फायद्या साठी थातूरमातूर कामे करून करून जनतेचा जीव धोक्यात टाकला आहे. अनेक ठिकाणी तडे गेलेल्या काही ठिकाणी थातूरमातूर सिमेंट पाणी लावण्याचे काम चालू आहे. यावरून उद्या वाहतूक सुरू झाल्यावर पुल कोसळल्यास या कामाचा जिम्मेदार कोण? एसजीएस अभियांत्रिकी महाविद्यालय समोरील काही भाग उडाणपूलाचा दिनांक ९ जुलै रोजी सकाळी 10वाजताच्या सुमारास कोसळला आहे. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही,तसेच मुसलमान वाडी येथील पुलास अशाच प्रकारचे तडे जाऊन गट्टू बाहेर येत असल्याचे दिसत आहे. कामाच्या दर्जाच्या कामाची जबाबदारी कोण घेणार आणि प्रसंगी मोठी जीवितहानी झाल्याचा जबाबदार कोन असेल अशी संतप्त प्रतिक्रिया माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिली आहे. या पुलाच्या दर्जाहीन कामाची उच्चस्तरीय चौकशी होऊन सदरील पुलाचे काम दर्जेदार करण्यात यावे अन्यथा पुलाचे काम रोखण्यात येईल असा इशारा वाजेगाव जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मनोहर शिंदे यांनी दिला आहे.

# प्लंबिंग कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम वर्गाचे उद्‌घाटन

ठाणे : कल्याण (स. गांवकरी)

छत्रपती शिक्षण मंडळ संचलित अभिनव विद्यामंदिर, पारनाका, कल्याण (पश्चिम) आणि ज्ञानदा प्लंबिंग गुरुकुल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांना रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या दोन महिन्यांच्या प्लंबिंग कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा भव्य उद्‌घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी आमदार मा. श्री. नरेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री. ना. के. फडके हे होते.

यावेळी कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नवोपक्रम मंत्री मा. श्री. मंगल प्रभात लोढा यांनी शुभेच्छा संदेश पाठवून या अभिनव







च्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले तसेच युवकांच्या कौशल्य विकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक मा. श्री. संपत आनंदा गिते यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, या प्रशिक्षणामुळे कल्याण परिसरातील युवकांना दर्जेदार कौशल्य शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि हमखास रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात "कौशल्यातून रोजगार आणि रोजगारातून आत्मनिर्भरता" हा संकल्प साकार करण्यासाठी अशा प्रकारचे कौशल्याधारित प्रशिक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे युवकांना उद्योगविश्वात प्रवेश करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या रोजगारक्षमतेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमास स्थानिक लोक, माजी मुख्याध्यापक , शिक्षक , विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्‌घाटन समारंभ मोठ्या उत्साहात, दिमाखदार आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

यानंतर ज्ञानदा प्लंबिंग गुरुकुलचे संचालक मा. श्री. मिलिंद डांगे यांनी प्रशिक्षण अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ज्ञानदा प्लंबिंग गुरुकुलच्या या उपक्रमात अभिनव विद्यामंदिर, पारनाका हे दहावे प्रशिक्षण केंद्र म्हणून कार्यरत झाले आहे. या प्रशिक्षणाची विशेष बाब म्हणजे हा दोन महिन्यांचा निवासी कौशल्य विकास अभ्यासक्रम आहे. पहिल्या महिन्यात अभिनव विद्यामंदिर, कल्याण येथे विद्यार्थ्यांना प्लंबिंगचे सखोल ज्ञान, आधुनिक उपकरणांचा वापर आणि प्राथमिक प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या महिन्यात पुणे येथील ज्ञानदा प्लंबिंग गुरुकुल येथे प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणात प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव मिळून रोजगार तसेच स्वयंरोजगाराच्या संधी अधिक सुलभ होतील.

या समारंभास माजी आमदार मा. श्री. नरेंद्र पवार, ज्ञानदा प्लंबिंग गुरुकुलचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अभय थिटे, संचालक मा. श्री. मिलिंद डांगे, जनसंपर्क अधिकारी मा. श्री. सोमनाथ कुलकर्णी, कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष मा. श्री. मोहन आघारकर, कल्याण जनता सहकारी बँकेचे संचालक मा. डॉ. श्री. चंद्रशेखर तांबडे, नगरसेवक मा. श्री. अमित धाक्रस यांच्यासह संस्थेचे कार्यकारिणी सदस्य मा. श्री. मिलिंद कुलकर्णी तसेच शालेय समिती सदस्य मा. श्री. बाबा जोशी, मा. श्री. विवेक वाणी आणि मा. श्री. शरद चासकर उपस्थित होते.

## मराठवाड्यात विकासाची मोठी सुप्तशक्ती : माधव भंडारी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

"मराठवाड्याच्या विकासास डॉ. शंकरराव चव्हाण यांनी दिलेल्या योगदानामुळे मराठवाड्याची स्थिती भीषण होण्यापासून वाचली. सिंचनाशिवाय मराठवाड्यातील शेतीच्या विकासाची शक्यता नव्हती, हे ते जाणून होते. त्यांच्या संकल्पनेतूनच जायकवाडी, विष्णुपुरी हे प्रकल्प पूर्ण झाले. मराठवाड्याकडे सुपीक जमीन, उपलब्ध जलसंपदा, कुशल मनुष्यबळ, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनाची मोठी क्षमता आहे. कृषी, कृषी प्रक्रिया उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान आणि वारसा पर्यटन यांची प्रभावी सांगड घातल्यास मराठवाडा हा महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' ठरू शकतो", असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) माधव



भंडारी यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'मराठवाडा : काल, आज व उद्या' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. प्रशांत पेशकार आणि नारायण चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शहापूर पंचायत समिती वर पाण्यासाठी ग्रामस्थांचा मोर्चा

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हा प्रतिनिधी/धरण आमच्या उशाला कोरड आमच्या घशाला', 'कोण म्हणतो देणार नाय घेतल्या शिवाय राहणार नाय' अशा घोषणांचा गजर करीत तालुक्यातील आवरे गावच्या महिलांनी आज पाण्यासाठी शहापुर पंचायत समितीवर धडक दिली. जलजीवन मिशन योजनेंतर्गत भातसा नदीवरून राबविण्यात आलेली पाणी योजना वीज जोडणी अभावी सुरू झाली नसल्याने पावसाळ्यातही पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने त्रस्त झालेल्या आवरे येथील महिलांनी आमरण उपोषणाचा इशारा देत पंचायत समितीसमोर ठिय्या मांडला. प्रशासनाने पंधरा दिवसात वीज जोडणीचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

भातसा धरणाच्या पायथ्याशी असलेल्या आवरे गावासाठी जलजीवन मिशन योजनेंतर्गत



### प्रशासन दणाणले नागरिक संतापले

भावली पाणी योजना राबविण्यात येत होती. मात्र निधी अभावी जलजीवन योजना ठप्प झाल्याने आवरे गावात पाणीटंचाई चे दुर्भिक्ष निर्माण झाले होते. ग्रामस्थांच्या मागणीनंतर भातसा नदीवरून पाणी योजना राबविण्यात आली मात्र योजना पूर्ण होऊनही गेल्या दोन वर्षांपासून वीज जोडणी रखडली होती. वीज जोडणी संदर्भात प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने अखेर आवरे गावातील महिलांनी आज शहापुर पंचायत समितीवर धडक दिली. पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता विजया पांढरे यांनी वीज वितरण विभागाशी संपर्क साधून आवरे पाणी योजनेला वीज जोडणी संदर्भात महिती देऊन योग्य उपाययोजना करून देण्याबाबत सांगितले. याबाबत उपअभियंता पांढरे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंधरा दिवसात वीज जोडणी करून देण्याचे स्पष्ट केले असल्याचे सांगितले. त्यानुसार वीज जोडणी नंतर योजना कार्यान्वयीत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर पाण्यावाचून त्रस्त झालेल्या आवरे येथील उपोषणकर्ते निवृत्ती पाटील, अशोक घरात व महिलांनी उपोषण मागे घेतले.

## 'एआय'ला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन बनवा

*विवेक सावंत यांचे प्रतिपादन; पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव उत्साहात*

पुणे : (स. गांवकरी)

"आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) आहे. एआयला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन म्हणून स्वीकारा. तंत्रज्ञान नोकऱ्या संपवत नाही, तर नव्या प्रकारच्या रोजगारसंधी निर्माण करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि करिअरच्या नव्या वाटांचा शोध घेत कौशल्याधारित शिक्षण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल)चे संस्थापक-संचालक विवेक सावंत यांनी केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सवी २५ व्या वर्धापनदिवस सोहळ्यात सावंत बोलत होते. कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात आयोजित सोहळ्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, खजिनदार कृष्णाजी कुलकर्णी, संस्थेचे



संचालक सुनील रेडेकर, पौर्णिमा लिखिते, रमेश कुलकर्णी, राजेंद्र कडूसकर, महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य प्रा. रेखा जोशी, प्रा. डॉ. स्वाती जोशी आदी उपस्थित होते. विवेक सावंत म्हणाले, "मानवी बुद्धी ही 'यूज इट ऑर लूज इट' या तत्त्वावर कार्य करते. त्यामुळे साचेबंद विचारांमध्ये अडकून न राहता समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि कौशल्ये विकसित करा. यंत्रांसारखे काम करू नका; एआयचा वापर स्वतःची विचारशक्ती अधिक सक्षम करण्यासाठी करा. शिक्षण आणि रोजगार क्षेत्रातील हा संक्रमणाचा काळ आहे. सामाजिक माध्यमांचा अनावश्यक वापर कमी करून मेहनत, संयम, टीम स्पिरिट आणि सॉफ्ट स्किल्स विकसित करा. कौशल्याधारित, उद्योगाभिमुख आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षणामुळे भविष्यातील रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतील. समाजासाठी उपयुक्त आणि उत्पादक ज्ञान मिळविण्यावर भर द्या." डॉ. पराग काळकर म्हणाले, "शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल होत असून पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच तंत्रज्ञानयुक्त, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज वाढली आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे ज्ञानाचे कृतीत रूपांतर करण्यावर भर दिला जात आहे. शिक्षणसंस्थांनी पदवी आणि उद्योगातील अनुभव यांचा प्रभावी मेळ घालून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. नव्या व्यवस्थेच्या गरजा ओळखून सक्षम, कुशल आणि उद्योगस्नेही मनुष्यबळ तयार करणे ही काळाची गरज असून, शिक्षणसंस्थांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा." परशुराम वाडेकर म्हणाले, "परिस्थिती सुधारायची असेल, तर चांगले शिक्षण घेणे गरजेचे आहे. पुणे विद्यार्थी गृहाने गेल्या शंभर वर्षात लाखो गरीब व गरजू विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले आहे.

संस्थेच्या कार्याला पूरक काम करीत विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयानेही रोजगारक्षम व उद्योगाभिमुख युवकांच्या पिढ्या घडवल्या आहेत. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी सोहळा सर्वत्र उत्साहात साजरा व्हावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

## अक्कलकोट मतदारसंघाच्या रस्ते विकासाला मोठी गती मिळणार

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था सुधारावी, गावागावांतील दळणवळण अधिक सुरक्षित आणि गतिमान व्हावे तसेच शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार रस्त्यांची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हे सातत्याने महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करत असून प्रत्येक कामासाठी निधी मिळवून ते कामे पूर्ण करून घेत आहेत. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या

या प्रयत्नांना यश मिळाले असून महाराष्ट्राच्या ग्रामविकास विभागाच्या ३०५४ व २४१९ लेखाशीर्षांतर्गत तब्बल ₹९ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर झाला असून, मतदारसंघातील २१ महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा, मजबुतीकरण, दुरुस्ती तसेच आवश्यक त्या ठिकाणी सी.डी. वर्कची कामे हाती घेण्यात येणार आहेत. अशी माहिती आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी दिली. या निधीमुळे गोगाव,

■ तब्बल 9 कोटी 50 लाखांचा निधी उपलब्ध

दर्शनाळ, धोत्री, संजवाड, हालहळ्ळी, मुळेगाव तांडा, मुस्ती, कुंभारी, दोड्याळ, किणी, भोसगे, बादोला, किणीवाडी, गौडगाव, कोळेकरवाडी, बणजगोळ, नागणसूर यासह अनेक गावांतील रस्ते अधिक दर्जेदार होणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील रस्ते सुधारतील, शेतीमालाची वाहतूक सुलभ होईल, विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित बनेल आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. ग्रामीण विकासाला चालना देणारा हा निधी अक्कलकोटच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच महत्त्वाचा ठरणार आहे. असेही आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी म्हणाले या विकासकामांसाठी सहकार्य करणारे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री . एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री . सुनेत्रावहिनी अजितदादा पवार तसेच ग्रामविकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री कुमारजी यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# "आश्रमशाळा मुख्याध्यापक पदोन्नती हक्कासाठी राज्य मुख्याध्यापक संघाचा लढा..!"

मुंबई : (स. गांवकरी)

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी 28 जुलैपर्यंत माध्यमिक मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीच्या निवेदनावार निर्णय घेण्याच्या आदेशाचे पालन करावे, अन्यथा सचिवांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये त्यावर स्पष्टीकरण मागण्यात येईल, असा इशारा मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. एम एस कार्निक आणि न्या. एस एम मोदक यांनी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाच्या अवमान याचिकेच्या सुनावणी वेळी दिला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाच्यावतीने अॅड . सईद शेख यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत म्हटले आहे की आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत माध्यमिक मुख्याध्यापकांना अनेक वर्षांपासून पदोन्नतीची कोणतीही प्रभावी संधी उपलब्ध नसल्याच्या गंभीर प्रश्नावर महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाने सातत्याने पाठपुरावा केला आहे. याच विभागातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, प्राथमिक मुख्याध्यापक, गृहपाल तसेच विविध प्रशासकीय पदांवरील कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नतीचे मार्ग उपलब्ध असताना, माध्यमिक मुख्याध्यापकांना मात्र पदोन्नतीच्या संधींपासून वंचित ठेवण्यात आल्याने संघाने या अन्यायकारक व असमान परिस्थितीविरुद्ध शासनाकडे दाद

संघाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रश्न शासन आणि न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडला गेला आहे. आता आदिवासी विकास विभागाने उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून निवेदनावर तातडीने, कारणयुक्त आणि न्याय्य निर्णय घ्यावा, अशी राज्यातील मुख्याध्यापकांची अपेक्षा आहे. न्यायालयीन लढाईसाठी संघाचे राज्य अध्यक्ष श्री.वामन रिंगणे,सचिव श्री.अनिल कांबळे,कार्याध्यक्ष श्री.गणेश गावडे.व राज्य कमिटी पदाधिकारी हे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या निकालामुळे आदिवासी विकास विभागातील हजारो मुख्याध्यापकांना पदोन्नतीचा लाभ मिळणार आहे.

मागितली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाने दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांकडे सविस्तर निवेदन सादर केले होते. या निवेदनात विद्यमान पदोन्नती व्यवस्था रद्द करून संविधानाच्या समता तत्त्वाशी सुसंगत, न्याय्य व सर्वसमावेशक पदोन्नती योजना तयार करण्याची मागणी करण्यात आली. माध्यमिक मुख्याध्यापकांना त्यांच्या समकक्ष वर्ग-ब पदांवर, विशेषतः सहायक प्रकल्प अधिकारी पदावर प्रतिनियुक्ती अथवा पदोन्नतीची संधी तसेच पुढील वरिष्ठ पदांपर्यंत पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, या निवेदनावर दीर्घकाळ कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे संघाला मुंबई उच्च न्यायालयात अॅड. सईद शेख यांच्यामार्फत रिट याचिका दाखल करावी लागली. दिनांक १८ मार्च २०२५ रोजी न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे यांच्या खंडपीठाने संघाची बाजू ऐकून घेतली. न्यायालयाने प्रकरणाच्या गुण-दोषांवर मत व्यक्त न करता, आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना संघाच्या दिनांक ३ जानेवारी २०२४ च्या निवेदनातील तक्रारींचा विचार करून आठ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले. सर्व पक्षांचे मुद्दे खुले ठेवून याचिका निकाली काढण्यात आली. तथापि, उच्च न्यायालयाने निश्चित केलेली आठ आठवड्यांची मुदत संपल्यानंतरही संबंधित निवेदनावर निर्णय घेण्यात आला नाही. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाने पुन्हा मुंबई उच्च न्यायालयात अॅड. सईद शेख यांच्यामार्फत अवमान याचिका दाखल केली. या अवमान याचिकेवर दिनांक ६ जुलै २०२६ रोजी न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती एस. एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राज्य शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या विनंतीनुसार न्यायालयाने प्रकरणाची पुढील सुनावणी २८ जुलै २०२६ रोजी ठेवली. त्याचबरोबर, पुढील तारखेपर्यंत आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचे पालन करून निर्णय घ्यावा, अशी स्पष्ट अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली. न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, पुढील तारखेपर्यंत आदेशाचे पालन झाले नाही, तर आदिवासी विकास विभागाच्या सचिवांकडून त्याबाबत स्पष्टीकरण मागविण्याचा विचार केला जाऊ शकतो आणि आवश्यकतेनुसार त्यांना न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे निर्देशही दिले जाऊ शकतात. त्यामुळे मुख्याध्यापकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पदोन्नतीच्या प्रश्नाला आता निर्णायक वळण मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचा हा लढा केवळ काही व्यक्तींच्या पदोन्नतीपुरता मर्यादित नसून, राज्यभरातील आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये अनेक वर्षे जबाबदारीने सेवा बजावणाऱ्या माध्यमिक मुख्याध्यापकांना समान संधी, सेवेत प्रगती आणि न्याय्य वागणूक मिळवून देण्यासाठी आहे. मुख्याध्यापकांवर शाळेचे शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक नेतृत्व करण्याची मोठी जबाबदारी असतानाही त्यांच्या पुढील पदोन्नतीचा मार्ग बंद राहणे ही गंभीर विसंगती असल्याची संघाची भूमिका आहे.

# भावली धबधबा परिसरात पर्यटक कुटुंबावर थरारक हल्ला

## विनयभंग, लूट आणि जीवे मारण्याचा प्रयत्न, सात अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा

**इगतपुरी : (स. गांवकरी)**

इगतपुरी तालुक्यातील प्रसिद्ध भावली धबधबा परिसरात फिरण्यासाठी आलेल्या एका पर्यटक कुटुंबावर हल्ला करण्यात आल्याची घटना रविवार दि. १२ रोजी घडली होती. विनयभंग, लूटमार आणि जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी इगतपुरी पोलीस ठाण्यात सात अनोळखी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ. पुनम किरण भागवत (वय 44, रा. महालक्ष्मी सोसायटी, नाशिकरोड) हे आपल्या कुटुंबासह १२ जुलै रोजी सायंकाळी भावली खुर्द येथील धबधबा पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या दोन अनोळखी तरुणांनी त्यांच्याकडे पाहून शिट्ट्या वाजवल्या. फिर्यादीचे पती किरण रामचंद्र भागवत यांनी याबाबत जाब विचारल्यानंतर आरोपी संतप्त झाले. फिर्यादीनुसार, संबंधित तरुणांनी इतर साथीदारांना बोलावून भागवत कुटुंबाला दमदाटी केली आणि धक्काबुक्की केली. त्यामुळे हे कुटुंब तेथून कारने निघाले. मात्र आरोपींनी पांढऱ्या रंगाच्या बलेनो कार (MH 46 BE 3721) आणि हिरो मोटारसायकल (MH 15 KA 4502) वरून त्यांच्या वाहनाचा पाठलाग केला. घोटी टोलनाका पुढे मुंबई-आग्रा महामार्गावर आरोपींनी बांबूच्या काठ्या, बेसबॉल स्टिक आणि लोखंडी रॉडच्या साहाय्याने कार अडवून तिच्या काचा फोडल्या. यावेळी फिर्यादीच्या छातीला हात लावून तिचा विनयभंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच फिर्यादीची जाऊ कोमल सागर भागवत हिचा दिड लाखाचा सॅमसंग S24 अल्ट्रा मोबाईल फोन आणि फिर्यादीचे पती किरण भागवत यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांची सोन्याची चैन हिसकावून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



ठाणे : दिवा शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बी.आर. नगरच्या नागरी समस्यांसाठी सहाय्यक आयुक्तांना निवेदन देण्यात आले. गटारांची नियमित साफसफाई, धोकादायक झाडांची तातडीने छाटणी/तोडणी, पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था, जेष्ठ नागरिकांसाठी सुरक्षित चालण्याचे रस्ते, पुरेशी स्ट्रीट लाईट आणि बसण्याची व्यवस्था आदी मागण्यासाठी निवेदन देण्यात आले प्रसंगी श्रावणी संतोष कदम (शाखा संघटिका), प्रियंका सावंत, शशिकांत कुंभारगण, संतोष कदम, नितीन सावंत व राजकुमार गुप्ता आदी उपस्थित होते.

**(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...



### पादलखडी गावात पोलिसांचा छापा

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सुबीर तालुक्यातील पाडळखडी गावात सुबीर पोलिसांनी कारवाई करत ₹15,810 किमतीचा विदेशी मद्यसाठा जप्त केला आहे. गुजरातमध्ये कडक दारूबंदी कायदा लागू असतानाही बेकायदेशीर मद्यविक्री सुरू असल्याचे या कारवाईतून पुन्हा समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 13 जुलै 2026 रोजी पोलिसांचे पथक गस्त घालत असताना स्थानिक रहिवासी मनाभाई सीताराम गवळी हे आपल्या घरात आणि मागील शेतात विदेशी मद्य लपवून त्याची विक्री करत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे सुबीर पोलिसांनी तातडीने छापा टाकला. शेत परिसरात केलेल्या तपासणीदरम्यान भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या एकूण 174 बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत ₹15,810 असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी पोलिस शिपाई एस. एस. ठाकरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी मनाभाई सीताराम गवळी यांच्याविरुद्ध गुजरात प्रोहिबिशन कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सुबीर पोलीस पुढील तपास करत आहेत.

### किल्ले शिवनेरीवरील कडेलोट भोवती व संरक्षक भिंतीचे मोठे नुकसान



शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरी गडावर दि. १ जुलै ते ५ जुलै पर्यंत झालेल्या अतिवृष्टी मुसळधार पावसामुळे कडेलोट भोवती असणारी भिंत व महत्त्वाची संरक्षक भिंतीचे मोठे नुकसान झाले आहे. किल्ले शिवनेरी येथे अतिक्रमण होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासनाकडून कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलेल्या संरक्षक भिंतीचे दगड व इतर साहित्य अतिवृष्टी पावसामुळे वाहून गेले आहेत .शिवनेरीवर झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे त्यामुळे ठिकठिकाणी संरक्षण भिंत वाहून मोठे नुकसान झालेले आहेत .या ठिकाणावरील अनेक कॉंक्रिटीच्या वाहून गेले आहेत गडाच्या पूर्वेला बारव भाग व इतर बाजूची संरक्षण भिंत यांचे मोठे नुकसान व पडझड झालेली आहे .याबाबत महाराष्ट्र शासन , केंद्र सरकार , वनविभाग व पुरतत्व विभाग काय निर्णय घेते याकडे सर्व नागरिकांचे व शिवभक्तांचे लक्ष लागलेले आहे.

### महानगरपालिकेत आयुक्त विरुद्ध सभागृह नेता यांच्यात वाद पेटणार

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर महानगरपालिकेत आयुक्त विरुद्ध सभागृह नेता यांच्यात वाद पेटणार आहे. आदिला नदीवरील सर्व अतिक्रमणे हटविण्याची सोलापूरकरांची मागणी आहे तर आदिला नदी पात्रातील अतिक्रमणे काढण्यात येऊ नये अशी सभागृह नेते नरेंद्र काळे यांची मागणी असून आयुक्त सचिन ओम्बासे हे जनतेच्या तक्रारी नुसार आदिला नदी वरील अतिक्रमणे काढून टाकण्या विषयी सकारात्मक आहेत. सोलापूर मध्ये ७४ नैसर्गिक नाले आहेत विकासाच्या नावाखाली सोलापूरकरांच्या जीवाशी खेळ सुरू असून सभागृह नेत्याचा खेळ आदिला नदीवरील अतिक्रमणांना कायम करण्याचा आहे. सोलापूर शहरातील ७४ नैसर्गिक नाले, ओढे आणि आदिला नदी यांचा विषय हा केवळ राजकारणाचा नाही, तर लाखो सोलापूरकरांच्या जीवित, सुरक्षितता आणि भविष्यासाठी अत्यंत संवेदनशील विषय आहे. त्यामुळे या विषयाकडे केवळ राजकीय गुणाकार-वजाबाकीच्या दृष्टीने न पाहता, कायदा, तांत्रिक अहवाल आणि सार्वजनिक हित या निकषांवर पाहणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी या विषयावर विशेष सभा बोलावण्याचा आग्रह धरला आहे. मात्र, विशेष सभा बोलावण्याचा अधिकार कोणाला आहे, त्याची कायदेशीर प्रक्रिया काय आहे, हा वेगळा विषय आहे. सभागृह नेत्यांची भूमिका प्रामुख्याने सभागृहातील कामकाजाशी संबंधित असते; तर शहर विकासासंदर्भातील धोरणात्मक आणि प्रशासकीय निर्णय हे संबंधित वैधानिक प्रक्रियेनुसार घेतले जातात.

### वर्षाजल संधारणासाठी ठाणे महापौर व आयुक्तांचे नागरिकांना आवाहन

ठाणे (स. गांवकरी) : आज जपून ठेवलेला पाण्याचा प्रत्येक थेंब, भविष्यातील पाणी टंचाई टाळेल असा संदेश देत ठाणे महानगरपालिकेने शहरातील नागरिक, गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक आस्थापनांना वर्षाजल संधारण (Rain Water Harvesting) प्रणाली प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. हवामानातील बदल, 'एल निनो'सारख्या जागतिक हवामानविषयक घटनांमुळे अनियमित पाऊस यामुळे भविष्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. प्रत्येक इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करून ते भूजल पुनर्भरणासाठी वापरणे ही काळाची गरज बनली आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य वापर केल्यास भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते.

# धन संस्थेचे पहिले शेअर मार्केट प्रशिक्षण केंद्र मुरबाडमध्ये सुरू

## कृष्णा आगिवले यांची शेअर मार्केट क्षेत्रात झेप!

**मुरबाड : (स. गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक-युवती आणि बेरोजगारांना शेअर मार्केटचे ज्ञान व करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने धन संस्थेचे पहिले शेअर मार्केट प्रशिक्षण केंद्र मुरबाड शहरात सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्राची स्थापना कृष्णा पांडुरंग आगिवले यांच्या माध्यमातून करण्यात आली असून, मुरबाड तालुक्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

'धन' ही भारतातील आघाडीच्या ट्रेडिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असून, महाराष्ट्रभर या संस्थेची १०० हून अधिक प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. मात्र ग्रामीण भागात अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसल्याने अनेक इच्छुक युवकांना शेअर मार्केटचे व्यावसायिक शिक्षण




घेणे कठीण जात होते. ही उणीव दूर करण्यासाठी मुरबाडमध्ये धन संस्थेची पहिली शाखा सुरू करण्यात आली आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय गोरेगाव येथे आहे. या प्रशिक्षण शाखेचे उद्घाटन प्रकाश विशे (१.५ कोटी रुपयांचे गुंतवणूकदार) यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी दिलीप घोरड, शिवाजी तिवरे, भरत टोहके, दिगंबर आगिवले, विष्णू गायकर, डॉ. धनेश मुरबाडे, विकास लाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन कृष्णा आगिवले यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील युवकांना आर्थिक साक्षरतेसह शेअर मार्केटमध्ये करिअर घडविण्यासाठी हे केंद्र निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आणि आगिवले यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रशिक्षण केंद्रामार्फत धन संस्थेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शेअर मार्केटचे तीन दिवसांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. शेअर मार्केटमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी अधिक माहितीसाठी कृष्णा आगिवले – ७३५०१३७१७१, भरत दळवी – ९५९४१९०५५४ आणि भरत टोहके – ९२०९६७४११६ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# लेखापाल तथा लेखापरीक्षक श्रेणि क या पदावर नियुक्ती होऊनही पद रिक्त

**शिवनेरी : (स. गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद येथे लेखापाल तथा लेखापरीक्षक श्रेणि क या पदावर अ ब क या अधिकाऱ्याची जुन्नर नगरपरिषद येथे नियुक्ती होऊ नये पद रिक्त असल्यामुळे नगरपरिषदेचा या पदाचा कारभार ठप्प झाला आहे . मतदार यादी पुनरीक्षण या कार्यामुळे जुन्नर नगरपरिषद मधील सर्व अधिकारी व्यस्त आहेत . ऐन वेळेस लेखापाल अधिकारी रुजू होत नसल्यामुळे नगरपरिषद मधील सर्व विभागाची कामे ठप्प आहेत . यामुळे जुन्नर शहरातील नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे . लेखापाल तथा लेखापरीक्षक अ ब क या पदावर रुजू का होत नाही ?. याबाबत जुन्नर शहरातील नागरिकांमध्ये उलट - सुलट चर्चा सुरू झाली आहे . लेखापाल तथा लेखापरीक्षक हे पद रिक्त असल्यामुळे जुन्नर शहरातील पदाची सर्व कामे ठप्प झाली आहेत . यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे . अ ब क या अधिकाऱ्याला जुन्नर नगरपरिषद मध्यन्नर दिनांक १/ ७ / २०२६रुजू व्हावे असा आदेश आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय अभिषेक कृष्णा भा. प्र. से. यांनी आदेश दिले आहेत.

**या पदावर पंधरा दिवस होऊनही या पदाचा अधिकारी राजु होत नसेल तर दुसरा अधिकारी या पदावर रुजू करावा अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.**

# सीसी रस्त्याच्या कामाविरोधात ग्रामस्थांचा संताप

**डांग, गुजरात : (स. गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील सुबीर तालुक्यातील लवचाळी ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या सिमेंट कॉंक्रीट (सीसी) रस्त्याच्या कामावर ग्रामस्थांनी गंभीर आक्षेप घेतला आहे. रस्त्याच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्याच्या काळातही घाईघाईने रस्त्याचे काम पूर्ण केले जात आहे. बांधकामात सिमेंट, खडी आणि इतर आवश्यक साहित्य योग्य प्रमाणात वापरले जात नसल्यामुळे रस्त्याच्या गुणवत्तेवर आणि टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

■ उच्चस्तरीय चौकशीची मागणी

स्थानिकांचे म्हणणे आहे की, सुरुवातीपासूनच अशा प्रकारची निष्काळजीपणा होत असेल तर हा नवा रस्ता अल्पावधीतच खराब होण्याची शक्यता आहे. तसेच, कोणतेही तांत्रिक निकष न पाळता मातीवरच सीसी रस्ता टाकण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.ग्रामीण विकासासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी दिला जात असताना, या कामात सरकारी निधीचा गैरवापर आणि भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संतप्त ग्रामस्थांनी संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी करावी, वापरलेल्या साहित्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत आणि अनियमितता किंवा भ्रष्टाचार आढळल्यास संबंधित कंत्राटदार तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. आता या गंभीर आरोपांवर सुबीर तालुका पंचायत प्रशासन काय भूमिका घेते आणि पुढे कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेरेकरपाडा अंडरपासच्या विलंबाने घेतला आणखी एक बळी

## शेरेकरपाडा अंडरपासचे काम प्रलंबित; मागण्या ठरल्या फोल, नागरिकांचा संतप्त सवाल

**भिवंडी : (स. गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील शेरेकरपाडा येथील प्रलंबित अंडरपासच्या प्रश्नामुळे आणखी एका निष्पाप शेतकऱ्याच्या जीवाचा बळी गेल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. पडघा आठवडा बाजारात जात असताना पडघा येथिल नाशिक-मुंबई महामार्ग ओलांडताना झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेरेकरपाडा येथील शेतकरी रामचंद्र शंकर बनकर (वय ७५) हे सकाळी पडघा आठवडा बाजारात जात असताना पडघा ,शेरेकरपाडा परिसरातील मुंबई–नाशिक महामार्ग ओलांडत होते. त्यावेळी एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने पडघा येथिल खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक झाल्याने पुढील उपचारासाठी मुंबईतील सायन रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मावळली.



या घटनेनंतर शेरेकरपाडा परिसरासाठी प्रस्तावित भुयारी मार्ग (अंडरपास) अद्यापही अपूर्ण असल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. "जर हा अंडरपास वेळेत बांधण्यात आला असता, तर आज हा निष्पाप जीव वाचला असता," असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

सुमारे एक वर्षभरापूर्वी मुंबई–नाशिक महामार्गावरील विविध प्रलंबित प्रश्नांसाठी शिवसेना (ठाकरे गट), मनसे तसेच विविध सामाजिक संघटनांनी पडघा टोल नाक्यावर आंदोलन छेडले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) संबंधित अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. आंदोलनानंतर अनेक मागण्या तत्त्वतः मान्य करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये परिसरातील गावांसाठी भुयारी मार्ग उभारण्याचाही समावेश होता. मात्र एक वर्ष उलटूनही शेरेकरपाडा येथील अंडरपासचे

"आज येथे भुयारी मार्ग असता तर एका निष्पाप शेतकऱ्याचा जीव वाचला असता. प्रशासनाने आमच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष केले आहे. निदान यापुढे तरी आणखी जीवितहानी टाळण्यासाठी शेरेकरपाडा येथील अंडरपासचे काम तातडीने पूर्ण करावे."

**– विकास थेटे, ग्रामस्थ, शेरेकरपाडा.**

काम सुरू झालेले नाही. त्यामुळे , मुंबई–नाशिक राष्ट्रीय महामार्ग (क्र. ३) प्राधिकरणाने नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. "अजून किती निष्पाप जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.या दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी संबंधित ठिकाणी तातडीने अंडरपास उभारावा तसेच सुरक्षित वाहतुकीसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. तसेच प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

# जाग मोहनदरी आश्रमशाळा प्रकरण व्यवस्था जागी; पण खूप उशीराने!

## नववीतील विद्यार्थिनीच्या मातृत्वाने प्रशासन, प्रकल्प व्यवस्था आणि लोकप्रतिनिधींचे 'वस्त्रहरण'; आता चौकशी की केवळ घोषणा?

**कळवण : (स. गांवकरी)**

कळवण तालुक्यातील मोहनदरी शासकीय आदिवासी आश्रमशाळेत नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीने बाळाला जन्म दिल्याची घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण राज्य हादरले आहे. ही घटना केवळ एका मुलीच्या आयुष्याशी संबंधित नसून, आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उभारलेल्या संपूर्ण यंत्रणेच्या अपयशावर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे.

ही बाब माध्यमांमधून समोर येताच प्रशासन, कळवण प्रकल्प कार्यालय, आश्रमशाळा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी खडबडून जागे




झाले. शाळेला भेटी, संताप व्यक्त करणे, चौकशीच्या घोषणा आणि कारवाईच्या मागण्या सुरू झाल्या. मात्र नागरिकांचा प्रश्न आहे की, हे सर्व आज का? आधीच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे, आरोग्याकडे आणि देखरेखीकडे गांभीर्याने लक्ष दिले असते, तर आज अशी वेळ आली असती का?

ज्या वयात विद्यार्थिनीच्या हातात वही, पुस्तक आणि पेन असायला हवे होते, त्या वयात तिच्या हातात मातृत्वाची जबाबदारी आली. छत्रपती,महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, जिजाऊ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून स्त्री सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र आजच्या व्यवस्थेने त्या शिक्षणाच्या वयातच एका अल्पवयीन मुलीच्या वाट्याला मातृत्व आणले, अशी संतप्त भावना समाजातून व्यक्त होत आहे.

जर आश्रमशाळेतील देखरेख व्यवस्था प्रभावी असती, नियमित आरोग्य तपासण्या झाल्या असत्या, विद्यार्थिनीतील शारीरिक बदलांची वेळेत दखल घेतली गेली असती आणि लोकप्रतिनिधींनी आश्रमशाळांवर सातत्याने लक्ष ठेवले असते, तर आज ही घटना घडली नसती, असे मत पालक आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

या प्रकरणात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत—

विद्यार्थिनीची नियमित आरोग्य तपासणी झाली होती का?

गर्भधारणा अनेक महिने कोणाच्याच लक्षात कशी आली नाही?

मुख्याध्यापक, महिला अधीक्षिका, शिक्षक, वसतिगृह कर्मचारी आणि संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली का?

प्रकल्प अधिकारी आणि संबंधित विभागाने देखरेख केली होती का? पालकांना योग्य वेळी माहिती का देण्यात आली नाही?

हे सर्व प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. या प्रकरणात तालुक्याच्या माजी मंत्री डॉ भारतीताई पवार व कळवणचे आमदार नितीन भाऊ पवार यांनी संबंधितांवर निलंबनाची मागणी केली असून, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका घेतली आहे. तसेच लोकसभेचे खासदार भास्कर भगरे यांनीही आश्रमशाळेला भेट देऊन संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. मात्र आता सर्वसामान्य जनतेचा प्रश्न आहे—चौकशी खरोखर निष्पक्ष होणार का? चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित मुख्याध्यापक, अधीक्षिका, जबाबदार शिक्षक, संबंधित डॉक्टर आणि इतर अधिकाऱ्यांना निलंबित केले जाणार का? की पुन्हा एकदा चौकशी समित्या, बैठका आणि माध्यमांसमोरील घोषणा यापुरतेच हे प्रकरण मर्यादित राहणार?

मात्र त्याचबरोबर विद्यार्थिनीच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांची भूमिका तपासून दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## पंढरपूर आषाढी वारीसाठी बाभुळगाव येथुन अनेक वारकरी सेवेसाठी रवाना

नवीन नांदेड (स. गांवकरी) : पंढरपूर आषाढी वारी साठी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथुन शंभर वारकरी सेवेसाठी रवाना झाले असून काळज ता.फलटण जिल्हा सातारा येथे दिंडीतील वारीसाठी पदयात्राव्दारे येणाऱ्या भाविकांसाठी ते अन्नदान छत्र उभारून तिन दिवस अन्नदान सेवा करणार आहेत. दरवर्षी प्रमाणे याही पाचव्या वर्षी बाबाराव मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाभुळगाव येथुन अनेक वारकरी 14 जुलै रोजी सकाळी 5 वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून खाजगी बसने रवाना झाले आहेत.यात आनंद पाटील म्हस्के,तुकाराम म्हस्के,संतोष मस्के,बाबु मस्के,नरबा मोरे ,माधव मस्के,माधव मोरे,काळबा मस्के,नागोराव मोरे, जगन्नाथ बोडके यांच्या सह शंभर वारकरी सेवेसाठी रवाना झाले या वेळी गावकऱ्यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. 14 जुलै रोजी निघालेली खाजगी बस वारकरी तुळजापूर,पंढरपूर दर्शन करून काळज ता.फलटण जिल्हा सातारा येथे बाभुळगावकर यांच्या वतीने अन्नदान छत्र उभारून अन्नदान सेवेसाठी ते रवाना झाले आहेत.भक्ती भय वातावरण मध्ये रामकृष्ण हरी, विठ्ठल नामाचा जयघोष करीत गावकऱ्यांनी निरोप दिला.

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीचे अर्ज मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील पात्र विद्यार्थ्यांनी शुक्रवार 24 जुलै 2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी जिल्हा कार्यालयात संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एन. पवार यांनी केले आहे. सन 2026 या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैदकीय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी 60 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनींना महामंडळाकडून ज्येष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार जिल्ह्यातील प्रथम 3 ते 5 विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे पुढीलप्रमाणे आवश्यक ती मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत. मार्कशिट, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन छायाचित्र, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकिटसह व जिल्हा व्यवस्थाकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज इत्यादी कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एन. पवार यांनी केले आहे.



## मारतळा ता. लोहा जी नांदेड येथे वृक्षा रोपण कार्यक्रम

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकी जोपासत एस.जी. जी.एस. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, विष्णुपुरी, नांदेडच्या च्या वतीने दिनांक 11 जुलै रोजी मारताळा येथे संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने मारताळा येथे विविध जातीच्या झाडाची रोपे लावण्यात आली. ज्यात जांभूळ,वड,पिंपळ,कडुनिंब, इत्यादी जातीच्या रोपाची लागवड करण्यात आली. संस्थेच्या त्या निर्माण स्थळ विभागामार्फत योग्य ठिकाणाची निवड करून तेथे रोपे लावण्यात आले. संस्थेच्या वतीने यावर्षी जवळपास दोनशे 200 रोपाची लागवड केली व गावकऱ्या मार्फत जोपासना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. कोकरे,अधिष्ठाता (नियोजन) डॉ.बीआर.बोंबडे, अधिष्ठाता (विद्यार्थी कल्याण) डॉ. माधव वैद्य,डॉ.अंकुश सावरकर स्थळ अभियंता साईनाथ ढगे , साईनाथ चिवडवार, गणेश पाटील, हरीशम उबळे, बुधराम डोंगरे , निवासी ग्रामस्थ व संस्थेतील अनेक कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदवून वृक्षारोपण केले.



## मंदार भारदे यांच्या मार्गदर्शनातून लोंढे पाटील यांनी घेतली भरारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : मोबाईल वरील गुपचा वाचन कट्टा माध्यमातून प्रा.डॉ.विश्वाधार देशमुख नंयांच्या समन्वयातून प्रेरणेचा प्रवास उपक्रमातील तरुण तेजांकित प्रसिद्ध भारतीय उद्योजक, हवाई पर्यटन तज्ज्ञ आणि मॅब एव्हिएशन (MAB Aviation) या खाजगी विमान व हेलिकॉप्टर सेवा पुरवणाऱ्या कंपनीचे संस्थापक व संचालक मंदार अनंत भारदे यांनी लोंढे पाटील यांचे हॉटेल छत्रपती येथे भेट देऊन सपत्नीक LP चहा & रगडा कॉफीचा आस्वाद घेऊन चर्चा केली. 12 जुलै26 रोजी प्रसिद्ध मराठी उद्योजक मॅब एव्हिएशन चे संस्थापक व संचालक मंदार भारदे यांनी सिडको येथील लोकप्रिय हॉटेल छत्रपती येथे सदिच्छा भेट दिली.यावेळी हॉटेल मालक एकनाथ लोंढे व बालाजी लोंढे तिरुपती लोंढे यांनी सपत्नीक सत्कार केला. यावेळी उपस्थित माजी समाज कल्याण अधिकारी बापू दासरी, प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख,नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, सारंग नेरलकर,पत्रकार तिरुपती घोगरे, लक्ष्मण रेवणवार, अर्जुन बेटकर,किशोर हंबर्डे यांच्या सह अनेक जण उपस्थित होते. मोबाईल वर मागील नऊ वर्षापासून प्रा.डॉ. विश्वाधार देशमुख यांच्या समन्वयातून वाचन कट्टा हा आगळा वेगळा उपक्रम चालवला जातो,त्या उपक्रमाची प्रेरणा घेऊन बालाजी लोंढे आणि तिरुपती लोंढे या दोन भावांनी मिळून कोरोनाच्या काळात ऑनलाईन भाजीपाला व्यवसाय व कोरोना काळानंतर हॉटेल व्यवसायात यश मिळवले. दैनंदिन व्यवहारातून वडील, काका, भाऊ यांच्या सह अन्य दहा जणांना रोजगार उपलब्ध झाला असून, चहा कॉफीचा आस्वाद घेण्यासाठी सिडको - हडको व ग्रामीणभागातील युवक, जेष्ठ नागरिक,महिला,येत असतात.

# रुग्णालयास सार्वजनिक आरोग्यमंत्री श्री. प्रकाश आबिटकर

- मा खासदार श्री श्रीकांतजी शिंदे साहेब यांची भेट
- रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विकासकामांना गती देण्याचे निर्देश



ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री. प्रकाशजी आबिटकर व मा. खासदार श्रीकांतजी शिंदे यांनी आज उल्हासनगर-३ येथील मध्यवर्ती रुग्णालयास भेट देऊन रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यावेळी , आमदार मा. श्री. कुमार आयलानी, आमदार मा. श्री. बाळाजी किणीकर, आमदार मा. सौ. सुलभा गायकवाड, उल्हासनगर महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. अर्धिनी निकम, आयुक्त श्री. मनीषा आहाळे, सहसंचालक (आरोग्य सेवा) डॉ. सुनिता गोल्हईत, उपसंचालक डॉ. अशोक नांदपुरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. भेटीदरम्यान मंत्री महोदयांनी रुग्णालयातील सुविधा, सुरू असलेली विकासकामे आणि भविष्यातील विस्तार योजनांचा आढावा घेत रुग्णांना अधिक दर्जेदार, आधुनिक व तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी पुढील महत्त्वपूर्ण निर्देश दिले.

मंत्री महोदयांचे प्रमुख निर्देश : २०२ खाटांवरून ४०० खाटांपर्यंत रुग्णालयाचा विस्तार करण्याबाबतचा शासन स्तरावरील प्रस्ताव पाठपुरावा करणे.

५० खाटांच्या क्रिटिकल केअर ब्लॉक (CCB) चे बांधकाम सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

मध्यवर्ती रुग्णालयात २० खाटांचे अतिदक्षता विभाग (ICU) सुरू करण्यासाठी प्रस्ताव त्वरित सादर करावा.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ व मध्यवर्ती रुग्णालय यांच्यातील समन्वय करार (MoU) लवकरात लवकर पूर्ण करावा.

रुग्णालयाच्या ताब्यातील जमिनीची मोजणी व नावावर हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. आवश्यक असल्यास तात्काळ मोजणी शुल्क भरून प्रक्रिया गतीमान करावी.

एमआरआय युनिट सुरू करण्यासाठी शासनस्तरावरील मंजुरी मिळताच काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी. मध्यवर्ती रुग्णालयात कॅथलॅब (Cath Lab) सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर शासनाकडे सादर करावा. मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व विकासकामांचा नियमित पाठपुरावा करून निर्धारित कालावधीत कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच उल्हासनगर व परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी मदत कक्ष

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

महिला शेतकऱ्यांना महसुली व मालमत्ताविषयक प्रकरणांमध्ये येणाऱ्या अडचणी तत्परतेने सोडवून त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकरी मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांच्या तक्रारींची प्राधान्याने दखल घेऊन संबंधित विभागांशी समन्वय साधत त्यांचे तातडीने निराकरण करण्यात येणार आहे. राज्य विधिमंडळाने नुकतेच 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' मंजूर केले असून, विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याचा त्यामागील उद्देश आहे. महिला शेतकऱ्यांना मालकी हक्काची कागदपत्रे, महसुली प्रकरणे, वारसाहक्क, मालमत्ताविषयक वाद तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

या पार्श्वभूमीवर जिल्हा स्तरावर स्वतंत्र मदत कक्ष उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली १२ जुलै रोजी झालेल्या बैठकीत महिला सक्षमीकरणासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. महिलांच्या विविध समस्या, उपलब्ध सुविधा, प्रशासनातील अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः महिला शेतकऱ्यांच्या महसुली आणि मालमत्ताविषयक प्रकरणांची जलद व सुलभ सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मदत कक्ष कार्यान्वित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. या निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आदेश जारी करून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकरी मदत कक्ष सुरू केला आहे.

## 'गोदाकाठचा महान कर्मयोगी' माहितीपटाचे प्रदर्शन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, भारताचे माजी गृहमंत्री, मराठवाड्याचे भाग्यविधाते आणि महाराष्ट्रात जलक्रांती घडवून कृषी विकासाला नवी दिशा देणारे डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित 'गोदाकाठचा महान कर्मयोगी' या माहितीपटाचे प्रदर्शन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये दि: १४ जुलै, २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, 'मराठवाडा : आज, काल आणि उद्या' या विषयावरील व्याख्यानासाठी उपस्थित असलेले ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापण परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ प्रशांत पेशकार, नारायण चौधरी जनसंपर्क अधिकारी अशोक कदम, डॉ. दिलीप चव्हाण तसेच विद्यापीठातील विभागप्रमुख, अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा, जलसिंचन क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानाचा, कृषी विकासासाठी केलेल्या कार्याचा आणि मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासातील त्यांच्या ऐतिहासिक भूमिकेचा प्रभावी वेध या माहितीपटातून घेण्यात आला. छायाचित्रकार विजय होकर्णे यांनी अनेक वर्षांच्या अभ्यासपूर्ण संशोधनातून आणि अथक परिश्रमातून साकारलेल्या या माहितीपटाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत कौतुक केले.

प्रदर्शनानंतर विजय होकर्णे यांनी माहितीपटाच्या निर्मितीमागील प्रेरणा, संशोधन प्रक्रिया आणि डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जीवनकार्याचे दस्तऐवजीकरण करताना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि ज्येष्ठ व्याख्याते माधव भंडारी यांच्या हस्ते छायाचित्रकार विजय होकर्णे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी या माहितीपटाला डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रेरणादायी कार्याला उजाळा देणारा आणि भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारा ऐतिहासिक दस्तऐवज असल्याचे गौरवोद्गार काढले.

## वडगाव समाधी स्थळी चव्हाण कुटुंबीयांसह अनेकांनी केले अभिवादन

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री श्रद्धेय कै. डॉ.शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड तालुक्यातील वडगाव समाधी स्थळी 14 जुलै रोजी खासदार अशोकराव चव्हाण यांच्या सह माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार ॲड,श्रीजया चव्हाण, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या सह चव्हाण कुटुंबीय यांनी व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या सह जिल्हा परिषद व मनपा पदाधिकारी यांच्या सहअनेकांनी समाधीस्थळी अभिवादन केले. 14 जुलै रोजी नांदेड तालुक्यातील वडगाव समाधी स्थळी कै.शंकररावजी चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पांनी सजावट करण्यात आली होती यावेळी प्रारंभी सकाळी 10 वाजता माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण,ॲड श्रीजया चव्हाण,सुजया चव्हाण, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर,मिनलताई खतगावकर यांच्या सह कुटूंबातील व परिवारातील सदस्य यांनी विधीवत पूजा केली यानंतर जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक निलभ रोहन, उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांच्या सह अनेकांनी समाधीस्थळी अभिवादन केले.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका महापौर सौ.कविता मुळे, माजी महापौर मंगला निमकर, माजी आ डि.पी.सावंत, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी चेअरमन गणपतराव तिडके, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मंगलाताई अंबुलगेकर, बि.आर.कदम, कृषी उत्पन्न बाजार समिती चेअरमन संजय लहानकर,माजी नगरसेवक बालाजी जाधव, संतोष पांडागळे, मनपा स्थायी सभापती, विरेंद्र सिंह गाडीवाले, नगरसेवक संजय पाटील घोगरे, प्रशांत अण्णा तिडके,सरजित सिंह गिल, गोविंदराव नागेलीकर ,प्रविण साले, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे,कल्याणकर, भाजपा कंधार अध्यक्ष बालाजी पांडागळे, मारोती शंखतिर्थकर , सरपंच गंगाधर शिंदे,डॉ.नरेश रायेवार, शिवराम लुटटे ,डॉ.अशोक कलंत्री, जनार्दन गुपीले,दलित मित्र माधव अंबटवार, राजन जेजोरे, रमेश तालीमकर,रमेश वाघमारे , सादिक मरखेलकर,यांच्या सह जिल्हायातील माजी जिल्हा परिषद सदस्य,मनपा व नपा ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांच्या सह अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दूध भेसळ कारवाईनंतर लाल व गिर गायींचे पालन करणाऱ्यांचे पलायन

मंचर : (स. गांवकरी)

- ग्रामीण भागात चर्चांना उधाण



मंचर येथील गाजलेल्या दूध भेसळ प्रकरणावर अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईनंतर आंबेगावसह पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात लाल गाई व गिर गाईंचे पालन करणाऱ्या काही व्यावसायिकांनी काढता पाय घेतल्याची चर्चा रंगू लागली आहे.कारवाईची धास्ती आणि तपासाची व्याप्ती वाढत असल्याने काहीजणांनी आपले व्यवसाय व जनावरे इतरत्र हलवल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. गिर गायींच्या दुधाला बाजारात मोठी मागणी असली, तरी एका गायीपासून प्रत्यक्षात किती दूध मिळते, उपलब्ध गायींची संख्या आणि बाजारात विक्रीसाठी दाखविले जाणारे दूध यामधील तफावत यावर आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दूध उत्पादनाचे दावे आणि प्रत्यक्ष उपलब्धता याबाबतही विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, या चर्चांबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली, तरी दूध भेसळ प्रकरणानंतर ग्रामीण भागातील दूध व्यवसायावर त्याचा परिणाम झाल्याचे चित्र दिसत आहे. तपास यंत्रणांकडून सुरू असलेल्या कारवाईमुळे दूध व्यवसायातील व्यवहारांवर अधिक लक्ष ठेवले जात असून, दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याने संबंधितांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा आहे. मात्र, यासंदर्भात प्रशासनाकडून अधिकृत भूमिका अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

# समर्थ ज्युनिअर कॉलेजमध्ये गुणवंतांचा दिमाखदार गौरव सोहळा संपन्न

## "आवडीनुसार क्षेत्र निवडा; जीवनात यशस्वीता नक्कीच मिळेल" : प्रा. राजीव सावंत

जुन्नर तालुका: (स. गांवकरी)



समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज,बेल्हे येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साह,आनंद आणि प्रेरणेच्या वातावरणात संपन्न झाला.विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान होताच संपूर्ण सभागृह टाळ्यांच्याकडकडाटाने दुमदुमून गेले,तर पालकांच्या चेहऱ्यावर आपल्या पाल्यांच्या यशाचा अभिमान स्पष्टपणे झळकत होता.

यावेळी बारावी विज्ञान शाखेत वैष्णवी येवले हिने प्रथम, रिद्धी थिटे हिने द्वितीय, तर श्रुती शिंदे हिने तृतीयक्रमांक पटकावल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच बारावी वाणिज्य शाखेत फातिमा इकरा हिने प्रथम,साई काळे याने द्वितीय आणि दर्शन गाडगे याने तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत मानाचा तुरा खोवला.

याशिवाय एमएचटी-सीईटी (PCM), एमएचटी-सीईटी (PCB) तसेच एमएचटी-सीईटी नर्सिंग या गटांमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यां चाही प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होत असताना उपस्थित पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात त्यांच्या यशाचे कौतुक केले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत म्हणाले,विद्यार्थ्यांनी इतरांचे अंधानुकरण न करता स्वतःची आवड,क्षमता आणि कौशल्य ओळखून करिअरचे क्षेत्र निवडावे. आवडीनुसार निवडलेल्या क्षेत्रात यश निश्चित मिळते. शिक्षक,पालक आणि विद्यार्थी या त्रिसूत्रीचा समन्वय विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्या चा भक्कम पाया ठरतो.शिस्त, सातत्यपूर्ण परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर कोणतेही ध्येय सहज गाठता येते."कार्यक्रमा दरम्यान अनेक पालकांनी समर्थ शैक्षणिक संकुलातील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, नियोजन बद्ध अध्यापन,विद्यार्थीकेंद्रित उपक्रम,आधुनिक सुविधा आणि शिस्तबद्ध व्यवस्थापनाचे मुक्त कंठाने कौतुक केले. विद्यार्थ्यां च्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने राबवत असलेल्या विविध उपक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या गौरव सोहळ्याचे नियोजन प्रा.संतोष पोटे,प्रा. राजेंद्र नवले,प्रा.रोहिणी औटी, प्रा.नूतन पोखरकर,प्रा.अमोल खामकर आणि प्रा.संगीता रिठे यांनी अत्यंत नियोजनबद्ध व नेटकेपणाने केले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल ताई शेळके,समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य वैशाली आहेर,समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे, क्रीडा संचालक एच.पी नरसुडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, शिक्षक, पालक आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिवाजी शंकर डोके यांचे निधन

शिवनेरी (स. गांवकरी) : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथील शिवाजी शंकर डोके वर ६१ वर्षे स. वा . शिक्रापूर यांचे निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे पत्नी , एक मुलगी , दोन मुल , भाऊ दोन, बहिणी, भाचा, पुतणी, पुतण्या, नात, नातू व चुलते असा मोठा परिवार आहे.

## ईनरव्हिल क्लब ऑफ अपेक्स (सटाणा) चा पदग्रहण सोहळा संपन्न!

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ईनरव्हिल क्लब ऑफ अपेक्सचा पदग्रहण सोहळा नुकताच मावळत्या अध्यक्षा वंदना भामरे यांच्यानिवासस्थानी अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. दीप प्रज्वलन व ईनरव्हिल प्रार्थनेने कार्यक्रमाची दिमाखदारसुरुवात करण्यात आली. या सोहळ्यात मावळत्या अध्यक्षा वंदना भामरे यांनी आपल्या अध्यक्षपदाची सूत्रे नूतन अध्यक्षा त्रिवेणी कुंवर यांच्याकडे सन्मानपूर्वक सोपवली व मावळत्या सचिव अपर्णा येवलकर यांनी नूतन सचिव तृप्ती कुंवर यांच्याकडे आपल्या पदाचा कार्यभार हस्तांतरित केला.उपस्थित सर्व सदस्यांनी टाळ्यांच्या कडकडा टात नवीन कार्यकारिणीचे स्वागत केले.



## वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीची चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा उत्तीर्ण

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी जयश्री अरुण सोनवणे इयत्ता अकरावी ते टी वाय बी कॉम पर्यंतचे शिक्षण श्री शिव छत्रपती महाविद्यालयामध्ये घेऊन चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा जुन २०२६ उत्तीर्ण झाली.संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाच्या शिक्षणाचा खूप फायदा झाला, त्यामुळेच हे यश मला मिळवता आले असे या विद्यार्थिनीने सांगितले.तिने बारावीच्या विद्यार्थींना ही मार्गदर्शन केले. चार्टर्ड अकाउंट परीक्षे मधील नवीन बदल,त्यात ए आय चा वापर याची ही सखोल माहिती दिली.या परीक्षेत यश मिळवण्या साठीपरिश्रम धैर्य हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे असेही तिने सांगितले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे यांनी या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्याअध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही.बी.कुलकर्णी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी. वाघमारे,उपप्राचार्य डॉ. आर. डी. चौधरी,उपप्राचार्या व समन्वयक प्रा पी.एस.लोढा,पर्यवेक्षक प्रा. एस.ए.श्रीमंते,एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा.के.जी.नेटके, कला विभाग प्रमुख प्रा.आर. एस.कांबळे,सायन्स जेईई व नीट परीक्षा विभाग प्रमुख प्रा.सी.बी. कांबळे, इतर सर्व प्राध्यापकांनी या विद्यार्थिनीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## सुरू असलेले अनधिकृत बांधकाम केडीएमसीने केले निष्कासित

टिटवाळा (स. गांवकरी) : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग कार्यालयाने टिटवाळ्यातील गणेशवाडी परिसरात नव्याने सुरू असलेल्या दोन खोल्यांच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करत ते जेसीबीच्या सहाय्याने निष्कासित केले. ही कारवाई अ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी केडीएमसीचे अतिक्रमण पथक, कर्मचारी तसेच आवश्यक यंत्रसामग्री घटनास्थळी उपस्थित होती. जेसीबीच्या सहाय्याने संबंधित अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. केडीएमसी प्रशासनाने नागरिकांना कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी आवश्यक परवानग्या घेण्याचे आवाहन केले असून, शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात पुढील काळातही अशाच प्रकारची कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.




## नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्याकडून शालेय पोशाख व साहित्याचे वाटप

राजगुरुनगर (स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकी जपत राजगुरुनगर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी आश्रमशाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय पोशाख तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.मांजरेवाडी येथील कै. वसंतराव मांजरे विद्यालयात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वितरण करण्यात आले. यावेळी समाजसेवक रवी आवटे, अमित धारिवाल, मुख्याध्यापक विष्णू मेदगे, उपशिक्षक संध्या मांजरे, दिलीप मांजरे आणि विश्वास मांजरे उपस्थित होते. दावडी येथील आनंद आश्रमशाळेतील १९ गरीब व गरजू विद्यार्थी सध्या मांजरेवाडी येथील कै. वसंतराव मांजरे विद्यालयात शिक्षण घेत आहेत. विविध भागांतून आलेल्या या विद्यार्थ्यांना संस्थेकडून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना शालेय पोशाख व शैक्षणिक साहित्याची आवश्यकता असल्याचे लक्षात घेऊन नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पुढाकार घेत त्यांना शालेय पोशाख व आवश्यक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

# राजगुरुनगर नगरपरिषदेकडून नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू

**नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाची तातडीने कारवाई**



राजगुरुनगर : (स. गांवकरी)

राजगुरुनगर नगर परिषदेकडून शहरातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली असून, विविध ठिकाणी जलप्रवाहातील अडथळे दूर करण्यात आले आहेत. नगरपरिषदेने तातडीने सुरू केलेल्या या नालेसफाई मोहिमेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले होते. जलनिस्सारण व्यवस्थेतील त्रुटींमुळे अनेक घरे व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. शहरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या प्राचीन हौद ओढ्यात जलप्रवाहाला अडथळे निर्माण झाल्याने पूरस्थिती निर्माण झाली होती. पुलावरून पाणी वाहू लागल्याने लगतच्या अनेक दुकानांमध्ये पाणी शिरून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते.

या समस्येबाबत दैनिक संध्याने "नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे, प्रशासनाचे दुर्लक्ष" या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून ओढ्यातील समस्या अधोरेखित केली होती. या वृत्ताची दखल घेत राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या सूचनेनुसार स्वच्छता व आरोग्य सभापती सुप्रिया राहुल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेचा आरोग्य विभागाकडून शहरातील नालेसफाई मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत शहरातील हौद ओढा तसेच केदारेश्वर बंधारा परिसरात वाहून आलेला राडारोडा, गाळ, झुडपे आणि इतर अडथळे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार असून, भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका कमी होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

मनुष्याच्या हस्तक्षेपामुळे तालुक्यातील अनेक भागात नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने पावसाळ्यात सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे.नुकतेच झालेल्या पावसामुळे पुणे नाशिक महामार्गावरील वाकी परिसरातील सखल भागात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे ही गंभीर बाब समोर आल्याने खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी पावसाळी अधिवेशन दरम्यान विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता.

> शासनाने महसूल अधिकारी मार्फत नकाशावर असलेल्या ओढे ,नाले यांचे मोजमाप करून जलप्रवाह रोखण्यात कारणीभूत असलेली अतिक्रमणे काढावीत.
> **- आमदार, बाबाजी काळे**
>
> गरपरिषदेत प्रशासकीय काळात अनेक समस्या कायम राहिले असून, नागरिकांच्या तक्रारीनंतर तातडीने समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत आहोत. जलप्रवाहाला अडथळा ठरणाऱ्या राडारोडा काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.नागरिकांना पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर तातडीने कारवाई करण्यात येईल
> **- मंगेश गुंडाळ, नगराध्यक्ष , राजगुरुनगर नगरपरिषद.**
>
> जलप्रवाहातील अडथळ्यांमुळे येथील दुकानात पाणी येऊन मालाचे नुकसान होऊन, व्यवसायावर परिणाम होत होता. मात्र, यंदा नगरपरिषदेने तातडीने दखल घेऊन नालेसफाई व अडथळे दूर केल्याने पाण्याचा निचरा सुरळीत झाल्याने आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे."
> **- स्थानिक व्यावसायिक, असिर शेख**

## वाढदिवसानंतर दुसऱ्याच दिवशी काळाचा घाला

मंचर : (स. गांवकरी)

पुणे-नाशिक जुन्या महामार्गावरील मंचर येथील महात्मा गांधी विद्यालयाजवळ सोमवारी सायंकाळी झालेल्या एसटी बस व दुचाकीच्या अपघातात दुचाकी चालक वीर अनिल शिंदे (वय १७) राहणार अवसरी खुर्द ता.आंबेगाव या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीवरील अन्य दोघे विद्यार्थी तेजस महेश भालेराव आणि साहिल संदीप टेमकर दोघेही राहणार अवसरी खुर्द हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्नरहून पुण्याकडे जाणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एसटी बस जुन्नर कुर्ला नेहरूनगर बस महात्मा गांधी विद्यालयाजवळ मंचरच्या दिशेने आली असता, समोर पायी चाललेल्या शालेय विद्यार्थिनींना वाचविण्याच्या प्रयत्नात दुचाकीचालक वीर अनिल शिंदे याचा ताबा सुटला. दुचाकी घसरून बसच्या मागील डाव्या चाकाखाली गेल्याने अपघात झाला. त्यामध्ये दुचाकी चालक वीर अनिल शिंदे हा एसटीच्या मागील चाकाखाली आला. अपघातानंतर बसचालकाने बस थांबवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान वीर अनिल शिंदे याचा मृत्यू झाला.



या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, वीर अनिल शिंदे याचा वाढदिवस रविवारीच साजरा झाला होता आणि त्यानंतर अवघ्या एका दिवसात काळाने त्याच्यावर झडप घातली. वीर, तेजस आणि साहिल हे तिघेही मंचर येथील महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थी होते.

## विजेविहिरा शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण

आळेफाटा : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि पर्यावरण संवर्धन या दुहेरी उद्देशाने आंजुरा विकास सामाजिक संस्था, डोंबिवली यांच्या वतीने शनिवार, दिनांक ११ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विजेविहिरा येथे शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमात शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय वह्या, पेन, रबर, बालमित्र इंग्रजी व मराठी पुस्तिका, स्कॉलरशिप मार्गदर्शिका आणि आकर्षक शालेय दप्तरांचे मोफत वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. कार्यक्रमाचे औचित्य साधून 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत शाळा परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी आंजुरा विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संजय फापाळे यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेच्या सामाजिक कार्याचा आढावा दिला. भविष्यात या शाळेच्या गरजांसाठी आणखी व्यापक स्वरूपात मदत करू, असे आश्वासन त्यांनी दिले. संस्थेचे कार्यकारी सदस्य राजेंद्र डुंबरे सर यांनी शाळेने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य भानुविलासजी गाढवे, ग्रामपंचायत सदस्या मनीषाताई वारे, सामाजिक कार्यकर्ते संदीप डुंबरे, रवींद्र शिंगोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र दुधवडे यांच्यासह आंजुरा विकास संस्थेचे सहसचिव विजय औटी, उपक्रम प्रमुख सुदाम येवले, गणेश नवले, देविदासनाना तांबे, सचिन डुंबरे, गोरक्ष खोकराळे, शालिनीताई डुंबरे, विजयाताई फापाळे, नामदेव फापाळे, संदीप नलावडे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक शरद वारुळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. सूत्रसंचालन सहशिक्षक योगेश खेत्री यांनी केले. सहशिक्षक सुरेशजी रोकडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश रोकडे, संगीताताई दूधवडे,अलका तांबे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्री साईबाबांबाबत आक्षेपार्ह विधानप्रकरणी गौतम खट्टर यांची न्यायालयात चूक कबूल

- यापुढे चुकीचे वक्तव्य करणार नसल्याची ग्वाही
- राहाता न्यायालयात माफीनामा; गैरसमज दूर झाल्याचे स्पष्टीकरण, पत्रकार परिषदेतही व्यक्त केला खेद

शिर्डी : (स. गांवकरी)

श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थानविषयी विविध समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह विधाने करणारे गौतम खट्टर यांनी आज राहाता न्यायालयात हजर राहून आपली चूक मान्य केली. न्यायालयासमोर त्यांनी स्पष्ट केले की, "श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थानबाबत असलेले माझे गैरसमज दूर झाले असून, यापुढे मी कोणतेही चुकीचे वक्तव्य, मुलाखत, चर्चा किंवा भाष्य करणार नाही."

सन २०२३ मध्ये श्री साईबाबांविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह विधानांच्या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थानने संबंधित व्यक्तींविरुद्ध राहाता न्यायालयात कायदेशीर दावा दाखल केला होता. या प्रकरणात अजय गौतम व गौतम खट्टर यांचा समावेश होता. यापूर्वी अजय गौतम यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये राहाता न्यायालयात माफीनामा सादर करून आपली चूक मान्य केली होती. याचप्रमाणे गौतम खट्टर यांनीही न्यायालयात सांगितले की, त्यांच्या पूर्वीच्या विधानांचा आधार अपुऱ्या माहितीतून निर्माण झालेल्या गैरसमजांवर होता. गैरसमज दूर झाल्यानंतर त्यांनी आपली भूमिका बदलत न्यायालयासमोर यापुढे अशा प्रकारचे कोणतेही वक्तव्य करणार नसल्याची हमी दिली.



यानंतर आयोजित पत्रकार परिषदेतही गौतम खट्टर यांनी आपल्या वक्तव्याबद्दल खेद व्यक्त केला. या संपूर्ण प्रक्रियेत संस्थानचे माजी विश्वस्त मोहन जयकर, विधी अधिकारी गोरक्षनाथ नलगे तसेच राहाता न्यायालयाचे वकील ॲड. राजेश नाईक यांनी समन्वयाची भूमिका पार पाडली.

## मढेवडगाव ग्रामपंचायतीचा मियावाकी पद्धतीने वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम

- 'एक झाड... हजारो श्वास'; हरित मढेवडगावाच्या दिशेने ग्रामपंचायतीचे महत्त्वपूर्ण पाऊल

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि भावी पिढ्यांना समृद्ध, हिरवागार पर्यावरणाचा वारसा मिळावा या उद्देशाने मढेवडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मढेवडगावच्या पूर्वेला असलेल्या फॉरेस्ट गट क्रमांक ८ मध्ये मियावाकी (Miyawaki) पद्धतीने वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. 'एक झाड... हजारो श्वास' हा संदेश देत ग्रामस्थांनी पर्यावरण संरक्षणाचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमाला श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ. राणीताई फराटे, कृषी विस्तार अधिकारी खोसे साहेब, मढेवडगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच प्रमोदजी शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय स्थानिक सल्लागार सदस्य स्मितल भैया वाबळे, उपसरपंच सौ. सुनीताताई दत्तात्रेय उंडे, माजी उपसरपंच राहुल साळवे, ग्रामविकास अधिकारी खाडे भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य आनंद ससाने, निखिल उंडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सचिन उंडे, गोरख शिंदे, सनी कोळपे, गणेश उंडे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी माऊली साळवे, शुभम ससाने, शुभम वाबळे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मियावाकी पद्धतीमध्ये स्थानिक प्रजातींची झाडे कमी अंतरावर दाट स्वरूपात लावली जात असल्याने त्यांची वाढ जलद गतीने होते. त्यामुळे अल्प कालावधीत घनदाट वनक्षेत्र तयार होऊन जैवविविधतेचे संवर्धन, कार्बन शोषण, भूजल पुनर्भरण, मृदा संरक्षण, स्थानिक वन्यजीवांसाठी अधिवास निर्मिती आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्यास मोठी मदत होते.

# आषाढी वारीत नानजीभाई ठक्कर यांचा सेवाभाव

माडा : (स. गांवकरी)

आषाढी वारी आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी आगमनाच्या निमित्ताने माडा येथे भक्ती, सेवा आणि समाजप्रबोधनाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. एन.के.टी. ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष श्री नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते ब्रह्मकुमारी संस्थेच्या संचालिका श्रीमती प्रमिलाबेन व सहकारी श्री उमेदभाई यांना गीतासार ग्रंथ व बुंदी प्रसादाचे वितरण करण्यात आले.



यावेळी भागवताचार्य नाना महाराज जेधे-देशमुख, माजी नगराध्यक्ष राजेंद्र (राजेश) पारखे, ॲड. हरिश्चंद्र कांबळे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुण्याहून निघालेल्या दिंडी क्रमांक ६१ सोबत लोणावळ्याहून जेजुरीकडे प्रस्थान केलेल्या दिंडीत म्हाडा कॉलनी, टेंभुर्णी, कुर्डुवाडी, शिवाजी चौक आदी ठिकाणी वारकरी भाविकांना बुंदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच वाटेत भेटणाऱ्या भाविकांना गीतासार ग्रंथ आणि वहीचेही वितरण करण्यात आले. या सेवाकार्यात श्रीमती धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर, नाना महाराज देशमुख, योगेश फुलचंद जैन, प्रमिलाबेन, श्री उमेदभाई आणि ब्रह्मकुमारी संस्थेचे कार्यकर्ते सक्रिय सहभागी झाले होते. यावेळी श्री उमेदभाई यांनी सांगितले की, नाना महाराजांनी श्री नानजीभाई ठक्कर यांचा परिचय करून देताना त्यांना "वारकरी चळवळीचे भूषण" असे संबोधले. आळंदी येथे त्यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या २३१ फूट उंच मंदिराचा उल्लेख करत त्यांच्या धार्मिक व समाजसेवेच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमात ॲड. हरिश्चंद्र कांबळे यांच्या हस्ते श्री नानजीभाई ठक्कर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. गोविंद महाराज केनद्रे यांच्या मंदिरास लाखो भाविक भेट देत असून देशभरातील अनेक मंदिरांच्या उभारणीत तसेच धार्मिक व सामाजिक संस्थांना सहकार्य करण्यामध्ये श्री ठक्कर यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. दिंडीतील सुमारे ७०० वारकरी भाविकांना श्रीमती धनलक्ष्मीबेन व श्री नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने बुंदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाबद्दल वारकरी व आयोजकांनी श्री ठक्कर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

मार्गदर्शन करताना श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले, "कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नका. व्यसनामुळे माणूस पांडुरंगापासून दूर जातो. दिंडीचा खरा अर्थ म्हणजे देवाचे नामस्मरण, भक्ती आणि चांगले संस्कार. प्रत्येक व्यक्तीत पांडुरंगाचेच रूप आहे. त्यामुळे प्रत्येकाशी प्रेमाने आणि सन्मानाने वागा."

ते पुढे म्हणाले, "गरजूंसाठी जय भगवान हॉस्पिटलमध्ये बायपास शस्त्रक्रिया, अँजिओग्राफी, किडनी प्रत्यारोपणासह अनेक उपचार विनामूल्य उपलब्ध करून दिले जातात. शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या. वारकरी संप्रदायातून समाजाला संस्कार आणि सदाचाराची प्रेरणा मिळते." शेवटी त्यांनी सर्वांना संदेश देताना, "आपले घर मंदिरासारखे पवित्र ठेवा. प्रेम, सद्भावना आणि भक्तीभावाने जीवन जगा," असे आवाहन केले. कुर्डुवाडी येथे माजी नगराध्यक्ष राजेंद्र पारखे व ॲड. हरिश्चंद्र कांबळे यांच्या हस्ते श्री नानजीभाई ठक्कर यांचा श्री विठ्ठलाची तीन फूट उंच मूर्ती, लाल पगडी आणि शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

# गोविंद महाराज केनद्रे यांच्या ४३ व्या दिंडीत भक्ती, सेवा आणि समाजप्रबोधनाचा संगम

## हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत नानजीभाई ठक्कर यांचा गौरव!

आळंदी/कुर्डुवाडी : (स. गांवकरी)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर गोविंद महाराज केनद्रे यांच्या ४३ व्या दिंडीचे सायंकाळी सुमारे ७.३० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड गजराने परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्यास सुमारे साडेसात हजार वारकरी व भाविक उपस्थित होते.

यावेळी एन.के.टी. ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष श्री नानजीभाई ठक्कर यांचे दिंडीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. आळंदी येथे जमीनदाता काशीमा खीमजीभाई ठक्कर यांच्या जागेवर उभारण्यात आलेल्या २३१ फूट उंच मंदिरावरील संगमरवरी कोरीव कामासाठी श्री नानजीभाई ठक्कर यांनी मोलाचे सहकार्य केल्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला.

दिंडीचे प्रमुख श्री विष्णू महाराज यांनी सांगितले की, गेली अनेक वर्षे श्री रामदास महाराज, श्री गजानन घुगे आणि सहकाऱ्यांच्या सहकार्याने ही दिंडी सातत्याने सुरू असून यंदाही जेजुरीपर्यंत दिंडी नेण्याचा संकल्प करण्यात आला आहे. लाखो भाविकांच्या सहभागामुळे हा सोहळा अधिक भव्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले, "श्री नानजीभाई ठक्कर हे आमच्या मंदिराचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या आगमनाने आम्हाला मोठा आनंद झाला आहे." यानंतर त्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच त्यांचा शाल, पगडी आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला आणि दिंडीत सहभागी होण्याचे विशेष निमंत्रण देण्यात आले.

कार्यक्रमानंतर आळंदी येथे उपस्थित वारकरी व भाविकांना श्रीमती धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने बुंदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दरवर्षी लाखो वारकऱ्यांना महाप्रसाद वाटप करण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. यावेळी भाविकांनी फुगडी, पारंपरिक खेळ आणि कीर्तनाचा भक्तिभावाने आनंद लुटला. या सोहळ्यास आळंदी येथे सुमारे साडेचार हजार भाविक उपस्थित होते.

आपल्या मनोगतात विष्णू महाराज म्हणाले, "आज श्रीमती धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले असून श्री नानजीभाई ठक्कर स्वतः येथे उपस्थित राहिले आहेत, हे आमच्या सर्व वारकरी आणि भाविकांचे भाग्य आहे."



यानंतर श्री गजानन घुगे यांच्या हस्ते श्री नानजीभाई ठक्कर यांचा पगडी, शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कुर्डुवाडी शहराच्या वतीने त्यांना श्री विठ्ठलाची तीन फूट उंच सुंदर मूर्ती भेट देण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी भावना व्यक्त करताना सांगितले, "आजचा दिवस आमच्यासाठी भाग्याचा आहे. श्री नानजीभाई ठक्कर यांच्या रूपाने आम्हाला विठ्ठलाचे दर्शन घडले. त्यामुळे येथेच पांडुरंगाचे दर्शन झाल्याचा आनंद मिळाला."

कार्यक्रमास श्री रामदास महाराज, श्री भास्कर महाराज, श्री नवनाथ महाराज तसेच अनेक वारकरी, भाविक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नवनाथ महाराज यांनी दरवर्षी तन, मन आणि धनाने सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तींचे अभिनंदन करून आभार मानले. त्यांनी समाजात परस्पर आदर, समता आणि भक्तीभाव जपण्याचा संदेश दिला.

यावेळी मार्गदर्शन करताना उपस्थित संतांनी सांगितले की, कोणालाही कमी लेखू नका किंवा हिणवू नका. प्रत्येकामध्ये विठ्ठल, ज्ञानेश्वर माऊली आणि पांडुरंगाचेच रूप आहे. सर्वांचा आदर करा आणि समाजात प्रेम, बंधुभाव व सद्भावना वाढवा. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत भावी पिढी घडविण्यासाठी मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याचे आवाहन केले.

यंदाच्या ४३ व्या वारीनिमित्त नागपूर येथील एका मंत्र्यांकडून १० लाख रुपयांच्या आर्थिक सहकार्याची घोषणा करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या योगदानाबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच वारीसाठी तन, मन आणि धनाने सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती, स्वयंसेवक आणि वारकरी भाविकांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आषाढी वारीत वैद्यकीय मदत; दोन वारकऱ्यांचे प्राण वाचले

पिंपरी चिंचवड (स. गांवकरी) : सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस आणि सुमीत एसएसजी यांनी आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी ९ ते ११ जुलै या कालावधीत विशेष वैद्यकीय मदत उपक्रम राबविला. पिंपरी, भोसरी, एफसी रोड, भवानी पेठ, रास्ता पेठ, हडपसर, लोणी काळभोर आणि दिवे घाट येथे उभारलेल्या आठ वैद्यकीय शिबिरांत शेकडो वारकऱ्यांवर प्राथमिक उपचार करण्यात आले. या उपक्रमासाठी एक अत्याधुनिक जीवनरक्षक रुग्णवाहिका आणि दोन मूलभूत जीवनरक्षक रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. एफसी रोड आणि दिवे घाट येथे प्रकृती बिघडलेल्या दोन व्यक्तींना तातडीने उपचार करून रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्यांचे प्राण वाचले. डिहायड्रेशन, स्नायूंचा थकवा, पायांवरील फोड आणि सांधेदुखी अशा समस्यांवरही वारकऱ्यांना उपचार व औषधे देण्यात आली. सुमीत ग्रुपचे अध्यक्ष सुमीत साळुंखे यांनी वारकऱ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हेच या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

## महाराष्ट्राच्या वीज वितरण व्यवस्थेवर वाढता ताण; आधुनिकीकरणाची गरज

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे महाराष्ट्राच्या वीज वितरण व्यवस्थेतील उणिवा पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. नागपूर, मुंबई, नवी मुंबई आणि पुणे येथे अलीकडे झालेल्या वीज खंडित होण्याच्या घटनांमुळे वाढती वीज मागणी, जुन्या पायाभूत सुविधा आणि अपुरे नियोजन यांचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला आहे. वेगाने होणारे शहरीकरण, वाढती लोकसंख्या आणि अतिवृष्टीमुळे वीज वितरण यंत्रणेवर मोठा ताण येत आहे. ट्रान्सफॉर्मरवरील अतिरिक्त भार, दुरुस्तीत होणारा विलंब आणि जुन्या केबल्समुळे अनेक भागांत तासन्‌तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्यामुळे केवळ दैनंदिन जीवन विस्कळीत होत नाही, तर व्होल्टेजमधील चढ-उतारांमुळे विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याचाही धोका वाढत आहे.

## एचडीएफसी बँकेची 2025-26 मध्ये दमदार आर्थिक कामगिरी



मुंबई (स. गांवकरी) : एचडीएफसी बँकेने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये जागतिक पातळीवरील आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि व्यापारातील चढ-उतार असूनही मजबूत आर्थिक कामगिरी केली. या आर्थिक वर्षात बँकेचे कर्जवाटप 12.1 टक्क्यांनी वाढून 29.37 लाख कोटींवर, तर ठेवी 14.4 टक्क्यांनी वाढून 31.05 लाख कोटींवर पोहोचले. निव्वळ महसूल 1.91 लाख कोटी आणि करानंतरचा निव्वळ नफा 10.9 टक्क्यांनी वाढून 74,671 कोटी झाला. यासोबतच ग्राहकांना अधिक सुरक्षित, जलद आणि सोपी बँकिंग सेवा देण्यासाठी बँकेने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि मजबूत व्यवस्थापनावर विशेष भर दिला. एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष केकी एम. मिस्त्री म्हणाले, " जागतिक पातळीवर अनेक आव्हाने असली तरी भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. एचडीएफसी लिमिटेडच्या विलीनीकरणामुळे गृहनिर्माण कर्ज व्यवसायाला चांगला फायदा झाला आहे.

## ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू; प्रत्येक कुटुंबाला २५ लाखांची मदत, नोकरीची संधी

ANTONY WASTE

पिंपरी चिंचवड (स. गांवकरी) : एंटनी वेस्टच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पालगत झालेल्या नैसर्गिक आपत्तीत नऊ कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, १४ कर्मचाऱ्यांचे प्राण बचाव पथकांनी वाचवले. या घटनेनंतर कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने प्रभावित कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. दुर्घटनेच्या वेळी प्रशासकीय इमारतीत २३ कर्मचारी उपस्थित होते. या घटनेत इमारतीचे मोठे नुकसान झाले. एनडीआरएफ, भारतीय सेना, अग्निशमन दल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाच्या तातडीच्या मदतकार्यामुळे १४ कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका करण्यात आली. जखमींवर उपचार सुरू असून त्यांना समुपदेशनाची सुविधाही देण्यात येत आहे. कंपनीने मृत कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसेच पात्रतेनुसार कुटुंबातील एका सदस्याला नोकरी, अल्पवयीन मुलांच्या शिक्षणाचा खर्च, अंत्यसंस्काराचा संपूर्ण खर्च आणि जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा खर्च कंपनी उचलणार आहे. प्रत्येक प्रभावित कुटुंबासाठी स्वतंत्र संपर्क अधिकारीही नियुक्त करण्यात आला आहे.

# भारतातील पहिला 'नीट रेडी' लॅपटॉप सादर

मुंबई : (स. गांवकरी)

२०२७ पासून राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षा (नीट) संगणकाधारित पद्धतीने होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर एसर, इंटेल आणि इन्फिनिटी लर्न यांनी भारतातील पहिली एकत्रित 'नीट रेडी' शिक्षण प्रणाली आणि त्यासोबत विशेष 'नीट रेडी' लॅपटॉप सादर केला आहे. विद्यार्थ्यांना डिजिटल परीक्षेची सवय, तांत्रिक कौशल्ये आणि प्रभावी तयारी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. दरवर्षी २२ लाखांहून अधिक विद्यार्थी नीट परीक्षेला बसतात. नव्या संगणकाधारित परीक्षेमुळे केवळ अभ्यासच नव्हे, तर संगणक हाताळण्याचे कौशल्यही आवश्यक ठरणार आहे. विशेषतः दुसऱ्या, तिसऱ्या श्रेणीतील शहरे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा महत्त्वाची ठरणार आहे. या लॅपटॉपमध्ये एसरच्या 'अस्पायर'



- २०२७ च्या संगणकाधारित परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मोठी मदत

मालिकेतील संगणक, इंटेलचे प्रोसेसर आणि इन्फिनिटी लर्नची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नीट तयारी प्रणाली एकत्रित करण्यात आली आहे. यामध्ये थेट व ध्वनिचित्रित वर्ग, अभ्यास साहित्य, प्रकरणनिहाय सराव, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मार्गदर्शक, सराव परीक्षा, कामगिरीचे विश्लेषण आणि प्रत्यक्ष परीक्षेसारखा अनुभव देणारे संगणकाधारित सराव सत्र उपलब्ध आहे.

# वाघवस्तीसाठी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल बससेवेचा शुभारंभ

- नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात यांच्या पाठपुराव्याला यश
- अनेक वर्षांची विद्यार्थी-पालकांची मागणी पूर्ण
- वाघवस्तीपर्यंत बससेवा सुरू झाल्याने ने-आण सुलभ



शिर्डी : (स. गांवकरी)

शिर्डी शहरातील वाघवस्ती परिसरातील विद्यार्थी व पालकांची अनेक वर्षांपासूनची श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलची बससेवा वाघवस्तीपर्यंत सुरू करण्याची मागणी अखेर पूर्ण झाली. शिर्डीच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई विष्णु थोरात यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू करण्यात आली असून, बससेवेचा शुभारंभ त्यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

यावेळी गटनेते किरण कोते, नगरसेवक सुधीर शिंदे, बांधकाम सभापती अरविंद अप्पा कोते, गंगाभाऊ कोते, मच्छिंद्र कोते, संतोष बर्डे तसेच स्थानिक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाघवस्तीपासून स्कूल बसचा थांबा लांब असल्यामुळे विद्यार्थ्यांना विशेषतः पावसाळा व हिवाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मुलांच्या सुरक्षित व सोयीस्कर ने-आणीसाठी बससेवा वाघवस्तीपर्यंत सुरू करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत नगराध्यक्षा थोरात यांनी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडिलकर (IAS) यांच्याकडे हा विषय मांडून सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी गाडिलकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासकीय अधिकारी श्री अतुल वाघ व मुख्याध्यापिका श्रीमती सपना जगताप यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. प्रशासकीय अधिकारी अतुल वाघ आणि मुख्याध्यापिका सपना जगताप यांनी तत्परतेने पाठपुरावा करून आवश्यक अडचणी दूर करत वाघवस्तीपर्यंत बससेवा सुरू केली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवासाची गैरसोय दूर होणार असून पालकांचा वेळ आणि श्रमही वाचणार आहेत. यावेळी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात यांनी बस चालक व वाहकांचा सत्कार केला. तसेच ही सेवा सुरू करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडिलकर, प्रशासकीय अधिकारी श्री अतुल वाघ आणि मुख्याध्यापिका श्रीमती सपना जगताप यांचे आभार व्यक्त केले.

# ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी अरुण पाटील

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीने विजय मिळवत बँकेवरील बहुजन विकास आघाडीचे दीर्घकाळाचे वर्चस्व संपुष्टात आणले. अध्यक्षपदी अरुण बाळू पाटील तर उपाध्यक्षपदी भाग्यश्री निलेश भोईर यांची निवड झाली.

कार्यकारिणी निवडणुकीत सहकार पॅनल आणि परिवर्तन पॅनल



अशी लढत झाली होती. मात्र, भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीची राजकीय रणनीती आखत दोन्ही पॅनलमध्ये उमेदवार उभे केले होते. या निवडणुकीत महायुतीचे एकूण १४ उमेदवार विजयी झाल्याने अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांचे पारडे जड मानले जात होते.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत महायुतीच्या १४ सदस्यांनी तर बहुजन विकास आघाडीच्या ७ सदस्यांनी मतदान केले. निवडणुकीत एकमेकांविरुद्ध लढलेले भाजपचे किसन कथोरे आणि कपिल पाटील अध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, शिवसेनेचे एक मत फुटल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली.

या विजयामुळे ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवरील बहुजन विकास आघाडीचे दीर्घकाळचे वर्चस्व संपुष्टात आले असून, भाजपा-शिवसेना महायुतीने बँकेच्या नेतृत्वावर आपली पकड मजबूत केली आहे.

# एअरटेलने आपले नेटवर्क केले अधिक मजबूत

भुवनेश्वर : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक, भारती एअरटेल ("एअरटेल") ने पुरी रथयात्रेच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण ओडिशामध्ये आपल्या व्यापक नेटवर्क विस्ताराची घोषणा केली. वार्षिक रथयात्रेदरम्यान व्हॉइस आणि डेटा ट्रॅफिकमध्ये होणारी मोठी वाढ लक्षात घेऊन, एअरटेलने आगाऊ तयारीचा भाग म्हणून पुरीमधील आपल्या नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरला अधिक मजबूत केले आहे. यामध्ये पवित्र नगरीकडे जाणारे सर्व प्रमुख रस्ते आणि रेल्वे मार्गांचा समावेश आहे. 5G सेवेसह सुसज्ज असलेला हा विस्तार नेटवर्कवरील अपेक्षित वाढीव मागणी प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच भाविकांची सर्वाधिक गर्दी असताना हाय-स्पीड डेटा सेवांसह अखंड व्हॉइस कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आला आहे. गेल्या 12 महिन्यांत कंपनीने राज्यभरात 1,500 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारल्या आहेत. त्यामुळे ओडिशातील 30 जिल्ह्यांमध्ये तिचे नेटवर्क कव्हरेज लक्षणीयरीत्या मजबूत झाले असून, शहरी भाग, विकसित होत असलेली शहरे तसेच ग्रामीण समुदायांमध्ये राहणाऱ्या 1.1 कोटींहून अधिक ग्राहकांना विश्वासार्ह हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होत आहे. ग्राहकांचा अनुभव आणखी चांगला करण्यासाठी, एअरटेलने ओडिशामध्ये ₹399 पासून सुरू होणारे फुली अनलिमिटेड पॅक्स सादर केले आहेत. या पॅक्सअंतर्गत सर्व प्रीपेड स्मार्टफोन वापरकर्त्यांना अमर्यादित 4G आणि 5G डेटा तसेच अमर्यादित कॉलिंगची सुविधा मिळते. त्यामुळे त्यांना दररोजच्या डेटा मर्यादेची चिंता न करता स्ट्रीमिंग, शेअरिंग, काम, शिक्षण आणि सतत कनेक्ट राहण्याचा लाभ घेता येतो.

# विद्यार्थ्यांसाठी एआय सुविधांनी सज्ज 'आईकु झेड११ लाइट' २४ जुलैला होणार लॉन्च

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

स्मार्टफोन उत्पादक आईकु २४ जुलै रोजी विद्यार्थ्यांसाठी खास डिझाइन केलेला 'आईकु झेड११ लाइट' स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर करणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित वैशिष्ट्ये, ओरिजिन ओएस ६, लष्करी दर्जाची मजबुती आणि मोठी बॅटरी ही या स्मार्टफोनची प्रमुख वैशिष्ट्ये




आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये एआय क्रिएशन सुविधा देण्यात आली आहे. या माध्यमातून मोठ्या दस्तऐवजांचा सारांश तयार करणे, मजकूर पुन्हा लिहिणे, भाषांतर करणे, नवीन कल्पना सुचवणे आणि असाइनमेंट तयार करण्यात मदत मिळणार आहे. तसेच एआय कॅप्शन्स सुविधेमुळे व्याख्यानांचे थेट लिप्यंतरण, त्वरित भाषांतर आणि एका स्पर्शात सारांश तयार करता येणार आहे. या स्मार्टफोनमध्ये ६,५०० एमएएच क्षमतेची बॅटरी आणि ४४ वॅट फ्लॅशचार्ज सुविधा देण्यात आली असून, पाच वर्षे बॅटरीची कार्यक्षमता टिकवून ठेवणारे तंत्रज्ञानही उपलब्ध आहे. दैनंदिन वापरात टिकाव मिळावा यासाठी फोनला लष्करी दर्जाची मजबुती तसेच एसजीएस ५-स्टार ड्रॉप रेझिस्टन्स प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे पडणे किंवा किरकोळ धक्क्यांपासून फोनचे अधिक संरक्षण होणार आहे.

# यामाहाची एफझेड ब्ल्यू फ्लेक्स भारतात दाखल

पुणे : (स. गांवकरी)

इंडिया यामाहा मोटर (आयवायएम) प्रा. लि. ने आज एफझेड- ब्ल्यू फ्लेक्स सादर करण्याची घोषणा केली. कार्बन न्यूट्रॅलिटीच्या दिशेने आणि सस्टेनेबल मोबिलिटीला (शाश्वत गतिशीलता) चालना देण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भारताचे 'विकसित भारत' या ध्येयाला आणि पर्यायी इंधन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला अनुसरून नाविन्यपूर्ण फ्लेक्स-फ्युएल क्षमता असलेली एफझेड ब्ल्यू फ्लेक्स ही बाईक यामाहाच्या लोकप्रिय एफझेड श्रेणीमध्ये सादर करण्यात आली आहे. यामाहा एफझेड ब्ल्यू फ्लेक्स ची किंमत १,२४,२४० रुपये (एक्स-शोरूम,




दिल्ली) इतकी आहे. यामाहाच्या विश्वासार्ह आणि लोकप्रिय यामाहा एफझेडच्या १४९ सीसी एअर-कूल्ड, फ्युएल-इंजेक्टेड इंजिनने सुसज्ज असलेली एफझेड ब्ल्यू फ्लेक्स ' ही ई 20 ते ई 85 श्रेणीतील इथेनॉल-मिश्रित इंधनांवर चालण्यासाठी विकसित करण्यात आली आहे.

# कॅलिफोर्निया बदाम : स्मार्ट खाद्य निवड

मुंबई : (स. गांवकरी)

डाएट कल्चर आणि आरोग्यविषयक परस्परविरोधी सल्ल्यांच्या लाटेमध्ये, वजन व्यवस्थापन हे पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करण्याच्या अंतहीन चक्रासारखे वाटू शकते. जरी मर्यादित आहार पद्धती आणि तीव्र व्यायामामुळे जलद परिणाम मिळू शकतात, तरी दीर्घकाळ त्यामध्ये सातत्य राखणे कठीण होऊ शकते. वास्तविक, प्रभावी वजन व्यवस्थापन हे क्वचितच वंचित राहण्याबद्दल असते. त्याऐवजी, आजच्या व्यस्त आणि मागणीपूर्ण जीवनशैलीमध्ये सहजपणे समाविष्ट करता येतील अशा शाश्वत सवयी निर्माण करणे आणि स्मार्ट निवडी करणे याबद्दल ते आहे. कॅलिफोर्निया बदाम ही अशीच एक निवड आहे. नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध




असलेले हे बदाम 24 पोषक घटक प्रदान करतात आणि यामध्ये तृप्ती देणारे गुणधर्म असतात, जे तुम्हाला अधिक वेळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करू शकतात आणि तुमच्या वजन व्यवस्थापनाच्या प्रवासाला आधार देऊ शकतात. ही प्रक्रिया कमी गुंतागुंतीची आणि अधिक सोपी करण्यासाठी, बॉलिवूड अभिनेत्री सोहा अली खान वजनाच्या उद्दिष्टांना समर्थन देण्यासाठी ज्या काही सोप्या पण स्मार्ट खाद्य निवडींवर विश्वास ठेवतात, त्या शेअर करत आहेत: आरोग्यदायी खाण्याची सुरुवात करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपल्या आहारात पोषक घटकांनी समृद्ध पदार्थांचा समावेश करणे. आपल्या आवडीचे पदार्थ पूर्णपणे वगळण्याऐवजी, आपल्या आहारातील पोषणाची कमतरता भरून काढणारे पदार्थ निवडा. कॅलिफोर्निया बदाम हे मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सने समृद्ध आहेत, ज्यामुळे ते आपल्या आहारात समाविष्ट करण्यासाठी एक उत्तम आरोग्यदायी चरबीचा स्रोत ठरतात. त्यांचे सेवन जेवणानंतर रक्तातील साखरेची पातळी वाढण्यास देखील मदत करू शकते. आपल्या आवडत्या पदार्थांचा अधूनमधून आनंद घेणे महत्त्वाचे असले, तरी त्यांच्यावर खूप जास्त अवलंबून राहिल्यास आपल्या आरोग्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत राहणे कठीण होऊ शकते.


AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार दि. १५ जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे • नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 • पाने : ५ • वर्ष : ४ थे • अंक : २१५ • किंमत : ४ रूपये • Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# बोगस आयुर्वेदिक चा कर्नाटक राज्यातील बादशहा महाराष्ट्राचा बंगला डॉन

शिर्डी मध्ये बोगस आयुर्वेदिक मनोज शिर्केचा पुन्हा उद्रेक सुरू वाकचौरे साहेब आता तरी आपण याकडे लक्ष घालणार का मनोज शिर्के हा कर्नाटक राज्यातील अंकली बेळगाव भागातील असून वेगवेगळ्या नावाने शिर्डी शहरात बोगस आयुर्वेदिक चे दुकाने सुरू करून त्याला साथ मिळाली ती राजेश उर्फ राकेश पुराना या दोघांनी शिर्डी शहरात मोठा आहे तोच घातला असून यामुळे या ठिकाणी बाहेरून येणाऱ्या पर्यटक व अनेकांना दवाखान्यात पेशंटला भेटून आमच्याकडे शंभर टक्के आयुर्वेदिक औषधे असून आपला आजार १००% बरा होईल असे एजंटच्या मार्फत जो अत्याचारग्रस्त आजारी माणसाच्या नातेवाईकांना बळी पाडतात त्यांच्या कोण लाखो रुपयांची माया गोळा करतात यांचे एजंट देखील शिर्डी संस्थांच्या परिसरात शिर्डी संस्थांच्या हॉस्पिटल व खाजगी दवाखान्यात जवळ फिरकत असतात या शिर्केच्या उद्रेकामुळे आपल्या नावासमोर वैदू समाजाचा उल्लेख करून त्याने अनेक वैदू समाजाला महाराष्ट्रातील बदनाम करण्याचे षडयंत्र आपला आहे या षडयंत्राचा बिमोड होणे ही काळाची गरज आहे... संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील गडगे महाराज व डॉक्टर पुरी यांचा हा पार्टनर असून यांनी महाराष्ट्रात व मुलुंड भागात देखील मोठ्या प्रमाणात हैद्रास घातला पुणे शहरात नुकतीच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आरोग्य विभागाने कारवाई केल्यानंतर ५० लक्ष रुपयाचे बोगस आयुर्वेदिक औषधे साठा या ठिकाणी आढळला शिर्डी या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात बोगस आयुर्वेदिक साठा आहेत शिर्डीमध्ये मनोज शिर्के याचा मोठा शिरकाव असून स्थानिकांना हाताशी धरून चेरीमरी करून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी अनेकांना फसवले आहे मनोज शिर्के राजेश उर्फ राकेश शिर्के गुराणा हे दोघेही बाहेरील राज्यातील कुडची बेळगाव येथील असून महाराष्ट्रामध्ये अनेक तरुणांना हाताशी धरून व वैदू समाजातील लोकांना एजंटगिरी करून दिवसभर ग्राहक शोधण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असते अनेक आजाराने वैफल्यग्रस्त झालेले लोक त्यांना भेटल्यानंतर आमच्याकडे शंभर टक्के आयुर्वेदिक औषधाने अनेक पेशंट बरे झाले आहेत आपण देखील आमच्या औषधांचा वापर करावा आपला आधार शंभर टक्के बरा होईल अशी खोटी आणि शी दाखवून मोठ्या प्रमाणात रकमा हस्तगत करतात किती जणांचा बळी गेल्यानंतर श्रीरामपूर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी या प्रकरणात लक्ष घालावे या प्रकरणाची गोपनीय फाईल राज्याचे आरोग्य विभागीय सचिव तुकाराम मुंडे यांच्याकडे पाठवण्यात आली असून या दोन मोहरक्यांना महाराष्ट्रात त मोठा हैदोस घातला... यांचे कनेक्शन अनेक ठिकाणी असून बनावट दूध यामध्ये देखील यांनी अनेक दूध संघ दूध संस्था दूध संस्था चालक यांच्याबरोबर यांचे संबंध आहे शिर्डीत साईबाबांच्या पावनभूमीमध्ये देशभरातून नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर भावी भक्तगण येत असतात या भक्तगणांना शिर्डीमध्ये विविध एजंटांच्या माध्यमातून यांची हेरेगिरी सुरू असते .. विशेष म्हणजे अनेक हॉस्पिटलमध्ये देखील यांचे कनेक्शन असून अनेक लोकांच्या किडनी व इतर अवयव देखील यांनी काढून मोठ्या प्रमाणात विक्री केलेली आहे याचा देखील शोध होणे ही काळाची गरज आहे.. राकेश उर्फ राकेश गुराणा व मनोज शिर्के यांचे शिर्डी शहरात बोगस आयुर्वेदिक दुकाने आहे अनेक दिवसांपासून या ठिकाणी या दुकानांची पाटी दोन ते तीन महिन्याला बदलली जाते मुलुंड भागात देखील यांची अनेक दुकाने आहे या दुकानांमधून तोळ्यावर औषधे विकली जातात या औषधांमधून अनेक जण दगावलेले आहेत मात्र बिले देताना खोटी बिले दिले जातात ज्यावेळेस कारवाई केली जाते त्यावेळेस ते फरार होतात व काही दिवसानंतर पुन्हा विसर पडल्यानंतर पुन्हा त्यांची दुकाने सुरू होतात शिर्डी उपविभागीय पोलीस स्टेशन समोरच या बोगस आयुर्वेदिक दुकान मनोज शिर्के याची सुरू आहे या मनोज शिर्केचा बंदोबस्त होणे ही महाराष्ट्राला काळाची गरज आहे मनोज शिर्केने आत्तापर्यंत अनेकांचा बोगस आयुर्वेदिक देऊन बळी घेतला आहे या औषधांचा इफेक्ट इतका मोठा प्रमाणात होतो की अनेक जणांना गतप्राण व्हावे लागले मात्र ज्यावेळी या दुकानांवर कारवाई होणार त्यावेळेस पोलीस दलातीलच काही स्थानिक पोलीस यांच्या बरोबर संगणक असल्यामुळे ते त्यांना माहिती देत असतात यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत ओळख असल्याचे देखील ते सांगत असतात हा व्यवसाय करत असताना आम्हाला देखील वरिष्ठांचे सहकार्य असते म्हणूनच आम्ही हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करत आहोत असा देखील पोलीस दलातील अधिकाऱ्यांवर कलंक लावल्यासारखा दोष देण्यामध्ये हे कर्नाटक राज्यातील बेळगाव कुडची येथील शिर्के पंटर सध्या आघाडीवर आहेत यांच्याकडे गावठी कट्टे व तलवार व विविध साहित्य त्यांच्या गाड्यांमध्ये असून यांनी आत्तापर्यंत अनेकांना जीवे मारण्याच्या धमक्या पण दिलेले आहे यांच्या धमक्यांना कोणी घाबरत नाही थेट दाऊद इब्राहिम अरुण गवळी पुणे शहरातील आम्ही नामचीन गुंड आहोत अशी धमकी देखील ते ग्राहकाला देत असतात या नामचीन गुंडांचा बंदोबस्त होणे ही काळाची गरज आहे आता तरी वाकचौरे साहेब आपण या प्रकरणाकडे लक्ष घाला शिर्डीतील बोगस आयुर्वेदिक विक्री करणाऱ्या या शिर्के काका पुतण्यावर कारवाई करणार का? काका पुतण्याचा इतिहास महाराष्ट्राला नव्हे तर संपूर्ण देशाला सामाजिक कार्यातून मोठ्या प्रमाणात आहे मात्र या काका पुतण्याने संपूर्ण शिर्डी शहर व नाशिक मुलुंड या भागात उद्रेक माजवला आहे या टोळीचा पर्दाफाश होणे ही काळाची गरज आहे यासाठी आपण प्रयत्न करावे अशी मागणी देखील सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे कारवाई होणार का?जखम गुडघ्याला मलम शेंडीला असा प्रकार न होता बोगस आधार कार्ड बोगस पॅन कार्ड बोगस कागदपत्रे बोगस मोबाईल सिम कार्ड मोठ्या प्रमाणात यांचा वावर आहे अनेकांनी दिवसाला मोबाईल कार्ड बदलत असतात त्यांच्या नावावर मोठ्या प्रमाणात मोबाईल कार्ड विक्री झाल्याचे देखील विशेष तपासात दिसून आलेले आहे या तपासात शिर्केपणाचा बंदोबस्त होणे ही काळाची गरज आहे महाराष्ट्रातील वैदू समाजाला बदनाम करण्याचे काम या दोन्ही शिर्के परिवाराने केले आहे या शिर्के परिवाराने सांगली मिरज कोल्हापूर या भागात देखील मोठ्या प्रमाणात हैदोस घातला आहे यांची मग्रुरी दादागिरी व गँग स्टार बंद होणे ही काळाची गरज आहे आमच्यावर गजा मारणे महाराज यांचा वरदस्त आहे असे देखील ते अनेकांना सांगत असतात त्यामुळे यांची पार्श्वभूमी ही अत्यंत गुंड प्रवृत्तीची असून महाराष्ट्रातील वैदू समाजाला बदनाम करण्याची यांचे षडयंत्र आहेत यामध्ये महाराष्ट्रातील २५ ते ३० हजार वैदू लोकांना कमीशन लालसेपोटी यांच्या एजंटगिरीमध्ये दिवसभर काम करतात अनेक हॉस्पिटलमध्ये जाऊन लोकांना चुकीचे अमिष दाखवतात. नवीन नवीन येणाऱ्या सीपीएसपी यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन खुश करण्याचे काम देखील एक प्रकारे सुरू असते अशा लोकांना पोलीस यंत्रणेने दारात देखील उभे करू नये...... या लोकांनी मोठ्या प्रमाणात या आयुर्वेदिक औषधांचा कारखाना सिन्नर येथे डॉक्टर पुरी नावाच्या गृहस्थाने सुरू केला हा ग्रस्त संगमनेर येथील भोंदूगिरी बाबा गडगे महाराजांना हाताशी धरून संपूर्ण देशभरात यांनी मोठे रॅकेट सुरू केले होते श्रीरामपूर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी या प्रकरणाचा छडा लावून भोंदू बाबा गडगे याला अटक केली मात्र डॉक्टर पुरी मनोज शिर्के राजेश उर्फ राकेश गुराणा यांना अद्यापही अटक का झाली नाही यांना अटक करावी अशी मागणी मराठा महासंघाच्या वतीने करण्यात आलेली आहे..

**किती जणांचा बळी गेल्यानंतर पोलीस यंत्रणा कारवाई करणार**

**पुण्यानंतर आता शिर्डी कडे एफ डी ए पथकाची होणार कारवाई**

**शिर्केपंटर हा महाराष्ट्राला लागलेला कलंक**

**वैदू समाजाची होते बदनामी कर्नाटक राज्यातील वैदूने घातला महाराष्ट्रात धुमाकूळ**

**बोगस आयुर्वेदिक औषधे विक्री करणारी टोळीचा मोहरक्या शिर्के अद्याप फरार**

**सांगली मिरज कोल्हापूर येथील दुर्गादास वैदू दिलीप वैभव सुरेश वैदू यांच्यावर पोलिस यंत्रणेची कडवी नजर**

**३५६ पाणी अहवाल एफडी एकूण तुकाराम मुंडे यांना सादर**

**मकोका नुसार कारवाई करावी... कारवाईनंतर शिर्के पंटर फरार**

**अहिल्या नगर जिल्ह्यातील शिर्डी येथे बोगस आयुर्वेदिक दुकाने अद्यापही सुरू श्रीरामपूर पोलीस अधीक्षक सोमनाथ जी वाकचौरे यांनी कारवाई करण्याची मागणी**

**नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर नगर संगम नेर येथील देखील बोगस आयुर्वेदिक चालक-मालक यांच्यावर FDA पथकाची नजर**

भाग क्रमांक २..... डॉ विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

## संक्षिप्त

### देशात पुन्हा कोरोनाची चाहूल! आंध्र प्रदेशात २ मृत्यू, ८ सक्रिय रुग्ण; आरोग्य यंत्रणा हायअलर्टवर

**आंध्र प्रदेश :** देशात पुन्हा एकदा कोरोना संसर्गाची चाहूल लागल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. आंध्र प्रदेशातील वायएसआर कडप्पा जिल्ह्यात कोविड-१९ मुळे दोन जणांचा मृत्यू झाला असून आठ सक्रिय रुग्णांची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आरोग्य विभागाला हायअलर्टवर ठेवत तपासणी, देखरेख आणि संपर्क शोध मोहीम अधिक वेगाने सुरू केली आहे.




दोन मृत्यूंमुळे वाढली चिंता :

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, मृतांमध्ये ५२ वर्षीय एका पुरुषाचा समावेश आहे. ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे दिसल्यानंतर त्यांची कोविड चाचणी पॉझिटिव्ह आली होती.

### दशावतार कलाकार सर्वेक्षणासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात विशेष नोंदणी मोहीम

- **जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये पंचायत समिती आणि तहसील कार्यालयात विशेष कक्ष**

**मुंबई :** महाराष्ट्राच्या समृद्ध लोकनाट्य परंपरेचा अविभाज्य घटक असलेल्या दशावतार लोककलेचे जतन, संवर्धन आणि कलाकारांची अद्ययावत माहिती संकलित करण्याच्या उद्देशाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार कलाकारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती आणि तहसील कार्यालय येथे विशेष नोंदणी कक्ष स्थापन करण्यात येणार असून, इच्छुक कलाकारांसाठी नोंदणी फॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### पावसाचा फटका! राज्यात भाजीपाल्याचे दर दुप्पट; सर्वसामान्यांच्या खिशाला बसली कात्री

**मुंबई:** राज्यात मागील काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले असून बाजारात आवक घटल्याने भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. पावसानंतर मागणी वाढल्याने अनेक भाज्यांचे भाव दुप्पट झाले असून सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

जून महिन्यात पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने भाजीपाला पिकवला होता. मात्र जुलैच्या सुरुवातीला झालेल्या जोरदार पावसामुळे शेतात पाणी साचून अनेक पिकांचे नुकसान झाले. परिणामी बाजारात पुरवठा कमी झाला आणि दर वाढले.

### एमबाप्पेने रचला इतिहास ! फिफा वर्ल्ड कप २०२६ मध्ये मोडले पाच मोठे विक्रम !

**बॉस्टन :** फिफा विश्वचषक २०२६ आता अंतिम टप्प्यात आहे. मागील अनेक स्पर्धांच्या तुलनेत या वर्षीची स्पर्धा ऐतिहासिक ठरली आहे. या विश्वचषकादरम्यान अनेक महत्त्वपूर्ण विक्रम मोडले गेले आहेत आणि असंख्य खेळाडूंनी आपल्या कामगिरीने इतिहासात आपले नाव कोरले आहे. यात फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बापेने चालू फिफा विश्वचषक २०२६ मध्ये ऐतिहासिक आणि विक्रमी कामगिरी करत फुटबॉल जगतातील महान खेळाडूंच्या यादीत आपले स्थान पक्के केले आहे. अवघ्या २७ व्या वर्षी, रिअल माद्रिदच्या या फॉरवर्ड खेळाडूने फ्रान्सच्या राष्ट्रीय संघाचे आणि जागतिक फुटबॉलचे अनेक जुने विक्रम मोडीत काढले आहेत. फ्रान्सने मोरोक्कोविरुद्ध मिळवलेल्या २-० अशा दणदणीत विजयानंतर एम्बापेने हा पराक्रम केला.



## मंत्रालयात पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची नियमितपणे साफसफाई व नमुने तपासणी : सार्वजनिक बांधकाम विभागाची माहिती

**मुंबई:** मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची नियमितपणे साफसफाई करण्यात येते. यापूर्वी २६ एप्रिल २०२६ रोजीच मंत्रालयातील सर्व पाण्याच्या टाक्या साफ करण्यात आल्या होत्या. याबाबत तक्रारीची तात्काळ नोंद घेऊन साडेचार लाख लिटर क्षमतेच्या टाक्यांची पुनश्चः साफसफाई सुरु करण्यात आली असून दोन दिवसांत साफसफाई पूर्ण करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

तसेच यापूर्वी येथील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या प्रयोगशाळेतून करण्यात आली आहे, तपासणीअंती २९ एप्रिल २०२६ रोजी पाणी पिण्यासाठी योग्य असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला होता. आता ९ जुलै २०२६ रोजी मंत्रालय इमारतीमधील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले असून चाचणी अहवाल प्रलंबित आहेत, मुख्य व विस्तारित इमारतीमधील एकूण ३३ जलशुध्दीकरण यंत्रणांची देखभाल व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहेत.

मुख्य इमारतीच्या छतावर १०,००० लिटर क्षमतेच्या ४ व ५००० लिटर क्षमतेच्या ९ टाक्या आहेत. एकूण ८५००० लिटर क्षमतेचा पाणीसाठ्याकरिता १३ टाक्या आहेत. ॲनेक्स इमारतीच्या छतावर कॉक्रिटच्या २०००० लिटरच्या २ व ३००० लिटरच्या ३ व ५००० लिटरच्या १२ टाक्या आहेत. एकूण १०९००० लिटर क्षमतेच्या पाणीसाठ्याकरिता १७ टाक्या आहेत. पाण्याची १ भूमिगत टाकी ४.५० लक्ष लिटर क्षमतेची आहे. पिण्याच्या पाण्याबाबत तक्रारीची तत्काळ नोंद घेऊन ८ जुलै २०२६ रोजी मंत्रालय इमारती मधील भूमिगत व छतावरील पिण्याच्या पाण्याच्या सर्व टाक्या पुनश्चः साफ करण्यासाठी घेतलेल्या आहेत. तसेच सद्यःस्थितीत एका भूमिगत टाकीमधील अस्तित्वातील ४ भागांपैकी २ भागांची सफाई पूर्ण करण्यात आली असून उर्वरित दोन भागांची सफाई आज पूर्ण होत आहे. भूमिगत टाकीचे साफसफाईचे काम पूर्ण करण्यात येईल, असे अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई यांनी म्हटले आहे.

## जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ठरावासाठी दोन लाख ७५ हजार रुपयांचा लिलाव

### वाघापूर सोसायटीचा ठराव जिल्ह्यात बनला चर्चेचा विषय

**वाघापुर विविध कार्यकारी सोसायटी वाघापूर यांच्या वतीने विश्वासराव हरिभाऊ रकटे पाटील यांचा अहिल्या नगर जिल्हा बँकेच्या मतदानासाठी एकमताने वाघापूर ग्रामस्थांच्या उपस्थितीत एकमताने ठराव..... नाद करा पण रकटे पाटलांचा कुठे....**



शेवटी नाद करायचा नाय आमचा नाद करायचा नाय बळीराजा एकदा मैदानात उतरल्यानंतर मग ती बैलगाडा शर्यत असो किंवा गावचा एखादा लिलाव असो किंवा सरपंच पदाची निवडणूक असो किंवा पाटील पदाचा मान असो कितीबी लावा शक्ती कितीबी लावा युक्ती मात्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठरावासाठी एका सोसायटी मध्ये चक्क दोन लाख ७५ हजार रुपये किमतीचा बोली लिलाव गावच्या विकासासाठी देण्यासाठी शेतकरी सभासद विश्वास हरिभाऊ रकटे ठरले मानकरी..... अहिल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपले आहे संपूर्ण जिल्ह्यामध्ये आपल्या नावाचा ठराव व्हावा यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करताना दिसत आहेत माझा ठराव झाल्यानंतर मी माझ्या उमेदवाराला मतदान करू शकतो लोकशाहीमध्ये या मताधिक्याला महत्त्व किती आहे कालपर्यंत आपण ऐकले असेल एका मताला पाचशे हजार दोन हजार तीन हजार पाच हजार रुपये आज चक्क मात्र अकोले तालुक्यातील मुला परिसरातील वाघापूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या ठराव कोणाचा करायचा यासाठी चक्क मुंबई पुणे येथे नोकरीनिमित्त असणारे सभासद देखील या ठिकाणी दाखल झाले ठराव कोणाचा करायचा यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत होता सोसायटी संचालक मंडळाला देखील यामध्ये ठराव व्हावा अशी अपेक्षा असताना मात्र घडले भलतेच ज्याच्या नावाचा ठराव करायचा आहे ती झाली बोली पद्धत सुरू या बोली पद्धतीमध्ये एक लाख ६० हजार रुपये दोन नंबर दादाभाऊ बापू लांडे यांनी एक लाख रुपये तर तिसरी बोली विश्वास हरिभाऊ रकटे यांनी दोन लाख ७५ हजार रुपये बोली लावत गावाच्या विकासासाठी ही देणगी देण्याचे जाहीर केले आणि आपल्या नावाचा एकमताने ठराव संपूर्ण सभासदांनी मंजूर केला हा एक आनंद व्यक्त करण्याचा गावाला विकासासाठी देण्याचा भाग असेल दुसरीकडे मात्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठरावासाठी चक्क सभासद लाख रुपयाची देणगी गावाला देऊ शकतात त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला किती महत्त्व असेल जर जिल्हा बँकेची निवडणूक लागली तर त्या जिल्हा बँक निवडणुकीमध्ये आपल्याला मत मिळावे यासाठी उमेदवार ज्यावेळी मतदार राजा कडे जातील त्यावेळी एका मताला किती किंमत मिळेल हे मात्र आजच्या वाघापूर सोसायटीच्या ठराव प्रसंगी संपूर्ण राज्याला ऐकावी असे नवलच घडले तसे पण वाघापूर गाव हेच नगर जिल्ह्यामध्ये प्रथम पासूनच आघाडीवर आहे या सोसायटीचे प्रत्येक वार्षिक सभेत संचालक प्रश्न सत्ताधारी संचालकाला विचारतात त्यामुळे वाघापूर सोसायटीचा ठराव हा मात्र जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला भविष्य काळामध्ये उमेद देणारा ठरणार आहे तर जिल्हा बँकेला मात्र भविष्यकाळातील निवडणुकीत ही निवडणूक आर्थिक निकषावर होणार हे मात्र सत्य असते तर वरिष्ठ पातळीवर थोरात विखे यांनी एकत्र येऊन निवडणूक बिनविरोध केली तर आजच्या ठरावाला लावलेली बोली व अनेक जण जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे लक्ष देऊन असेल त्यांचे मात्र काय होणार असा सवाल देखील ग्रामीण भागामध्ये चर्चेला आला आहे दुसरीकडे मात्र नाद करायचा नाय पाटील की आमची हाय अशी देखील चर्चा जोरात सुरू आहे **.....डॉक्टर विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

# ठाकरेंवर हल्ला, सत्तेवर मौन – ही पत्रकारिता की प्रचारयंत्रणा?

उद्धव ठाकरे यांच्याकडून लोकप्रतिनिधी का जातात यावर काही पत्रकार आणि संपादक यांनी हजारो शब्द खर्च केलेत पण ते कोण घेऊन जातं, कशाच्या जोरावर घेऊन जातं आणि का घेऊन जातं यावर मात्र सोयीस्कर मौन बाळगलंत.

जर पक्षफुटीचे कारण फक्त नेतृत्वातील उणिवा असतील तर मग ममता बॅनर्जींचे खासदार का फुटले? शरद पवारांचा पक्ष का फोडला गेला? आम आदमी पक्षाचे खासदार का गेले? देशभरातील प्रादेशिक पक्षांनाच का लक्ष्य केले जाते? याचे उत्तर त्यांच्या संपादकीयात नाही.

कारण उत्तर स्पष्ट आहे.

सत्तेची ताकद, केंद्रीय यंत्रणांचा दबाव, निधीची अडवणूक, चौकशांची तलवार, माध्यमांची बदनामी मोहीम आणि २४ तास निवडणूक मोडमध्ये चालणारी राजकीय अभियांत्रिकी हीच आजच्या पक्षफुटींची खरी कारणे आहेत. पण हे मान्य केले तर ऑपरेशन टायगरचा फुगा फुटेल म्हणून सगळी जबाबदारी ठाकरेंच्या नेतृत्वावर ढकलण्याचा प्रयत्न केला जातो.

विशेष म्हणजे ज्या भाजपने २०२२ मध्ये ४० आमदार फोडले, खासदार फोडले, पक्ष आणि चिन्ह हिरावून घेतले, त्याच भाजपच्या सम र्थकांना आजही यामध्ये लोकशाहीचा विजय दिसतो. चोरीला ऑपरेशन, दरोड्याला रणनीती आणि पक्षफोडीला पराक्रम म्हणणं ही पत्रकारिता नाही ती राजकीय भाटगिरी आहे.

ते म्हणतात, आत्मपरीक्षण करा.

हो, आत्मपरीक्षण सर्वांनीच करायला हवं. पण आधी हे सांगा की ज्यांच्या विरोधात याचिका दाखल झाल्या, त्यांचे निकाल चार–चार वर्षे प्रलंबित का राहतात? अपात्रतेची प्रकरणे थंड बस्त्यात का पडतात? सत्ताधाऱ्यांविरोधात संवैधानिक संस्थांची गती अचानक मंद का होते?

आणि आणखी एक प्रश्न देशभर सुरू असलेल्या या पक्षफोडीच्या उद्योगाचा आर्थिक हिशोब कोण मांडणार?

आमदार–खासदार फोडण्यासाठी चार्टर्ड विमानं कुठून येतात? पंचतारांकित हॉटेलांमधील मुक्कामाचा खर्च कोण करतो? प्रत्येक निवडणुकीत हजारो कोटी रुपये पाण्यासारखे कुठून ओतले जातात? प्रत्येक जिल्हा–तालुक्यात उभी राहणारी आलिशान पक्ष कार्यालये, प्रचंड जाहिरात मोहिमा, सोशल मीडियाची सैन्ये आणि अखंड निवडणूक मोड यासाठी पैसा कोण पुरवतो? ज्याने स्वतःला विकण्याचा निर्णय घेतला, त्याच्यावर टीका व्हायलाच हवी. पण त्याला विकत घेण्यासाठी लागणारा पैसा कुठून येतो, हा प्रश्न विचारण्याचे धाडस किती संपादक आणि भाष्यकार दाखवतात? विकले जाणाऱ्यांवर अग्रलेख लिहिणे सोपे असते पण खरेदी करणाऱ्यांचा हिशोब मागणे ही खरी पत्रकारिता असते. या प्रश्नांची उत्तरे न देता फक्त उद्धव ठाकरे कमी पडले हा निष्कर्ष काढणे म्हणजे निदानाआधीच निकाल लिहिण्यासारखे आहे. या प्रश्नांची उत्तरे न देता फक्त उद्धव ठाकरे कमी पडले हा निष्कर्ष काढणे म्हणजे निदानाआधीच निकाल लिहिण्यासारखे आहे. आणि संजय राऊत यांच्या भाषेवर ज्यांना इतका आक्षेप आहे, त्यांनी भाजपच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना चोर, बदमाश म्हटल्यावर किती संपादकीय लिहिले होते, याचाही हिशोब द्यावा.

राडा या शब्दावर काही लोकांचा अचानक लोकशाहीप्रेम जागृत झाला आहे. पण लोकशाहीची हत्या होत असताना, निवडून आलेले आमदार–खासदार पैशाच्या, सत्तेच्या आणि दबावाच्या जोरावर पळवले जात असताना, पक्ष फोडले जात असताना, चिन्हे हिसकावली जात असताना आणि न्याय मिळण्यास वर्षानुवर्षे विलंब होत असताना याच लोकांचे तोंड मात्र बंद होते. शिवसेनेत आता राडा करायची ताकद राहिली नाही असं म्हणणाऱ्यांनी आधी एक प्रश्नाचं उत्तर द्यावं... जर खरंच कुणाची भीती नसेल, तर २०२२ मध्ये सुरत–गुवाहाटी–गोवा असा गुप्त प्रवास करण्याची गरज का पडली होती? आणि मुंबईत परतताना केंद्राच्या सुरक्षा कवचातच प्रवेश का करावा लागला होता? आजही गद्दारांभोवती पोलिसांची, सुरक्षेची आणि सत्तेची कवचकुंडलं का गुंडाळली जातात? भीती शिवसैनिकांची आहे, भीती जनतेच्या रोषाची आहे. म्हणून राडा करायची ताकद उरली नाही असे दावे करणाऱ्यांनी आधी हे सांगावं की ज्यांच्यात दम नाही, त्यांच्यापासून वाचण्यासाठी इतकी सुरक्षा का लागते? बाकी इतिहास साक्षी आहे... शिवसैनिकांची ताकद सिद्ध करण्यासाठी त्यांना सुरक्षा कवचाची गरज कधीच पडली नाही पण गद्दारांना मात्र आजही पडते. आज लढाई फक्त न्यायालयात नाही, फक्त संसदेत नाही, फक्त विधिमंडळात नाही. ती जनतेच्या मनात आणि रस्त्यावरही लढली जाणार आहे. अर्थात ही लढाई लोकशाही मार्गाने, जनमताच्या ताकदीने आणि राजकीय संघर्षातूनच होईल. कारण प्रश्न फक्त पक्षाचा नाही, तर विश्वासाचा आहे. ज्यांनी देवाची, धर्माची, आई–वडिलांची, मुलाबाळांची शपथ घेऊन निष्ठा व्यक्त केली आणि सत्तेची चाहूल लागताच पाठ फिरवली, त्यांच्यावर लोकांनी फुलांचा वर्षाव करावा अशी अपेक्षा ठेवणे म्हणजे जनतेचा अपमान आहे. जनता मूर्ख नाही. कोण संघर्षात उभा राहिला आणि कोण सत्तेच्या दरबारात जाऊन नतमस्तक झाला हे तिने पाहिले आहे. म्हणूनच काही लोकांना संजय राऊत यांची भाषा खटकते. पण गद्दारीचे समर्थन करणाऱ्यांना गद्दारी हा शब्द खटकणारच. कारण सत्य अनेकदा कडू असते.

बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर निष्ठा, स्वाभिमान आणि बंडखोरीची भाषा केली. त्यांनी गद्दारीचे कधीही उदात्तीकरण केले नाही. त्यामुळे गद्दारीला गद्दारी म्हणणे आणि बेईमानीला बेईमानी म्हणणे हा गुन्हा नाही तीच शिवसेनेची परंपरा आहे. जनता आता हे ठरवेल की जे स्वतःच्या शब्दाला, शपथेला आणि मतदारांच्या विश्वासाला जागले नाहीत, त्यांची आरती करायची की त्यांना जाब विचारायचा. कारण लोकशाहीत अंतिम न्यायालय कोणते असेल तर ते जनता जनार्दनच असते.

खरी गोष्ट एवढीच आहे की,

जर ठाकरे संपले असते तर रोज ऑपरेशन ठाकरेची गरज भासली नसती. जर ठाकरे अप्रासंगिक असते तर प्रत्येक राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठाकरे नसते. आणि जर भाजपला स्वतःच्या जनाधारावर पूर्ण विश्वास असता, तर विरोधी पक्षांचे आमदार–खासदार फोडण्यात इतकी ऊर्जा खर्च झाली नसती. लोकशाहीत विरोधकांचा पराभव मतपेटीत करायचा असतो पक्षफोडीच्या प्रयोगशाळेत नाही. बाकी राड्यात किती दम? हा प्रश्न विचारणाऱ्यांनी आधी लोकशाहीत किती दम उरलाय? याचं उत्तर द्यावं.

जय महाराष्ट्र!

आमदार.सुर्यकांत शिंदे.. उबाठा शिवसेना संगमनेर शिर्डी संपर्क प्रमुख.



सूर्यकांत राजाराम शिंदे
संगमनेर – शिर्डी
विधानसभा संपर्कप्रमुख

# युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांसाठी खुला करा : काँग्रेसची मागणी

## शासनाच्या ताब्यातील संगमनेर तालुक्यातील युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांना द्या

संगमनेर (समर्थ गांवकरी)

सध्या खरीप हंगाम सुरू झाला असून तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खताची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. खरीप हंगामा बाजरी मका सोयाबीन हे पिके उभी करताना युरिया अत्यंत गरजेचे असून शासनाच्या ताब्यात असलेल्या युरियाचा बफर स्टॉक तातडीने शेतकऱ्यांना खुली करावा अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली असून याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.

उपविभागीय कृषी अधिकारी यांना संगमनेर तालुका काँग्रेसच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, कारखान्याचे संचालक विजय राहणे, सचिन दिघे, सरपंच नवनाथ कातोरे, संदीप गुंजाळ ,अमोल गुंजाळ, शुभम गुंजाळ ,योगेश गव्हाणे, अरुण गुंजाळ ,सागर वामन, नाम देव शिंदे, सुनील लांडगे, बाबासाहेब आभाळे, सचिन गुंजाळ ,नानासाहेब ढगे, भाऊसाहेब बालवडे ,लक्ष्मण गुंजाळ, अनिल लांडगे, सुदर्शन गुंजाळ, संगम लांडगे, सचिन लांडगे आदींसह संगमनेर तालुक्यातील विविध शेतकरी उपस्थित होते.



या निवेदनात म्हटले आहे की, सध्या निर्माण झालेला युरियाचा तुटवडा हा कृत्रिम नसून अनेक खत विक्रेत्यांकडे विक्रीसाठी युरियाचा साठाच उपलब्ध नाही .त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच तालुक्यात युरिया उपलब्ध असल्याची चुकीची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचवत असल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे भविष्यात कृषी विभागाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या सुरू असलेल्या खरीप हंगाम ात बाजरी, मका ,सोयाबीन हे पीक तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेतले जात असून संगमनेर तालुक्यात असलेल्या शासनाच्या साठ्यातील युरियाचा बफर स्टॉप तातडीने शेतकऱ्यांसाठी खुला करावा. जेणेकरून खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना वेळेत युरिया उपलब्ध होऊ त्यांच्या पिकांचे नुकसान होणार नाही.

यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे म्हणाले की, यापूर्वीही दरवर्षी युरिया खताची मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची मागणी असायची अशावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात ही शासनाच्या विविध विभागांना सूचना देऊन शेतकऱ्यांना वेळेत युरिया उपलब्ध करून द्यायचे. शासनाचा बफर स्टॉप शेतकऱ्यांसाठी खुला करून द्यायचे मात्र आता तसे होत नसून अपयश झाकण्यासाठी चुकीच्या बातम्या दिल्या जात आहेत.

तर सचिन दिघे म्हणाले की, हा तालुका शेतकऱ्यांचा आणि कष्टकऱ्यांचा तालुका आहे त्यामुळे शासनाने या सर्व बाबींची दखल घेऊन तातडीने शासनाच्या ताब्यातील युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांसाठी खुला करावा अशी आग्रही मागणी आम्ही करत आहोत अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

यावेळी विजय राहणे, नवनाथ कातोरे ,संदीप गुंजाळ ,योगेश गव्हाणे, अरुण गुंजाळ ,सागर वामन, नामदेव शिंदे यांनीही विविध समस्या मांडल्या.

काँग्रेसच्या या मागणीमुळे शेतकऱ्यांना लवकरच युरिया उपलब्ध होईल अशा अशा निर्माण झाल्या आहेत.

# अपघातग्रस्त वारक–यांचे वारसांना १५ लाख रुपये नुकसान भरपाईची मागणी

## अखिल भारत हिंदू महासभेचे मुख्यमंत्र्यांना साकडे संत ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्यातील घटना

आळंदी (समर्थ गांवकरी)

संत ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्यात नुकत्याच घडलेल्या एका अत्यंत दुर्दैवी अपघातात ३ वारकरी यांचा मृत्यू झाला तर ७ वारकरी जखमी झाले. पंढरपूरकडे मार्गस्थ असलेल्या पायी वारीत वारकरी भाविकांच्या दिंडीतील वारकरी यांना ट्रकने धडक दिल्याने दुर्दैवी अपघात झाला. यात ३ निष्पाप वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच ७ जण जखमी झाले आहेत. ही घटना संपूर्ण वारकरी संप्रदायासाठी आणि समस्त हिंदू समाजासाठी अत्यंत वेदनादायी आहे. अपघातग्रस्त वारक–यांचे वारसांना प्रत्येकी १५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी अखिल भारत हिंदू महासभेचे वतीने वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष वैभवराज रौंधळ, पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यामंत्री एकनाथजी शिंदे, श्रीमती सुनेत्राताई पवार, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमाईटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप यांचेसह पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर यांना निवेदन देऊन त्यांना वारकरी भाविकांना भरीव मदत देण्यासाठी साकडे अखिल भारत हिंदू सभेचे वतीने घालण्यात आले आहे.

या दुर्दैवी अपघाताचे घटनेतील पायी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या अपघाती निधनाबद्दल मृतांच्या वारसांना प्रत्येकी १५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यासह इतर ७ जखमींना भरीव मदत सहकार्य देण्यासाठी निवेदन देत विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यात मृत वारकरी हे सामान्य कुटुंबातील असून, ते अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने वारीत सहभागी झाले होते. या अपघातामुळे त्यांच्या कुटुंबाचा आधारच हिरावला गेला असून, त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अशा कठीण प्रसंगी या पीडित कुटुंबांना आधार देणे ही शासनाची तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहाळ्या अंतर्गत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी आळंदी यांची हि नैतिक जबाबदारी असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

विविध मागण्यांमध्ये सदर अपघातात मृत पावलेल्या प्रत्येक वारकऱ्याच्या वारसांना महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी १५ लाख रुपयांची भरीव आर्थिक मदत जाहीर करावी. तसेच मृत वारकरी भाविक यांचे वारसांना प्रत्यके कुटुंबातून किमान एका व्यक्तीस राज्य शासनाने शासकीय सेवेत नोकरी देऊन दिलासा द्यावा. या अपघातामध्ये जखमी झालेल्या वारकऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने करावा. तसेच उपचारा नंतरचा पुढील सहा महिन्याचा खर्च श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी आळंदी यांनी करावा. या साठी आळंदी देवस्थानने भरीव आर्थिक मदत द्यावी. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी वारी मार्गावर पोलीस बंदोबस्त अधिक कडक करावा आणि अशा दुर्दैवी घटना पुन्हा घडू नयेत, या साठी कडक उपाय योजना कराव्यात. सुरक्षित भक्तिमय वारी होण्यासाठी वाहतूक पोलीस, वारी बंदोस्त अधिक प्रभावी ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. अखिल भारत हिंदू महासभा राष्ट्रीय संरक्षक श्री श्री १००८ जगद्गुरु स्वामी माधवानंद सरस्वती जी महाराज, राष्ट्रीय धर्म प्रचारक श्रीमंत शिवनाथ जी महाराज, योगी आनंद दादा नाथजी गुरु सुखनाथ जी महाराज, बालयोगी ऋषिकेश नाथ जी महाराज गुरु महंत शिवनाथ जी महाराज, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य मोहन सदचिदानंदजी सरस्वती जी महाराज, महंत योगानंद सरस्वती जी महाराज, महंत केशवानंद सरस्वती जी महाराज, राष्ट्रीय कार्याध्यक्ष योगेंद्र वर्मा, राष्ट्रीय महामंत्री डॉ. सिद्धार्थ भट्टाचार्य आदींनी मागणीसाठी प्रस्ताव दिला आहे. या प्रकरणी गांभीर्य ओळखून, पीडित कुटुंबांना लवकरात लवकर न्याय न मिळाल्यास अखिल भारत हिंदू महासभेतर्फे वेळ प्रसंगी सनदशीर मार्गाने आंदोलन छेडले जाईल असा इशारा देण्यात आला आहे.

# चेकेवाडी येथे दिंडीतील वारकऱ्यांना चहा पाण्याची सोय

पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

आषाढीवारी निमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान झालेल्या दिंडीतील वारकऱ्यांना चेकेवाडी येथील आदेश ग्रुपच्या वतीने चहा पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखीचे भक्तीमय स्वागत करत वारकऱ्यांना चहापाणी, शाल, दिंडी पताका देत पुष्पवृष्टी करत ज्ञानोबा तुकारामच्या जयघोषात पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत होते.

चेकेवाडी हा दिंडी मार्ग असल्याने शेकडो दिंड्या येथून जातात. बाल गोपाळांच्या आदेश ग्रुपचे हे दुसरे वर्ष आहे. आदेश ग्रुपचे सदस्य महेश वाघ, शुभम वाघ, हनुमान जिवडे, दत्ता शेळके, दीपक चेके, संदीप चेके, तुकाराम जीवडे, गणेश जिवडे, वैभव कोलते, बाबासाहेब कोलते, प्रतिक कोलते यांनी अथक परिश्रम केले.

या सदस्यांना मऊ चेके, शुभम जिवडे, ऋषी जीवडे, आर्यन जीवडे, योगेश वाघ, अनिकेत औटी, बबलू चेके यांनी मोलाची साथ दिली.



# लोकायुक्त न्या. कानडे यांच्याकडून ५३ वा अहवाल राज्यपालांना सादर

**मुंबई :** राज्याचे लोकायुक्त न्या. वि. मु. कानडे (नि.) यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन त्यांना आपल्या काम काजासंबंधीचा ५३ वा वार्षिक अहवाल सादर केला.

महाराष्ट्र लोकायुक्त आणि उपायुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १२ पोटकलम (६) नुसार, २०२५ मधील लोकायुक्त व उपायुक्त यांच्या कामकाजासंबंधी हा अहवाल आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

लोकायुक्त कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार २०२५ या अहवालाधीन वर्षात लोकायुक्त कार्यालयाकडे ८५४७ नवीन तक्रारी प्राप्त झाल्या. त्या पैकी ३८६९ तक्रारी स्वाक्षरी विरहित व इतर प्राधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जाच्या प्रति असल्यामुळे नोंदविण्यात आल्या नाहीत. अशा प्रकारे अहवालाधीन वर्षात ४६७८ नवीन तक्रारी नोंदविण्यात आल्या.

वर्षाच्या सुरुवातीला ४२८७ प्रकरणे प्रलंबित होती. अशा प्रकारे २०२५ मध्ये ८९६५ प्रकरणे कार्यवाहीकरिता उपलब्ध झाली.

नोंदणी केलेली ४८८५ प्रकरणे अहवालाधीन वर्षात निकाली काढण्यात आली आणि २०२५ च्या वर्षअखेरीस ४०८० प्रकरणे प्रलंबित राहिली, असे लोकायुक्त कार्यालयाकडून नमूद करण्यात आले.


## ग्रामपंचायत पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव, जि.पुणे

ग्रामपंचायत पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव, जि.पुणे खालीलप्रमाणे कामांचे सीलबंद निविदा जि. प. पुणे कडील खालील नमूद केलेल्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून (दोन पाकीट पध्दतीने) निविदा मागविण्यात येत आहेत. सदरच्या ग्रा.पं. पारगाव तर्फे अवसरी बु. कार्यालयात दि. १५/०७/२०२६ पासून २१/०७/२०२६ पर्यंत कार्यालयात सकाळी १०.०० वाजेपर्यंत जमा करण्यात येतील व दि. २१/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेनंतर किंवा कार्यालयीन सोयीच्या दृष्टीने ग्रा.पं. कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | कामाची कालवधी | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पारगाव तर्फे अवसरी बु. येथे रोहिदासनगर सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५०००००/– | ३००/– | ६ महिने | नोंदणीकृत सु.बे. अभियंता |
| २ | मौजे पारगाव तर्फे अवसरी बु. येथे उर्वरित सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे. | ४९९९४९/– | ३००/– | ६ महिने | नोंदणीकृत सु.बे. अभियंता |
| ३ | मौजे पारगाव तर्फे अवसरी बु. येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम व दुरुस्ती करणे. | ११३६६०/– | ३००/– | ६ महिने | नोंदणीकृत सु.बे. अभियंता |

टिप : १) कोणत्याही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा (काम रद्द करण्याचा) अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवले आहे. २) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा संपूर्ण तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला आहे. ३) कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे – १) निविदा फी पावती, २) नोंदणी प्रमाणपत्र ३) प्राप्तीकर प्रमाणपत्र ४) वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव, जि.पुणे

**सरपंच / उपसरपंच**
ग्रामपंचायत पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव, जि.पुणे



## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३७/२०२६ अकोले दि. १४/०७/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. मुरलीधर महादु नवले, रा. गुहिरे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची पत्नी कै. पार्वताबाई मुरलीधर नवले यांचा मृत्यू दि. २१/१२/२०२१** रोजी **मौज गुहिरे** येथे झाला असुन त्यांच्या **पत्नीच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय गुहिरे**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. मुरलीधर महादु नवले, रा. गुहिरे**, ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची पत्नी कै. पार्वताबाई मुरलीधर नवले यांचा मृत्यू दि. २१/१२/२०२१** रोजी **मौज गुहिरे**, येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय गुहिरे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१४/०७/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# राजकारणाच्या रणांगणातून... विठ्ठलाच्या चरणी!

## सत्तेच्या शिखरावरून भक्तीच्या मार्गावर; माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या जीवनाला अध्यात्माची नवी दिशा

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

राजकारणात काही माणसे पदामुळे मोठी होतात, काही सत्तेमुळे. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, काळ सरतो, पदे बदलतात, सत्ता येते-जाते; तरी समाजातील त्यांच्याविषयीचा आदर कायम राहतो. माजी मंत्री बबनराव पाचपुते हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक मानले जातात.

सुमारे अकरा वर्षांचा मंत्रिपदाचा कार्यकाळ आणि तब्बल छत्तीस वर्षे विधानसभा सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात ठसा उमटवला. या दीर्घ प्रवासात त्यांनी अनेक राजकीय चढ-उतार, संघर्ष, टीका आणि आव्हाने अनुभवली. अनेकदा त्यांच्या राजकीय अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले; मात्र वादळांनी अधिक मजबूत होणाऱ्या वटवृक्षाप्रमाणे त्यांनी प्रत्येक संकटाचा सामना केला.

सुमारे दशकापूर्वी अनेकांनी त्यांचा राजकीय प्रवास संपल्याचे भाकीत केले होते. परंतु त्यांनी केवळ स्वतःचे स्थान टिकवले नाही, तर पुढील पिढीचे नेतृत्वही घडवले. आमदार विक्रम पाचपुते यांच्या विजयामागे बबनराव पाचपुते यांनी आयुष्यभर जपलेला जनसंपर्क, कार्यकर्त्यांशी असलेले दृढ नाते आणि जनतेचा विश्वास महत्त्वाचा ठरल्याचे त्यांच्या समर्थकांचे मत आहे.

बबनराव पाचपुते यांच्या भाषणशैलीत स्पष्टवक्तेपणा आणि अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका दिसून येत असे. मात्र नियतीने त्यांच्या आरोग्यावर परिणाम केला आणि आवाजावरही त्याचा परिणाम झाला. तरीही त्यांनी जिद्द सोडली नाही. या कठीण काळात त्यांच्या पत्नी डॉ. प्रतिभा पाचपुते आणि कार्यकर्त्यांनी त्यांना खंबीर साथ दिली. या पाठबळातून त्यांनी जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्यास सुरुवात केली.

राजकारणात कार्यकर्त्यांना कुटुंबाचा भाग मानणारे नेते विरळा असतात. बबनराव पाचपुते यांनी पद, सत्ता किंवा परिस्थिती कोणतीही असो, कार्यकर्त्यांशी असलेले नाते कायम जपले. त्याचबरोबर पंढरपूरच्या विठ्ठलावरील त्यांची श्रद्धाही अधिक दृढ होत गेली. कार्यकर्ते आणि विठ्ठल-ही दोन नाती त्यांनी आयुष्यभर जपल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांकडून सांगितले जाते.

काळाच्या ओघात त्यांची वाट वारकरी संप्रदायाकडे वळली. प्रवचन, नामस्मरण आणि अध्यात्माच्या माध्यमातून त्यांनी आयुष्याला नवे वळण दिले. सुरुवातीला काहींनी या बदलाकडे संशयाने किंवा टिंगल-टवाळीने पाहिले; मात्र अध्यात्माचा मार्ग हा अंतर्मनातील शांततेचा असल्याचे त्यांनी आपल्या आचरणातून दाखवून दिले. यंदाच्या आषाढी वारीत आजारपणामुळे अडचणी निर्माण होण्याची शक्यता असतानाही डॉ. प्रतिभा पाचपुते यांनी वारकरी परंपरा अखंड ठेवत पंढरपूरची वारी केली. त्यांच्या या आध्यात्मिक प्रवासात बबनराव पाचपुते यांचे पाठबळही तितकेच महत्त्वाचे ठरले.

राजकारण माणसाला नेतृत्व देते, तर भक्ती त्याला नम्रता शिकवते. सत्तेचा प्रवास इतिहासात नोंदला जातो; मात्र पंढरीची वाट मनामनांत कायमची कोरली जाते. म्हणूनच बबनराव पाचपुते आणि डॉ. प्रतिभा पाचपुते यांच्याविषयी व्यक्त होणारा आदर हा केवळ सार्वजनिक जीवनातील योगदानापुरता मर्यादित नसून, विठ्ठलभक्त वारकरी दांपत्य म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते.



## ऐतिहासिक कर्जमाफीबद्दल १५ जुलैला मुख्यमंत्री फडणवीसांचा शेतकऱ्यांकडून जाहीर सत्कार



**मुंबई :** राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राज्यातील शेतकऱ्यांतर्फे १५ जुलै रोजी जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणार असून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली होती. महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील मर्यादा हटवून त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्ज घेऊन वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

### गुणवंतांचा गौरव, आंब्याच्या रोपांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीत नव्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाचा स्थापनेपासूनचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध वातावरण आणि विविध उपक्रमांद्वारे घडविण्यात या महाविद्यालयाने महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालयातील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, आधुनिक भौतिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी उपक्रमशील शिक्षक डॉ. बापू देवकर यांनी विद्यार्थ्यांना आंब्याची रोपे भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. प्रा. भोसले सर यांनी भूगोल विषयात ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रत्येकी ₹१,१०० रोख पारितोषिक देऊन गौरव केला. तसेच प्रा. सौ. उषा बोरुडे यांनी विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या तसेच भौतिकशास्त्र विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा रोख



पारितोषिक देऊन सत्कार केला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी महाविद्यालयाची समृद्ध शैक्षणिक परंपरा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध सुविधा आणि भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विकासकामांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. मुख्य कार्यक्रमानंतर प्रत्येक नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

### गुणवंतांचा गौरव, आंब्याच्या रोपांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीत नव्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाचा स्थापनेपासूनचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध वातावरण आणि विविध उपक्रमांद्वारे घडविण्यात या महाविद्यालयाने महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालयातील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, आधुनिक भौतिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी उपक्रमशील शिक्षक डॉ. बापू देवकर यांनी विद्यार्थ्यांना आंब्याची रोपे





भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. प्रा. भोसले सर यांनी भूगोल विषयात ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रत्येकी ₹१,१०० रोख पारितोषिक देऊन गौरव केला. तसेच प्रा. सौ. उषा बोरुडे यांनी विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या तसेच भौतिकशास्त्र विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक देऊन सत्कार केला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी महाविद्यालयाची समृद्ध शैक्षणिक परंपरा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध सुविधा आणि भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विकासकामांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यक्रमानंतर प्रत्येक नवप्रवेशित विद्यार्थ्याचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले, त्यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला. या कार्यक्रमास पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप दरेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. बापू मांडे यांनी मानले.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये घडले हिंदू - मुस्लिम ऐक्याचे दर्शन

### वै. बबन महाराज पायमोडे यांच्या दिंडीचे दर्ग्यात स्वागत

पारनेर (समर्थ गांवकरी)

हिंदू - मुस्लिम ऐक्याची परंपरा असणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै. ह. भ. प. बबन महाराज पायमोडे यांच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मुस्लिम बांधवांनी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा दर्गाह येथे या दिंडीचे उत्साहात स्वागत केले. यावेळी दिंडी रथावर पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला. दिंडी चालकांच्या वतीने बाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली.

मुस्लिम जमातचे अध्यक्ष अशपाक हवलदार यांनी सर्वांचे स्वागत केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा पत्रकार चाँद शेख यांनी या उपक्रमाचे विवेचन करताना दिंडी पारंपरेतील हिंदू - मुस्लिम ऐक्याची विविध उदाहरणे देत दरवर्षी दिंडी स्वागताची प्रथा जपली जाणार असल्याचे सांगितले.वारकरी व सुफी संप्रदाय यात अनेक समान दुवे असून हे दोन्ही पंथ समानतेची व मानवतेची शिकवण देताना कर्मकांडाला थारा देत नाहीत. या दोन्ही संतांच्या या गळाभेटीने हिंदू - मुस्लिम एकतेचे धागे अधिक घट्ट बांधले गेले असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी सरपंच अरुणाताई खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय



उदावंत, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, दिंडी चालक रवींद्र पायमोडे, शंकर रांधवण अशोक झावरे, ग्रा. पं. सदस्य भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनावळे, संकेत झावरे, मळीभाऊ रांधवण, अंकुश पायमोडे, रावसाहेब झावरे, संदीप खिलारी, शिराजभाई हवलदार, चाँदशेठ इनामदार, बशीरभाई हवलदार, आदमभाई हवलदार, मुजावर उस्मानभाई, राजू शेख, साजिद पटेल, सद्दाम इनामदार, छोटूभाई हवलदार, अल्ताफ शेख, निसार शेख, आमीन पिंजारी, हर्षब मुजावर, रमजान शेख, अफसर शेख, सोहेल हवालदार, निहाल हवालदार, शाहिद शेख,फैजान मोमीन, अब्दुल हवालदार, हाफिजी सुलेमान पटेल आदींसह ग्रामस्थ, वारकरी व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजिजभाई हवलदार यांनी आभार मानले.

### दोन महानुभाव मित्रांची गळाभेट

वै. ह भ प बबन महाराज पायमोडे व पैगंबरवासी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा हे लहानपणापासूनचे सवंगडी होते. या उपक्रमाने वारकरी संप्रदाय व सुफी संप्रदायातील या मित्रांची जणू गळाभेटच झाली. यावेळी पावसासाठी हिंदू - मुस्लिम बांधवांनी सामूहिक प्रार्थना केली.

# दंडकारण्य अभियानांतर्गत जास्तीत जास्त वृक्ष लागवड करा : मा.आ.डॉ.सुधीर तांबे

## वृक्ष संगोपन हीच खरी सेवा

संगमनेर (समर्थ गांवकरी)

ग्लोबल वार्मिंगची समस्या, कमी पाऊस,वाढलेली उष्णता. दुष्काळ या सर्व समस्यावर मात करण्यासाठी पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यावर्षी दंडकारण्य अभियानांतर्गत जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करा वृक्षारोपण व संवर्धन हीच खरी मानवतेची व ईश्वराची सेवा ठरणार असल्याचे दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर दंडकारण्य अभियानाच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, प्रकल्प प्रमुख सौ.दुर्गाताई तांबे, सभापती शंकरराव खेमनर, सरपंच सोमनाथ गोडसे, गोरख नवले, गोरख सोनवणे, सुभाष सानप, योगेश पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, आदिवासी सेवक प्रा.बाबा खरात, समन्वयक प्राचार्य दशरथ वर्पे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा.आ.डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जात असलेले दंडकारण्य अभियान ही पर्यावरण संवर्धनाची मोठी लोकचळवळ ठरली आहे. वृक्षारोपण व संवर्धन ही मानवतेची गरज आहे आणि खऱ्या अर्थाने यामधून परमेश्वराची सेवा होणार आहे म्हणून या पावसाळ्यामध्ये प्रत्येकाने जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करा. या अभियाना मधून सप्तशृंगी गडावर १०० हेक्टर वर वृक्षारोपण करण्यात आले असून अनेक वृक्ष जगले आहेत याचबरोबर तालुक्यातील विविध डोंगरांवरचे वृक्ष विविध सहकारी संस्थांनी जगवली आहेत. यामध्ये प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. याचबरोबर एक विद्यार्थी दोन झाड ही संकल्पना राबवताना प्रत्येक नागरिकांनी वन विभाग गावातील मोकळ्या जागा आणि आपल्या बांधावर सुद्धा जास्तीत जास्त वृक्षारोपण करावे असे आवाहन त्यांनी केले.

### वनश्री पुरस्काराबद्दल मालदाड गावचा गौरव

**मालदाड गावचे सर्व ग्रामस्थ व सरपंच यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व तळमळीने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन केले. हा पॅटर्न आदर्शवत ठरला आहे. वृक्षारोपणामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी मिळाली या अंतर्गत ६० लाख रुपयांचा रोजगार गावामध्ये निर्माण झाला. याचबरोबर १४ एकरवर वृक्षरोपण केल्यातून शेवगा, आंबा यामधून गावाला मोठे उत्पन्नही मिळाले या कामाची दखल घेऊन त्यांना वनश्री पुरस्कार मिळाला याबद्दल सरपंच गोरख नवले यांचा मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**



तर सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, तालुक्यातील सहकारी संस्थांच्या मदतीने वृक्षारोपण व संवर्धनाचे मोठे काम झाले आहे. मात्र अनेक ठिकाणी वनवे लावले जात आहे हे अत्यंत चिंताजनक आहे यावर्षीचा उन्हाळा भयानक होता जास्त उन्हामुळे झाडे करपले गेली तरीही अनेक झाडांना पाणी देऊन ते जगविण्यात आली. उन्हाळ्यामध्ये झाडे जगवणे अवघड असून शेतकऱ्यांनी आपल्या जवळील मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे असे आवाहन त्यांनी केले.

तर गोरख नवले म्हणाले की, वनविभाग किंवा गावाच्या मोकळ्या जागेमध्ये झाडे लावून नरेगा अंतर्गत रोजगाराच्या मोठ्या संधी गावातील महिला व युवकांना मिळू शकतात. बिहार पॅटर्न अंतर्गत रोजगाराची ही मोठी संधी असून यामध्ये प्रत्येक गावच्या सरपंच व नागरिकांनी सहभाग घेऊन गावाला जास्तीत जास्त उत्पादन मिळून द्या याचबरोबर पर्यावरणाचे संवर्धन करा असे ते म्हणाले. तर पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, वृक्ष संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे आणि म्हणून वृक्ष जगली पाहिजे ती वाढवली पाहिजे यासाठी काम करा असे आव्हान त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दशरथ वर्पे यांनी केले तर पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

# धार्मिक स्थळांच्या कारवाईवरून अहिल्यानगरात नवा वाद; प्रशासनावर गंभीर आरोप

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिकेने अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसवर आक्षेप घेत शेख शाकीर अब्दुल सत्तार यांनी महापालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

या निवेदनात गृह विभागाच्या ५ मे २०११ च्या शासन निर्णयासह सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न करता धार्मिक स्थळांबाबत कार्यवाही केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, महानगरपालिका क्षेत्रातील २९ सप्टेंबर २००९ पूर्वी

अस्तित्वात असलेल्या धार्मिक स्थळांबाबत राज्य शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया बंधनकारक असून प्रत्येक स्थळाची स्वतंत्र पडताळणी,

कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था, लोकमान्यता, विकास आराखडा आणि इतर कायदेशीर बाबींचा विचार करूनच निर्णय घेणे अपेक्षित आहे. मात्र, सन २०१६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात अनेक धार्मिक स्थळांना सरसकट अनधिकृत घोषित करण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शेख यांनी असेही नमूद केले आहे की, त्यावेळी दाखल केलेल्या हरकतींवर आजपर्यंत कोणताही अंतिम निर्णय देण्यात आलेला नाही. तसेच २५ ऑक्टोबर २०१६ रोजी पोलीस विभागाने दिलेल्या अभिप्रायात शहरातील अनेक धार्मिक स्थळांमुळे वाहतुकीस कोणताही अडथळा नसल्याचे नमूद केले असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. निवेदनात महानगरपालिकेने अलीकडेच सोशल मीडियाद्वारे प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. संबंधित नोटीसमध्ये धार्मिक स्थळांची स्वतंत्र यादी, समितीचा ठराव, वर्गीकरण अथवा प्रस्तावित कारवाईचा तपशील नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच केवळ सात दिवसांच्या आत धार्मिक स्थळ हटविण्याची सूचना देणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे.

विशेषतः लालबाग कब्रस्तान परिसरातील दर्गा, चितळे रोड येथील मीरा हैदर शहा दर्गा, नटराज हॉटेलसमोरील दर्गा तसेच माळीवाडा परिसरातील हजरत जलाल शहा जलाल बुखारी दर्गा या धार्मिक स्थळांचा उल्लेख करत, कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी शासन निर्णयानुसार संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कोणतेही पाडकाम किंवा स्थलांतर न करणे

निवेदनात जाहीर नोटीस तात्काळ रद्द करणे, २०१६ मधील सर्वेक्षणाची कायदेशीर पडताळणी करणे, प्रत्येक धार्मिक स्थळाचे स्वतंत्र वर्गीकरण करणे, नागरिकांना हरकतींसाठी पुरेसा कालावधी देणे, सुनावणी घेऊन कारणयुक्त आदेश जारी करणे आणि अंतिम निर्णय



होईपर्यंत कोणतेही पाडकाम किंवा स्थलांतर न करणे अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांबाबत समान निकष लागू करून पारदर्शक, निष्पक्ष आणि कायदेशीर पद्धतीने कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने शासन निर्णय व न्यायालयीन आदेशांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा न्यायालयीन दाद मागण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या निवेदनावर महानगरपालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, संबंधित प्रकरणाकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ‘राहुरी तालुक्यातील घटना’ लग्नासाठी धमकी देत अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

माझ्याशी लग्न कर, अन्यथा तुला व तुझ्या कुटुंबियांना जीवे मारून टाकीन, अशी धमकी देत एका अल्पवयीन महाविद्यालयीन युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी राहुरी पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. ही घटना राहुरी तालुक्यातील कृषी विद्यापीठ परिसरात घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादीनुसार, जून २०२६ मध्ये आरोपीने पीडितेला फोन करून शिवीगाळ केली. तसेच, तू माझ्याशी लग्न करायचे. दुसर्या कोणाशी लग्न केले तर तुला आणि तुझ्या घरच्यांना जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिली. याचप्रमाणे, ७ जुलै रोजी सायंकाळी आरोपीने पीडितेच्या एका नातेवाईकाला फोन करून, तिचे लग्न ज्या मुलासोबत ठरवले आहे, त्याला आमचे फोटो दाखवीन. आमच्या समाजातील लोकांना लग्नात घेऊन येतो, मग काय होते ते बघा, अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार ओंकार प्रभाकर उर्फ महम्मद वैरागर (रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ३५१(२), ३५२ तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कोल्हार घोटी राज्यमार्ग निकृष्ट कामाची चौकशी करा

- धांदरफळ परिसरातील कार्यकर्त्यांचे निवेदन
- मंगळवारी रास्ता रोको चा इशारा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुका व संगमनेर तालुका यांना जोडणारा कोल्हार घोटी राजमार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सरकारच्या पैशाचा विनियोग या ठिकाणी झाला असून या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने करा व या निकृष्ट कामाची चौकशी करा या मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दत्ता कोकणे, नवनाथ देशमाने ,सागर वाघचौरे बाळासाहेब कानवडे, जावेद तांबोळी, आशिष गोसावी, शुभम हासे यांच्यासह विविध कार्यकर्त्यांनी निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की कोल्हार घोटी राज्यमार्गाचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. डांबरीकरणाचा वरचा थर हा अत्यंत पातळ असून



यामुळे ठिकठिकाणी खड्डे पडले आहे याचबरोबर सातत्याने धूळ उडत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणारे प्रवासी, वाहनचालक, विद्यार्थी, नागरिक महिला व युवक यांना या धुळीचा मोठा त्रास होत आहे. हे काम अत्यंत चुकीचे आणि निकृष्ट झाली असून तातडीने या कामाची दुरुस्ती व्हावी याचबरोबर या निकृष्ट कामाची शासकीय स्तरावरून तातडीने चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. याचबरोबर संगमनेर तालुक्यामध्ये सध्या टक्केवारी जोरात वाढली असून यामुळे असे रस्ते खराब होत असल्याची टीका दत्ता कोकणे यांनी केली असून या कामाच्या निषेधार्थ उद्या मंगळवार दिनांक १४ जुलै २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता सातवा मैल या ठिकाणी परिसरातील नागरिकांसह भव्य रस्ता रोको करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

या कामाची तातडीने दुरुस्ती व चौकशी न झाल्यास या पुढील काळात मोठे आंदोलन उभारले जाईल असा इशाराही त्यांनी दिला

## शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १५ ते ३० जुलै दरम्यान विशेष शोध मोहीम

### सर्व विभागांच्या समन्वयातून जिल्हाभर व्यापक सर्वेक्षण; १०० टक्के बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत, सक्तीचे व दर्जेदार शिक्षण मिळणे हा मूलभूत अधिकार आहे. या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा परिषद ठाणेच्या शिक्षण विभागामार्फत दि. १५ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) जिल्हाभर विशेष शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम राज्यात १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला असून, प्रत्येक बालकाची शाळेत नोंदणी, नियमित उपस्थिती आणि दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्याची जबाबदारी शासनाची आहे. या कायद्यानुसार शाळेत कधीही प्रवेश न घेतलेली, शिक्षण अर्धवट सोडलेली किंवा एक महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने शाळेत अनुपस्थित राहणारी ६ ते १४ वयोगटातील बालके ’शाळाबाह्य बालक’ म्हणून गणली जातात.

राज्यात तसेच ठाणे जिल्ह्यात रोजगार, हंगामी कामे आणि आर्थिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर कुटुंबांचे स्थलांतर होत असते. भूमिहीन, अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणात त्यामुळे खंड पडण्याची शक्यता वाढते. विशेषतः मुली, दिव्यांग बालके आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत होण्याचा धोका अधिक असतो. वाढते स्थलांतर, बालमजुरी, बालविवाह आणि सामाजिक असुरक्षितता या कारणांमुळे अनेक बालके शिक्षणापासून वंचित राहतात.

या मोहिमेचा मुख्य उद्देश शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरीत बालकांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करणे, त्यांचे शिक्षण अखंडित ठेवणे आणि शिक्षणाच्या हक्काची प्रभावी अंमलबजावणी करणे हा आहे.

या मोहिमेत केवळ शिक्षण विभागच नव्हे तर महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास, एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS), कामगार विभाग, आदिवासी विकास, अल्पसंख्याक विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच गृह विभाग यांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून गाव, वाडी-वस्ती, वीटभट्ट्या, बांधकामे, औद्योगिक क्षेत्रे, स्थलांतरित कामगारांच्या वस्त्या आणि इतर संभाव्य ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन सर्वेक्षण करण्यात येणार असल्याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली.प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शाळाबाह्य एकही बालक राहू नये, यासाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका तसेच नागरिकांनी या विशेष शोध मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. - जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी सर्व संबंधित विभाग, शाळा, शिक्षक, ग्रामपंचायती, नगरपरिषद, महानगरपालिका तसेच नागरिकांना या विशेष शोध मोहिमेस पूर्ण सहकार्य करून शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.

## अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात १५ अधिकार्यांच्या बदल्या

### एसपी मुम्मका सुदर्शन यांचे आदेश


**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि १२ पोलीस उपनिरीक्षक अशा एकूण १५ पोलीस अधिकार्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. शुक्रवारी (१० जुलै) रात्री उशिरा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी याबाबतचे आदेश जारी केले. बदली झालेल्या सर्व अधिकार्यांनी कोणताही पदग्रहण अवधी न घेता तात्काळ नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आदेशानुसार, पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांची नियंत्रण कक्षातून जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. नुकतीच राहुरी पोलीस ठाण्यात बदली झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांची पुन्हा बदली करण्यात आली असून, त्यांच्याकडे अप्पर पोलीस अधीक्षक यांचे वाचक म्हणून पदभार सोपविण्यात आला आहे.

तसेच, तोफखाना पोलीस ठाण्यातून यापूर्वी पाथर्डी येथे बदली झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला यांची राहुरी पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे. बदली झालेल्या पोलीस उपनिरीक्षकांची नियुक्ती पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

गजेंद्र इंगळे (अहिल्यानगर तालुका), अजय कौटे (एम आयडीसी), समाधान फडोळे (अकोले), संदीप शिंदे (नेवासा), रसुल शेख (श्रीगोंदा), आजिनाथ बटुळे (कर्जत), परसराम तागड (राजूर), हर्षवर्धन बहिर (श्रीरामपूर शहर), किरण जगदाळे (मिरजगाव), विजयकुमार कोठावळे (बेलवंडी), किरण शेलार (वाहतूक शाखा, शिर्डी) आणि अशोक खेडकर (खर्डा). दरम्यान, बदली झालेल्या सर्व अधिकार्यांनी पदग्रहण अवधीचा लाभ न घेता तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर व्हावे, तसेच संबंधित प्रभारी अधिकार्यांनी त्यांचा कार्यभार स्वीकारल्याबाबतचा अनुपालन



अहवाल विनाविलंब पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देश अधीक्षक सुदर्शन यांनी आदेशात दिले आहेत.

## नगर तालुक्यात चौघांकडून शेतकर्यावर हल्ला ; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

बुरूडगाव रस्ता परिसरातील समर्थनगर येथे घरासमोर साचलेली माती हटविण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका शेतकर्यावर खोर्याने हल्ला करून मारहाण करण्यात आल्याची घटना रविवारी (१२ जुलै) सायंकाळी घडली.या प्रकरणी चार जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबासाहेब किशोर राऊत (वय ४०, रा. समर्थनगर, बुरूडगाव रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार सागर सुनील राऊत, राजेश संजय राऊत, अमोल संजय राऊत, सुनील गुलाब राऊत (रा. बुरूडगाव रस्ता) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या घरासमोर ठेवलेली माती जेसीबीच्या साहाय्याने ढकलून समोरील नारळाच्या झाडावर पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ते झाडावर पडलेली माती बाजूला करण्यासाठी गेले असता, तेथे वाद निर्माण झाला. फिर्यादीनुसार, सागर राऊत याने त्यांच्या हातातील खोरे हिसकावून घेत मारहाण केली. तसेच इतर तिघांनीही मारहाण केली. हातपाय तोडण्याची, कार्यक्रम करतो अशी धमकी देत शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## नगर तालुक्यात जिल्हा नियोजनवरील संदेश कार्लेंच्या निवडीने तालुक्यात शिवसेनेला बळकटी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य तसेच विशेष निमंत्रित सदस्यांच्या नुकत्याच निवडी झाल्या आहेत. त्यात नगर तालुक्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा नगर तालुका पंचायत समिती माजी सभापती संदेश कार्ले यांची अहिल्यानगर जिल्हा नियोजन समिती विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

संदेश कार्ले यांच्या निवडीने नगर तालुक्यातील शिवसेनेला बळकटी मिळणार असल्याचे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे. आगामी होवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शिवसेनेला मोठा फायदा होणार आहे.

संदेश कार्ले हे नगर तालुक्यातील खंडाळा येथील आहेत. त्यांच्या राजकारणाची सुरुवात ठाकरे यांच्या शिवसेनेमधून झाली. संदेश कार्ले हे जिल्हा परिषदेचे दोनदा सदस्य होते. तर नगर तालुका पंचायत समितीचे सभापती राहिले आहेत.

नगर तालुक्यातील घोसपुरी पाणी पुरवठा योजनेचे ते तब्बल १० वर्ष अध्यक्ष राहिले आहेत. घोसपुरी पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष असतांना त्यांनी मायक्रो लेव्हलवर योजनेचा अभ्यास करुन तोट्यात असलेली योजना सुमारे दोन कोटी रुपयांनी नफ्यात आणली. योजना सुस्थितीत चालवून दाखविली. त्यामुळे घोसपुरी पाणी पुरवठा योजनेचा नावलौकिक राज्यात वाढविला होता. कार्ले यांच्या कामाची थेट राज्यपातळीवर दखल घेण्यात आली होती.

ठाकरे सेनेचे तालुका प्रमुख, उपजिल्हाप्रमुख पदाच्या माध्यमातून ठाकरे शिवसेना नगर तालुक्यात घराघरात पोहोचविण्याचे त्यांनी काम केले. गावोगावी शाखा स्थापन केल्या होत्या. पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविले. नगर तालुक्यात शिवसेना वाढीमध्ये कार्ले यांचा मोलाचा वाटा आहे. दरेवाडी व अरणगाव गटाचे कार्ले यांनी प्रतिनिधीत्व केले आहे.

पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद सदस्य पदाच्या माध्यमातून त्यांनी नगर तालुका पिंजून काढत विविध योजना प्रत्येक वाडी वस्तीवर, शेतकर्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. नगर तालुक्यात जनमनातील चेहरा म्हणून आज संदेश कार्ले यांच्याकडे पाहिले जात आहे. गेल्या वर्षभरापूर्वी कार्ले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. कार्ले यांच्या कामाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांच्या गटाकडून जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निवड झाली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा नियोजन समितीवर सदस्यपदी वर्णी लावत संदेश कार्ले यांच्या पाठिवर कौतुकाची थाप टाकली आहे. तसेच निवडीबद्दल भाजपचे युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी संदेश कार्ले यांचा सत्कार करत विश्वास दाखविला आहे.

आगामी होवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये नगर तालुक्यात शिवसेना नेते संदेश कार्ले यांची भूमिका मोलाची ठरणार आहे. कार्ले यांच्यासोबत असणारे जिल्हा परिषद शरद झोडगे, माजी सभापती रामदास भोर, माजी उपसभापती डॉ दिलीप पवार, पंचायत समिती सदस्य गुलाब शिंदे, प्रकाश कुलट व इतर आक्रमक पदाधीकारी यांची फौंज पुढील निवडणुकीसाठी महत्वाची ठरणार आहे. प्रसंगी पक्षादेश व टीम वर्क याचा अनुभव सर्वांनी अनुभवला आहे. मागील लोकसभेला विखे यांच्याबरोबर तर आत्ता झालेल्या लोकसभेला लंके यांच्याबरोबर निष्ठने काम केले. विधानसभेला महाविकास आघाडीत शिवसैनिक व शिवसेनेच्या बाबतीत झालेल्या चुकीच्या निर्णयाबाबत कार्ले यांनी अपक्ष लढवण्याचा निर्णय घेतला होता.

एकंदरीतच कार्ले पक्ष निष्ठा पाळणारे आहेत. त्यामुळे आगामी काळात संदेश कार्ले यांच्यावर पक्ष मोठी जबाबदारी देणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

संदेश कार्ले यांच्या उमेदवारीने झाला राणी लंके यांचा पराभव!

गत विधानसभा निवडणुकीमध्ये पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून राट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते रिंगणात होते. तर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके रिंगणात होत्या. अपक्ष म्हणून शिवसेनेचे संदेश कार्ले रिंगणात होते. महाविकास आघाडीत पारनेरची जागा राष्ट्रवादीला गेल्याने नाराज होत संदेश कार्ले यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात अपक्ष उडी घेतली होती. महाविकास आघाडीत असलेले कार्ले यांनी ऐनवेळी बंडखोरी केल्याने विधानसभा निवडणुकीत त्यांचा फटका



राणी लंके यांना बसला. संदेश कार्ले यांनी ११ हजारांपेक्षा अधिक मते घेतली. निवडणुकीत महायुतीचे उमेदावर काशिनाथ दाते यांचा दीड हजार मतांच्या फरकाने विजय झाला. कार्ले यांच्या अपक्ष उमेदवारीनेच राणी लंके यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे तालुक्यात विखे-कार्ले सहमती एक्सप्रेस भविष्यात सुसाट धावू शकते. त्याचा महायुतीला फायदा होऊ शकतो असे राजकीय जाणकार सांगतात.